



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com


एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार ४ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# पाकिस्तानी फायटर जेट पाडणा-या अभिनंदन यांनी हवाई दल सोडले







*अभिनंदन यांना वीरचक्र देउन सन्मानित करण्यात आले. हा भारताचा तिसरा सर्वात मोठा युद्धकालीन शौर्य पुरस्कार आहे. २०१९ च्या हवाई हल्ल्यात PoK मध्ये पकडले गेले होते, नंतर सुटका*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय हवाई दलाचे माजी ग्रुप कॅप्टन आणि वीर चक्र विजेते अभिनंदन वर्तमान यांनी निवृत्ती घेतली आहे. त्यांनी आता एका खासगी एअरलाइनमध्ये प्रवेश केला आहे. अधिका-यांच्या माहितीनुसार, त्यांनी ३१ मार्च २०२६ रोजी वायुसेना सोडली आणि नंतर प्रादेशिक एअरलाइन FLY91 मध्ये सामील झाले. अभिनंदन २७ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानी फायटर जेट F-16 पाडल्यानंतर चर्चेत आले होते. यावेळी त्यांचे ग्मक्र२१ क्षेपणास्त्राच्या टप्प्यात आले आणि त्यांना इजेक्ट होउन पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या भागात उतरावे लागले. पाकिस्तानने त्यांना सुमारे ६० तास ताब्यात ठेवल्यानंतर १ मार्च २०१९ रोजी भारताकडे सोपवले होते.

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे CRPF च्या ताफ्यावर दहशतवादी हल्ला झाला होता. यात ४० जवान शहीद झाले होते. याला प्रत्युत्तर म्हणून भारताने २६ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानच्या बालाकोटमध्ये एअरस्ट्राइक केली होती. त्याच्या दुस-या दिवशी पाकिस्तानी लढाउ विमानांचा एक मोठा ताफा ख्दृक च्या दिशेने पुढे सरकला. त्यावेळी अभिनंदन श्रीनगर एअरफोर्स स्टेशनवर MiG-21 बायसन स्क्वाड्रनमध्ये तैनात होते. ते ऑपरेशनल रेडीनेस ड्युटीवर होते. पाकिस्तानी विमानांचा शोध लागल्यानंतर सुमारे पाच मिनिटांनी अभिनंदन यांना त्यांना रोखण्यासाठी पाठवण्यात आले. अधिकृत प्रशस्तिपत्रानुसार, त्यांनी मागे हटणा-या एका शत्रु विमानाचा पाठलाग केला आणि हवाई युद्धात त्याला पाडले.

## आता प्रवासी विमान उडवणार

वायुसेनेत ग्रुप कॅप्टन पदापर्यंत पोहोचल्यानंतर, अभिनंदन आता नागरी विमान वाहतुकीत (सिव्हिल एव्हिएशन) नवीन कारकीर्द सुरू करत आहेत. ते प्रादेशिक एअरलाइन FLY91 मध्ये पायलट म्हणून काम करतील. FLY91 ने मार्च २०२४ मध्ये उड्डाणे सुरू केली होती. एअरलाइनकडे सध्या सहा एटीआर ७२-६०० विमाने आहेत. याचे दोन प्रमुख केंद्र गोवा आणि हैदराबादमध्ये आहेत. एअरलाइनने अभिनंदन यांच्या सामील होण्याबद्दल सविस्तर माहिती देण्यास नकार दिला आहे. प्रवक्त्याने सांगितले की कर्मचा-यांशी संबंधित वैयक्तिक माहिती हा खासगी विषय आहे.भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित प्रशस्तिपत्रानुसार, अभिनंदन यांनी पाकिस्तानी विमानांची संख्या आणि तांत्रिक आघाडी असूनही त्यांचा धैर्याने सामना केला. त्यांच्या आक्रमक युद्धाभ्यासाने शत्रुच्या विमानांमध्ये रणनीतिक गोंधळ निर्माण झाला.

# महाप्रसाद, भंडारा, लंगर आता FDA च्या रडारवर!

**मुंबई/प्रतिनिधी :** सण-उत्सवांच्या काळात भाविक आणि सर्वसामान्य नागरिकांना वाटल्या जाणा-या महाप्रसाद, लंगर अथवा भंडा-यांमधील अन्नाची गुणवत्ता आता थेट अन्न आणि औषध प्रशासनाच्या रडारवर आली आहे. सणासुदीच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्टँडिंग ऑर्डर्स फार ऑल फेस्टिव्हल्स हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय लागू केला आहे. सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा कायमस्वरूपी आदेश काढण्याची देशाच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ ठरली आहे.सणासुदीच्या दिवसांत खवा, पनीर, मिठाई, तूप, सुकामेवा आणि मांसाहाराची मागणी जास्त वाढते. पर्यायाने भेसळीचा धोकाही वाढतो. हे रोखण्यासाठी एफडीएने वर्षभराचे विशेष कॅलेंडर तयार करून सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण केले आहे.

**प्रथम श्रेणी (राज्यव्यापी):** गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ (ख्रिसमस) आणि नववर्ष पूर्वसंध्या.

**द्वितीय श्रेणी (प्रादेशिक):** मकर संक्रांती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिक वारी, श्रावण मास, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरु नानक जयंती.

**तृतीय श्रेणी (स्थानिक):** स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरूस.



**चार टप्प्यांत धडक मोहीम**

ही संपूर्ण कारवाई सणाच्या २१ दिवस आधी सुरू होउन सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत सुरू राहणार आहे. यासाठी चार टप्प्यांचा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

**पहिला टप्पा (पूर्वतयारी):** हाय-रिस्क अन्नपदार्थांचे मॅपिंग, विशेष पथकांची नियुक्ती आणि प्रयोगशाळांना पूर्वसूचना.

**दुसरा टप्पा (नाका तपासणी):** गिरण्या, घाउक बाजारपेठा आणि वाहतुकीवर नजर. पहाटेच्या सुमारास अचानक नाका तपासणी.

**तिसरा टप्पा (सणाचा दिवस):** विशेष भरारी पथकांद्वारे महाप्रसाद व मिठाईच्या ठिकाणांची प्रत्यक्ष सरप्राईज तपासणी.

**चौथा टप्पा (कायदेशीर कारवाई):** दोषींवर न्यायालयात थेट खटले दाखल करणे आणि आयुक्तांना अहवाल सादर करणे.

**झिरो टालरन्स** धोरणांतर्गत उपवासाच्या काळात भगर, साबुदाणा आणि राजगि-याचे नमुने आधीच तपासले जातील. मिठाईवर लावला जाणारा चांदीचा वरख खरोखर शुद्ध चांदीचा आहे का? खाद्यरंगांची मर्यादा पाळली आहे का, याची काटेकोर तपासणी होईल. मांसाहारासाठी शीत साखळी आणि अधिकृत कत्तलखान्यांची वैधता तपासली जाईल. याशिवाय अक्षय्य तृतीयेला कृत्रिमरीत्या फळे पिकवणा-यांवर, नाताळमध्ये बेकरी उत्पादनांवर आणि रमजान-ईदच्या काळात अन्नपदार्थांवर विशेष नजर राहील. ई-कामर्स, पॅकबंद पाणी आणि आयात अन्नपदार्थही या तपासणीच्या कक्षेत असतील. सण संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दोषींवर न्यायालयात खटले भरले जातील, असा स्पष्ट इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

# राज्यात 11 आयएएस अधिका-यांच्या बदल्या!

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्य सरकारने गुरूवारी ११ आयएएस अधिका-यांच्या बदल्या केल्या आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी स्तरावरील अधिका-यांचा समावेश आहे.रवींद्र खेबुडकर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (जीएसडीए), पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गजेंद्र बावणे आयुक्त, जीएसडीए, पुणे यांची संयुक्त व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण), छत्रपती संभाजीनगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डा. अपूर्वा बासुर प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार उपविभाग, पालघर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशाल खत्री प्रकल्प अधिकारी,




एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणू उपविभाग, पालघर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डोनुरू अनन्या रेड्डी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, नांदेड यांची प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, ➪(पान २ वर)

# नळदुर्ग किल्ल्यावरून आईची तीन मुलांसह उडी

## मायलेकाचा मृत्यू, दोन मुलींची मृत्यूशी झुंज





**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी : :** नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यातील सर्वांत उंच असलेल्या उपली बुरुजावरून एका महिलेने आपल्या तीन लहान मुलांसह सुमारे १५० फूट खोल दरीत उडी मारल्याची धक्कादायक घटना गुरुवारी ३ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. या घटनेत अश्विनी मनोहर पौळ (वय ३०) आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य मनोहर पौळ यांचा जागीच मृत्यू झाला. तर अश्विनी यांच्या अडीच वर्षांच्या जुळ्या मुली वीरा मनोहर पौळ आणि क्रांती मनोहर पौळ या गंभीर जखमी झाल्या आहेत. दोन्ही मुलींवर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. या दोन्ही मुलींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येते.

या घटनेमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही आत्महत्या आहे की यामागे अन्य काही कारण आहे, याचा तपास नळदुर्ग पोलिसांकडून सुरू आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील अंबुलगा, येथील अश्विनी मनोहर पौळ (वय ३०) या गुरुवारी आपल्या तीन लहान मुलांसह नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी आल्या होत्या. त्यांच्यासोबत अजिंक्य मनोहर पौळ (वय साडेपाच वर्षे), वीरा मनोहर पौळ (वय अडीच वर्षे) आणि क्रांती मनोहर पौळ (वय अडीच वर्षे) ही मुले होती. दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास त्या किल्ल्यातील सर्वांत उंच असलेल्या उपली बुरुजावर गेल्या. बुरुजाची उंची सुमारे १५० फूट आहे. तेथील एका छोट्या कमानीतून अश्विनी यांनी तीनही मुलांसह खाली उडी मारली. उडी घेतल्यानंतर अश्विनी पौळ आणि त्यांचा मुलगा अजिंक्य पौळ यांचा जागीच मृत्यू झाला. वीरा आणि क्रांती या दोन्ही जुळ्या मुली गंभीर जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच किल्ल्याचे इन्चार्ज नागनाथ गवळी यांनी पोलिसांना कळविले.माहिती मिळताच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक अख्तर सय्यद आणि नळदुर्ग बीट अंमलदार खलील शेख यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी वीरा आणि क्रांती यांना तातडीने नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर दोन्ही मुलींना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

**चार महिन्यांपूर्वी नोकरीचा राजीनामा-** अश्विनी मनोहर पौळ या मुंबई येथे एमएसएफमध्ये नोकरीला होत्या. त्यांचे पती मनोहर पौळ हे रिक्षाचालक असल्याचे समजते. पती मनोहर पौळ ➪(पान २ वर)

# भारताने वाढविली यूएईमधून सोन्याची आयात

**नवी दिल्ली :** भारत आपल्या सोन्याच्या गरजेपैकी बहुतांश सोने परदेशातून आयात करतो. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून सोन्याच्या आयातीवरील खर्च वेगाने वाढत आहे. वाढता खर्च लक्षात घेता सरकारने जनतेला कमी सोने खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. असे असूनही, सोन्याच्या आयातीचा खर्च कमी होत नसून त्यात वाढच होत आहे. सरकारने सोन्यावरील आयात शुल्क वाढवल्यापासून त्यात आणखी भर पडली आहे. तसेच यूएईकडून भारत मोठ्या प्रमाणात सोने आयात करत आहे. सर्वात मोठी सोन्याची आयात संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधून होत आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष वेधले आहे.



यूएईमधून इतक्या मोठ्या प्रमाणात सोन्याची आयात का होत आहे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. भारताची सोन्याची आयात मागील वर्षीच्या ७.४९ अब्ज डालर्सच्या तुलनेत, एप्रिल-जून २०२६ मध्ये ४७.१ टक्क्यांनी वाढून ११.०१ अब्ज डालर्स झाली. १३ मे रोजी सरकारने सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवल्यानंतर ही वाढ झाली. याव्यतिरिक्त, सोन्याच्या वाढलेल्या आंतरराष्ट्रीय किमतींनीही आयातीच्या खर्चात वाढ होण्यास हातभार लावला आहे. संयुक्त अरब अमिरातीकडून (यूएई) भारताची सोन्याची आयात वाढली आहे. भारताने जून २०२६ मध्ये संयुक्त अरब अमिरातीकडून ६४९.४ दशलक्ष डालर्स किमतीचे सोने आयात केले. ते जून २०२५ मधील २३५.९ दशलक्ष डालर्सच्या तुलनेत १७५.२% जास्त आहे. इतर देशांकडून होणारी आयात १७.७% ने घटून १.६० अब्ज डालर्सवरून १.३२ अब्ज डालर्सवर आली. दरम्यान उर्वरित जगाकडून होणारी आयात २९.३ टक्क्यांनी वाढून ७.८७ अब्ज डालर झाली.

# सर्वोच्च न्यायालयात सिनेमासारखी तारीख पे तारीख-खा.सुप्रिया सुळे

**पुणे / प्रतिनिधी-** सत्तेत बसलेल्या उपमुख्यमंत्र्यांचा इतका मोठा भीषण विमान अपघात होउन त्यांचा मृत्यू होतो, तरीही सरकार साधा गुन्हा नोंदवत नाही.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर बोलताना सुप्रिया सुळे अत्यंत भावूक आणि आक्रमक झाल्या. अमित ठाकरे यांनी फोटो काढला म्हणून लगेच कारवाई होते. आम्ही आमच्या घरातील कर्ता पुरुष गमावला. एका विद्यमान उपमुख्यमंत्र्यांचा एवढा मोठा अपघात होतो, पण त्यावर सरकार एफआयआर का नोंदवत नाही? तपासाची नेमकी परिस्थिती काय आहे, हेही कोणाला माहीत नाही. अजित पवारांचा पक्ष सत्तेत भागीदार आहे, त्यांचे ४० आमदार आणि मंत्री सत्तेत बसून मलिदा खात आहेत. मात्र, त्या एकाही आमदाराने किंवा मंत्र्याने माझ्या भावाच्या मृत्यूची चौकशी व्हावी किंवा एफआयआर दाखल व्हावा म्हणून आजपर्यंत एक शब्दही उच्चारला नाही. भाउ आमचा



गेला आणि सत्ता हे भोगत आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

**सर्वोच्च न्यायालयात सिनेमासारखी तारीख पे तारीख**

पक्ष आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीचा संदर्भ देत त्यांनी न्यायव्यवस्थेतील दिरंगाईवर नाराजी व्यक्त केली. आमचा न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. मात्र, सिनेमात आपण तारीख पे तारीख पाहायचो, तोच प्रकार आज आमच्या बाबतीत घडत आहे. आम्ही तब्बल सहा वेळा न्यायालयात धाव घेतली, तरी आमच्या पक्षाची केस बोर्डावर लागत नाही.

ठाण्यातील प्रस्तावित ॲमेझान डेटा सेंटरला स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध आहे. नागरिकांचे म्हणणे ऐकून जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने भूमिका घेतली असून, जर ठाणेकरांना ते नको असेल, तर हे डेटा सेंटर इथे होउ देणार नाही.सरकारला केवळ हजारो कोटींच्या बिग तिकीट प्रकल्पांमध्ये रस आहे. रस्ते, खड्डे, आरोग्य, शिक्षण यावर खर्च करायला पैसे नाहीत. ठाण्यात मेट्रोऐवजी सक्षम बस कनेक्टिव्हिटी दिली तर सामान्यांचे काम ५०० रु पयांत होईल, पण सरकारला कोट्यवधींचे महागडे प्रकल्प राबवायचे आहेत.

**महागाईमुळे जगणे कठीण-** केंद्र आणि राज्य ➪(पान २ वर)

# अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात सरकारकडून माहिती दडवण्याचा प्रयत्न

**मुंबई / प्रतिनिधी-** दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी विरोधकांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांत अद्याप एफआयआर नोंदवण्यात न आल्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आता काँग्रेसनेही जाहीरपणे उपस्थित केले आहे.अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आणि रास्त आहे. सध्या सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आमदार सत्तेत आहेत, त्यांनी या प्रकरणावर गुन्हा का दाखल झाला नाही, अशी कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. त्यांच्या आमदारांनी एफआयआरची साधी मागणीही केली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काय गोम दडली आहे, हे कळायला मार्ग नाही.



देशाचा जीडीपी वाढल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या गुड न्यूजवर नाना पटोले यांनी जोरदार टीका केली. पंतप्रधानांनी सोशल मीडियावर जीडीपी वाढल्याचा आनंद व्यक्त केला, पण देशभरातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनीच या दाव्यांची पोलखोल करत त्यांना ट्रोल केले आहे. जर भारताचा जीडीपी ७.८ टक्के इतका प्रचंड वाढला असेल आणि जागतिक पातळीवर देश अव्वल ठरत ➪(पान २ वर)

# आज रात्रीपासून 1 नोव्हेंबरपर्यंत डीजेवर बंदी!

**नागपूर/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आज रात्रीपासून १ नोव्हेंबरपर्यंत डीजे, डीजेची वाहने, डिम लाईट तसेच लेजर लाईटच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे गणेशोत्सव आणि आगामी सणांच्या काळात ध्वनिप्रदूषण तसेच नागरिकांना होणारा त्रास रोखण्यास मदत होणार आहे.



पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार, निर्धारित कालावधीत शहरात डीजे साउंड सिस्टिम, डीजे वाहने, डिम लाईट आणि लेजर लाईटचा वापर करता येणार नाही. सार्वजनिक मिरवणुका, धार्मिक कार्यक्रम तसेच अन्य उत्सवांच्या वेळी या उपकरणांचा वापर केल्यास संबंधितांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

गणेशोत्सव काळात मोठ्या आवाजात डीजे व ध्वनिवर्धकांचा वापर, तसेच लेजर लाईटमुळे नागरिक, वाहनचालक आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेउन हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासोबतच ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन करणा-यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे गणेश मंडळे, आयोजक, डीजे चालक तसेच संबंधितांनी आदेशाचे पालन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांकडून शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवले जाणार असून, आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

## पुण्यात डीजेला विरोध करणा-या विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला

**पुणे :** गणेशोत्सवातील डीजेच्या आवाजाविरोधात सातत्याने भूमिका घेणारे कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना पुण्यात बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात हा प्रकार घडला असून, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विद्यानंद बापट हे कशाळे चौकात नागरिकांशी संवाद साधून गणेशोत्सवातील डीजेबाबत लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेत होते. त्याच वेळी तिथे उपस्थित असलेल्या एका गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत त्यांचा वाद झाला. वादाचे रूपांतर पुढे हाणामारीत झाले आणि कार्यकर्त्यांनी बापट यांना बेदम मारहाण केली. डीजेच्या धुमाकुळाविरोधात आणि आवाजाच्या प्रदूषणाविरोधात बापट यांनी ठाम भूमिका घेतली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असून अधिक तपास सुरू आहे. ➪(पान २ वर)





# एलआयसी कार्यालय अमरावती येथे आरोग्य तपासणी शिबिर

## विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातर्फे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व (आयुषमान भारत) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत एलआयसी कार्यालय अमरावती येथे दि. ०२ सप्टेंबर २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन डॉ. अमोल नराटे (वैद्यकिय अधिक्षक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती) व डॉ. मंगेश मेंढे (विशेष कार्य अधिकारी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती)



यांच्या मार्गदशनाखाली करण्यात आले.

मोफत आरोग्य तपासनी शिबिरामध्ये कर्करोग, हृदयरोग, मेंदुरोग संबंधित आजार, लघवी संबंधित आजार, किडणीरोग संबंधित आजार, किडणी प्रत्यारोपन, बालरोग संबंधित आजार, प्लास्टीक सर्जरी संबंधित, आजार कान, नाक घसा (कॉकरियल) संबंधित आजार व एन. सी. डी. संबंधित रुग्ण तपासनी करण्यात आली. एकुण ५२ रुग्णांपैकी ६ रुग्ण विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात आले. मोफत आरोग्य शिबिरमध्ये तपासणी करीता विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील तज्ञ वैद्यकीय चमुमध्ये डॉ. सपना गुप्ता (एन.सी.डी. वैद्यकीय अधिकारी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती, दिनेश हिवराळे (एन.सी.डी. समुपदेशक) भुपेंद्र जेवडे (वैद्यकीय शिबिर समन्वयक), अभिजीत करवाडे (अधिपरीचारक ब्रदर) सुरज देशमुख (अधिपरीचारक ब्रदर) तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### राज्यात ११ आयएएस

डहाणू उपविभाग, पालघर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पी.के. सिद्धार्थ रामकुमार अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, नाशिक यांची प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार उपविभाग, पालघर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.कुश मोटवानी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, नागपूर यांची सहाय्यक जिल्हाधिकारी, वर्धा तथा उपविभागीय अधिकारी, वर्धा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आकाश वर्मा, अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, वाशिम यांची सहाय्यक जिल्हाधिकारी, गोंडपिंपरी उपविभाग, चंद्रपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नंदला साईकिरण अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, गोंदिया यांची सहाय्यक जिल्हाधिकारी, भंडारा तथा उपविभागीय अधिकारी, भंडारा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### नळदुर्ग किल्ल्यावरून आईची

यांच्या सांगण्यावरून अश्विनी यांनी चार ते पाच महिन्यांपूर्वी नोकरीचा राजीनामा दिला होता. मागील तीन महिन्यांपासून त्या आपल्या तीन मुलांसह माहेरी राहत होत्या. अश्विनी यांचे माहेर उमरगा तालुक्यातील व्हंताळ असून त्यांचे वडील शिक्षक आहेत. अश्विनी यांनी एवढे टोकाचे पाउल का उचलले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटनेमागे कौटुंबिक कारण आहे की अन्य कोणते कारण आहे, याचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

### सर्वोच्च न्यायालयात सिनेमासारखी

सरकारच्या आर्थिक दाव्यांवर त्यांनी जोरदार टीका केली. सरकार ७.८ टक्के विकासदराचा जल्लोष करत आहे, पण तो गरिबांच्या पोटावर पाय देउन करू नये. बाजारात फूड इन्फ्लेशन प्रचंड वाढले आहे. डाळी, तेल, भाज्या महागल्या आहेत, दूध शंभरी पार गेले आहे. घरात जाउन महिलांना विचारा, चहामध्ये दूध टाकायचे की नाही अशी परिस्थिती झाली आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात भाजपने केलेल्या आंदोलनावर प्रत्युत्तर देताना त्या म्हणाल्या, संसदेत सर्व पक्षांनी एकमुखाने नारी शक्ती वंदन (महिला आरक्षण) विधेयक मंजूर केले होते. काँग्रेसने कधीही या विधेयकाला विरोध केला नाही, याचे संसदेत अधिकृत पुरावे आहेत.

### अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात

असेल, तर देशात महागाई का वाढत आहे? बेरोजगारी का संपलेली नाही? शेतकरी आत्महत्या का करत आहेत? जर अर्थव्यवस्था इतकी बळकट झाली असती, तर देशात सगळीकडे आलबेल वातावरण असायला हवे होते. जनतेसमोर खोटे आकडे फेकून दिशाभूल केली जात आहे, असा थेट निशाणा पटोले यांनी साधला.

### पुण्यात डीजेला विरोध

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या बैठकीत डीजे आणि कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांच्या वापराविरोधात आवाज उठवणारे सजग नागरिक विद्यानंद बापट सध्या चर्चेत आले आहेत. गणेशोत्सव २०२६ च्या पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेत झालेल्या बैठकीत विद्यानंद बापट यांनी डीजे आणि कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांच्या वापराचा मुद्दा उपस्थित केला होता. ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता डीजे आणि लाउडस्पीकरवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र, त्यांच्या या भूमिकेला गणेश मंडळातील काही कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. या मुद्यावरून बैठकीत जोरदार खडाजंगी झाली. बापट यांना बैठकीतून बाहेर जाण्यास सांगण्यात आले होते.विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीची पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे.

### रविनगरात भरदिवसा कॉलेज

आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. मृत तरुणीचे नाव शर्वरी गणेश हाडके (वय १७ वर्षे ६ महिने, रा. अंबा विहार, रविनगर, अमरावती) असे आहे. या प्रकरणातील आरोपी आनंद नंदकिशोर भड (वय २२, रा. पोही, माना, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास राजापेठ पोलिस करीत आहेत.शर्वरी ही ब्रजलाल बियाणी सायन्स कॉलेजमध्ये बी.एस्सी. प्रथम वर्षात शिक्षण घेत होती. गुरुवारी सकाळी सुमारे ११.३० वाजता ती घरातून मोपेडने कॉलेजला जाण्यासाठी निघाली होती. रविनगर चौकातून नाल्यावरील पुलाजवळ पोहोचताच आरोपी आनंद भड याने तिला रस्त्यात अडविले. यावेळी दोघांमध्ये काही वेळ संभाषण झाले. त्यानंतर अचानक संतप्त झालेल्या आरोपीने चाकू काढून शर्वरीवर सपासप वार केले. गळ्यावर झालेल्या गंभीर वारामुळे शर्वरी रक्ताच्या थारोळ्यात कोसळली. घटना घडत असताना त्या मार्गाने जाणाऱ्या रिक्षाचालक विनय काळे यांनी रिक्षा थांबविली. त्यांच्यासोबत राहुल इंगोले या तरुणानेही धाडस दाखवत आरोपीला पकडले. दोघांनी आरोपीची चांगलीच धुलाई केली. मात्र, संधी साधून आरोपी घटनास्थळावरून स्वतःची दुचाकी घेऊन पसार झाला. त्यानंतर विनय काळे यांनी गंभीर जखमी शर्वरीला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. रुग्णालय प्रशासनाने याबाबत राजापेठ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक पथकाला पाचारण करून घटनास्थळावरील महत्त्वाचे पुरावे संकलित करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपीचा पर्स, रक्ताने माखलेला चाकू तसेच दोघांचे मोबाईल जप्त केले आहेत. आरोपी हल्ल्यानंतर पसार झाला होता. त्याच्या शोधासाठी पोलिसांनी तातडीने विविध पथके रवाना केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून आरोपीचा शोध घेण्यात आला. अखेर पोलिसांनी आनंद भड याला अटक केली.

**घटनेपूर्वी परिचिताला केला होता फोन-**घटनेपूर्वी शर्वरीने आपल्या एका परिचिताला फोन करून आरोपी आनंद भड हा तिला त्रास देत असल्याची माहिती दिल्याचे समोर आले आहे. संबंधित परिचिताने आरोपीशी संपर्क साधून त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत हल्ल्याची घटना घडली होती. आरोपीचा मोबाईल घटनास्थळी मिळाल्याने त्याची ओळख पोलिसांसमोर स्पष्ट झाली.

**कुटुंबावर कोसळला दुःखाचा डोंगर-**शर्वरी ही सामान्य कुटुंबातील होतकरू विद्यार्थिनी होती. तिचे वडील गणेश हाडके हे होर्डिंग लावण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुटुंबात आई-वडील आणि लहान भाऊ असा परिवार आहे. दिवसाढवळ्या लाडक्या मुलीची निर्घृण हत्या झाल्याने हाडके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. शहरात वाढत असलेल्या गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### पॉवर ऑफ ॲटर्नी नोंदणीसाठी

निष्पन्न झाले. तसेच भिलावेकर याने लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचेही पडताळणीत स्पष्ट झाले. त्यानंतर दुसऱ्या पडताळणीत दुधंडे यांनी लाचेची रक्कम स्वीकारण्यास संमती दर्शवून ती कंत्राटी ऑपरेटर लकी सुनील राठोड (वय ३२) याच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. ३ सप्टेंबर रोजी दुपारी धारणी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात एसीबीने सापळा रचला. तक्रारदाराला पंचासह लाच रक्कम देण्यासाठी पाठविण्यात आले. यावेळी लोकसेवक संतोष दुधंडे यांनी तक्रारदारास ४,८०० रुपयांची रक्कम लकी राठोड याच्याकडे देण्यास सांगितले.

तक्रारदाराकडून दुधंडे यांच्या समक्ष लकी राठोड याने ४,८०० रुपयांची लाच रक्कम स्वीकारली. त्यानंतर एसीबीच्या पथकाने कारवाई करीत दुधंडे व राठोड यांना ताब्यात घेतले. राठोड याने पॅन्टच्या मागील खिशात ठेवलेली ४,८०० रुपयांची लाच रक्कम पंचांसमक्ष जप्त करण्यात आली. तसेच खासगी इसम साबुलाल भिलावेकर यालाही कार्यालयाबाहेरून ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी धारणी पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. तिन्ही आरोपींच्या निवासस्थानी घरझडतीची कारवाईही सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर आणि अपर पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक मंजुषा भोसले यांच्या पर्यवेक्षणात पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक संजय शिंदे, पोलीस अंमलदार सुधीर चर्जन, वैभव जायले तसेच चालक पोलीस उपनिरीक्षक सतीश किटुकले यांनी सहभाग घेतला.

### येवदा येथील अल्पभूधारक

नापिकी आणि डोक्यावरील कर्ज त्यामुळे संतोष हा अनेक दिवसापासून नैराश्याच्या वातावरणात जगत होता. त्याच्यामागे पत्नी, एक मुलगा असा आप्त परिवार आहे. पुढील तपास येवदा ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी करीत आहे.

### समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात २ सप्टेंबर रोजी ही बैठक पार पडली. यावेळी 'स्कूल ठीक करो' अभियान, संघटनात्मक बांधणी आणि सदस्यता नोंदणी या प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. नितीन दिघे यांच्यासोबत कोऑर्डिनेटर ॲड. जयसिंग शेरे, निलाक्षी वानखेडे, मयूर मालखेडे, माहिया गौरखेडे यांची ही उपस्थिती होती.चांदूर रेल्वे शहरात सीजेपीचे काम यापूर्वीपासूनच सुरू असून, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसह पेपरफुटीविरोधात आंदोलन करण्यात आले होते. तसेच तालुक्यातील शाळांची पाहणी करण्याची मोहीमही सुरू आहे. स्थानिक विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन सीजेपीच्या कोअर कमिटीने चांदूर रेल्वेला भेट देऊन स्थानिक कार्यकर्ते व विविध सामाजिक-राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीतील जंतर-मंतर येथे शासकीय शाळांच्या सुधारणांसाठी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातील काही प्रमुख मागण्या शासनाकडून मान्य झाल्यामुळे ५ सप्टेंबर रोजी प्रस्तावित करण्यात आलेले आंदोलन स्थगित करण्यात आले, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. दरम्यान, चांदूर रेल्वे तालुक्यात सीजेपीची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच सदस्यता नोंदणीला वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांचे प्रश्न, शिक्षण व्यवस्था, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या यासाठी संघटितपणे आवाज उठविण्यावर बैठकीत भर देण्यात आला.बैठकीदरम्यान भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सीजेपीच्या कार्यकर्त्यांना 'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक भेट देण्यात आले. विविध सामाजिक प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. बैठकीला सीजेपीचे सागर तंबाखे, सेजल मेंढे, प्रफुल इंगळे, स्वप्नील डोळस, पंकज घोरपडे, आम आदमी पार्टीचे नेते नितीन गवळी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे भूषण नाचवनकर, सतीश चौधरी, विनोद जोशी, हार्दिक सोनोने, जीवन दुर्योधन, तेजस मेश्राम, सूरज कांबळे, धीरज मेश्राम, गौरव इंगोले, कल्याणी काळमेघ, हिरू मेंढे, मयूर सवाई, आशिष सोनोने, अक्षय स्थूल, आदित्य वानखेडे, अश्विन रामटेके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पेपरफुटीविरोधातील आंदोलनापासून सुरू झालेली सीजेपीची चळवळ आता 'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून शासकीय शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणार असल्याने चांदूर रेल्वेतील या बैठकीकडे विशेष लक्ष लागले आहे.

### शिवसेना उद्धव ठाकरे गटाला

यांच्यासोबत उद्धव ठाकरे गटाचे नरेश भाकरे, विभागप्रमुख नरेंद्र अकोलकर, युवासेना उपतालुका प्रमुख ऋषिकेश सगणे, उपविभागप्रमुख विजय खेसे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.यावेळी विधानपरिषद आमदार व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतल्याचे नरेंद्र पडोळे यांनी सांगितले. अमरावतीतील बहुसंख्य पदाधिकारी व शाखाप्रमुखांसह आगामी काळात शिवसेनेत प्रवेश करण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मंत्री संजय राठोड तसेच शिवसेना नगरसेवक दिनेश बुब यांच्या नेतृत्वाचाही उल्लेख करण्यात आला.

### कावड यात्रेनिमित्य दर्यापूर,मुर्तिजापूर

मार्गक्रमण करतात. दरम्यान, कावड मंडळांचा मुक्काम गणेशपूर, ता. दर्यापूर येथील इच्छापूर्ती माता मंदिर परिसरात होणार आहे. त्यानंतर ७ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० वाजता कावड यात्रेला सुरुवात होऊन मुर्तिजापूर–दर्यापूर मुख्य मार्गाने मिरवणूक दर्यापूर शहरात प्रवेश करणार आहे. सायंकाळी सुमारे ६ वाजता कावड यात्रेची सांगता होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ६ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजल्यापासून ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत दर्यापूर–मुर्तिजापूर मुख्य मार्गावरील वाहतूक पुढील पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. दर्यापूर, आमला, आसरा फाटा, बोटा, हिरापूर, मुर्तिजापूर मार्ग या वाहतूक वळविण्याच्या आदेशातून एसटी बस वाहतुकीला वगळण्यात आले आहे. वाहतूक वळविल्यानंतर संबंधित मार्गावरील स्थानिक नागरिकांना या वाहतूक वळविण्याच्या आदेशातून सूट देण्यात आली आहे. मात्र, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कावड यात्रेच्या कालावधीत दर्यापूर–मुर्तिजापूर मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा आणि वाहतूक नियमनासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या

भोगत होता.२ सप्टेंबर रोजी कैद्याच्या छातीत अचानक तीव्र वेदना सुरू झाल्या. कारागृहातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासणी केल्यानंतर त्याला तात्काळ नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रेफर केले.

नागपूर येथे उपचार घेऊन तो त्याच रात्री सुमारे ७ वाजता पुन्हा अमरावती कारागृहात परतला. मात्र रात्री १२.५० वाजताच्या सुमारास त्याची प्रकृती पुन्हा बिघडली आणि छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या.कारागृह प्रशासनाने तात्काळ त्याला जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल केले. उपचारादरम्यान डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही रात्री १.१५ वाजता त्याला मृत घोषित करण्यात आले. कारागृह प्रशासनाच्या सूचनेवरून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कलम १९४ अन्वये प्रकरण नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे.

पंचनामा, शवविच्छेदन आणि वैद्यकीय नोंदींची तपासणी पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या देख रेखीखाली केली जात आहे. कैद्याच्या कारागृहातील आणि रुग्णालयातील सर्व वैद्यकीय रेकॉर्डची तपासणी केली जात आहे. मृताच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली असून प्रकरणाची निष्पक्ष चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### दहिगाव सेवा पतसंस्थेच्या आर्थिक

, यामुळे तालुक्यातील सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

नागरिकांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि अडीअडचणीच्या काळासाठी विश्वासाने या पतसंस्थेत ठेवी जमा केल्या होत्या. मात्र, मुदत संपल्यानंतर किंवा ऐन गरजेच्या वेळी पैसे मागण्यासाठी गेले असता समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार ठेवीदारांनी केली आहे. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे लेखी तक्रार निवेदन सादर करण्यात आले आहे.तक्रार निवेदनात नमूद केल्यानुसार, पतसंस्थेचे व्यवस्थापक आणि संचालक मंडळाकडून ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या ठेवींचा गैरव्यवहार करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे स्वतःचीच ठेव परत मागण्यासाठी गेलेल्या गोरगरीब ठेवीदारांना पैसे परत देण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. कधी तांत्रिक कारणे सांगितली जातात, तर कधी पुढच्या तारखेवर ढकलले जाते.या प्रकारामुळे सर्वसामान्य ठेवीदार, शेतकरी, मजूर आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये आपल्या आयुष्यभराच्या बचतीबाबत प्रचंड चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पतसंस्थेची नेमकी आर्थिक स्थिती काय आहे? प्रत्यक्षात किती ठेवीदारांची रक्कम अडकली आहे? आणि पैशांचा गैरव्यवहार नेमका कसा झाला? या सर्व बाबींचा छडा लावण्यासाठी सहकार विभागाने तातडीने संस्थेच्या सर्व आर्थिक व्यवहारांचे विशेष ऑडिट करावे, अशी मागणी होत आहे.निवेदन देताना प्रहार कार्यकर्ते शंभू मालठाणे, बाळा शेरकर, दीप बुढळकर, रोशन धुमाळे, प्रशांत बावनथडे, श्याम धुमाळे, कृष्णा शेंडे, शंकर बुढळकर, सागर बुढळकर, सुरज गोळे, योगीराज मेश्राम, अभिजीत लोथे यांच्यासह मोठ्या संख्येने ठेवीदार आणि कार्यकर्ते उपस्थित होते.दरम्यान, आता सहकार विभाग या गंभीर तक्रारीची किती गांभीर्याने दखल घेतो, पतसंस्थेच्या कारभाराचे ऑडिट करून सत्य बाहेर काढतो आणि गोरगरीब ठेवीदारांना त्यांच्या हक्काची रक्कम परत मिळवून देऊन दिलासा देतो का, याकडे संपूर्ण दहिगाव सेवा परिसरासह अंजनगाव सुर्जी तालुक्याचे लक्ष लागले आहे.**दहा दिवसांची 'डेडलाईन'; अन्यथा तीव्र आंदोलन-**ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी प्रशासनाला आणि संस्थेला दहा दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. या दहा दिवसांच्या मुदतीत जर ठेवीदारांचे पैसे परत केले नाहीत, तर प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून आणि संतप्त ठेवीदारांकडून पतसंस्थेसमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

### वीरचक्र विजेते शरदचंद्र देशपांडे

पराक्रमी योद्धा एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र देशपांडे हे वीरचक्राने सन्मानित होणारे पहिले वायुसैनिक आहेत. ते मूळचे दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगई येथील रहिवासी आहेत. त्यांच्या अतुलनीय शौर्याचा सन्मान म्हणून रेल्वे मंत्रालयाने अमरावती रेल्वे स्थानकावर विशेष गौरवशिला उभारली होती. ही गौरवशिला केवळ एक दगड नसून, तो भारतीय हवाई दलाच्या शौर्याचा आणि अमरावतीच्या इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. सध्या इमारतिचे पाड कामात ही शिला दुर्लक्षित झाली आहे. ही शिला काळजीपूर्वक, शास्त्रीय पद्धतीने स्थलांतरित करून रेल्वे स्थानकाच्या दर्शनी आणि वर्दळीच्या ठिकाणी पुन्हा स्थापित करावी, जेणे करून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना आणि विशेषतः युवा पिढीला त्यातून देशभक्तीची आणि सैन्यात भरती होण्याची प्रेरणा मिळेल.जर प्रशासनाने या ऐतिहासिक गौरवशिलेची पुनर्स्थापना केली नाही, तर माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आणि संरक्षण मंत्रालयाकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या वेळी अरविंद चांडक, सुभेदार मेजर प्रदीप गायकवाड, सुभेदार मेजर तुलाराम चांदेकर, हवालदार भीमराव गायकवाड, नायब सुभेदार मारुती भडके, हवालदार प्रदीप पाखरे, तफेदार दिवाकर नागपूरकर, हवालदार मुकुंद गवई, नाईक मारुती सराड, हवालदार पांडुरंग सुर्वे, हवालदार नारायण किर्तकार, हवालदार रामेश्वर पुरी, अजय देशपांडे आदी माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अमरावतीत ब्लिंकिट डिलिव्हरी

सुरू केले आणि पैशांची मागणी करू लागला.

भीती दाखवण्यासाठी त्याने मुलीचे फोटो घेऊन ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. मुलीने त्याच्या या वर्तनाला विरोध केला, तरीही तो तिला धमकावत राहिला आणि 'मी तुला पसंद करतो' असेही म्हणू लागला.पोलिसांच्या म्हणण्यानुसार, घाबरलेल्या मुलीने आरोपीला १०० रुपये ऑनलाईन पाठवले देखील. मात्र १०० रुपये मिळाल्या नंतरही त्याची पैशांची मागणी थांबली नाही. तो वारंवार धमकावून पैसे मागत राहिला.

अखेर या त्रासाला कंटाळून मुलीने आपल्या वडिलांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर वडिलांसह ती गाडगेनगर पोलीस ठाण्यात पोहोचली आणि घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. मुलगी आणि तिच्या वडिलांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपी आदिल खान याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८(२), ३०८(२), ३५१(२) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ८ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणात इलेक्ट्रॉनिक पुरावे गोळा केले जात आहेत. तक्रारदाराचा जबाब नोंदवण्यात आला असून एफएसएल मार्फत तपासणी आणि वापरलेल्या वाहनाची तपासणी केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.आरोपीने केलेले फोन कॉल्स, व्हॉट्सअप मेसेज, फोटो आणि पैशांचे व्यवहार यासह इतर डिजिटल पुरावे गोळा केले जात आहे.प्रकरणाचा अधिक तपास गाडगेनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रणित पाटील हे करत आहेत.

### चांदूर रेल्वेत मुद्रांक विक्रेत्यांकडून

रुपयांचा स्टॅम्प ११० रुपयांना मिळेल, असे सांगितल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

'सरकारी दराने मुद्रांक व तिकिटे विक्री करण्याची व्यवस्था असताना जादा पैसे आकारून सर्वसामान्यांची उघडपणे पिळवणूक का?' असा सवाल उपस्थित करत देशमुख यांनी या प्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. चांदूर रेल्वे शहरातील सर्वच मुद्रांक विक्रेते तिकीट व स्टॅम्पचे जादा दर आकारत असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असून विद्यार्थी, बेरोजगार आणि शासकीय कार्यालयातील विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. मुद्रांक विक्रेत्यांना परवाने देतांना जनतेची सोय आणि पारदर्शकता महत्त्वाची असताना, मुजोरपणे वागणाऱ्या विक्रेत्यांना पाठीशी का घातले जात आहे? असा संतप्त सवालही उपस्थित करण्यात आला आहे. संबंधित विक्रेत्यांची चौकशी करून दोष आढळल्यास त्यांचे परवाने रद्द करावेत आणि गरजू व होतकरू व्यक्तींना नियमाप्रमाणे नवीन परवाने देऊन नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने या तक्रारीची तातडीने दखल घेऊन मुद्रांक विक्रेत्यांच्या कार्यालयीन उपस्थितीची तसेच तिकीट व स्टॅम्पच्या विक्री दरांची तपासणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा २० सप्टेंबर २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा हर्षल देशमुख यांनी दिला आहे.

आता प्रशासन जादा दर आकारणाऱ्या मुद्रांक विक्रेत्यांवर कारवाई करणार का आणि नागरिकांची कथित लूट थांबणार का, याकडे चांदूर रेल्वेकरांचे लक्ष लागले आहे.

### उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना

विचार करून राज्य सरकारने हा प्रश्न अधिक काळ चिघळवत न ठेवता तात्काळ उपवर्गीकरण करण्याचा निर्णय मागे घेतला पाहिजे अन्यथा आगामी काळात सरकारच्या विरोधात आंबेडकरी जनतेचे तीव्र आंदोलन पेटल्याशिवाय राहणार नाही असा इशारा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चरणदास इंगोले यांनी दर्यापूर येथे उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना मार्चच्या आगमनाप्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित करताना दिला आहे.

उपवर्गीकरणाच्या विरोधातील लढा अधिक तीव्र करण्यासाठी व जिंकण्याचा निर्धार करण्यासाठी चरणदास इंगोले यांच्या नेतृत्वात विदर्भात सुरू करण्यात आलेल्या उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना मार्च च्या पार्श्वभूमीवर दि.३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता दर्यापूर येथे भेट दिली असता सर्वप्रथम नगरपरिषद जवळ असलेल्या संविधान चौकातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर दुपारी ३ वाजता विदर्भव्यापी संघर्ष चेतना मार्चचे प्रणेते चरणदास इंगोले यांच्या नेतृत्वात दर्यापूर येथील एस.डी.ओ.यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने निवेदन सादर करून उपवर्गीकरण करण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.याप्रसंगी पीरिपाचे तालुकाध्यक्ष व पंचायत समितीचे माजी सभापती रामेश्वर इंगळे, मुकुंद ढोके ,मनोहर कुऱ्हाडे,पांडुरंग भगत,बापूराव वानखडे,एस.डी. लहूपंचांग,सुभाष पडघामोड, सिद्धार्थ मोहोड,सुधीर बसवंत, बाबुराव थोरात ,गौतम इंगळे,प्रदीप ढवळे,हिरालाल इंगळे, गणेश वाकपांजर यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### अमरावतीच्या विकासासाठी

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध विकासकामांसाठी योजनांची आखणी करण्यात येईल. तसेच या योजनांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून त्या यशस्वीपणे राबविण्याचा मानस श्री. जामि यांनी व्यक्त केला.यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी हुडकोच्या कार्याचे कौतुक केले. हुडकोने यापूर्वी अनेक महत्त्वपूर्ण विकास योजना यशस्वीपणे राबविल्या असून, अमरावती शहराच्या विकासासाठीही हा विभाग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे त्यांनी सांगितले. अमरावती शहराला संपूर्ण महाराष्ट्रात विकासाच्या दृष्टीने पुढे नेण्यासाठी हुडकोच्या माध्यमातून प्रयत्न करता येतील. तसेच राज्य शासन व केंद्र शासनाच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी पाठपुरावा करता येईल, असेही डॉ. बोंडे यांनी स्पष्ट केले.या बैठकीला महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे-पाटील, आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, सभागृह नेता चेतन गावंडे यांच्यासह संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.बैठकीच्या प्रारंभी हुडको मुंबई क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकारी निरीक्षक मुरली कृष्ण जामि, संयुक्त महाप्रबंधक संतोष देवगिरीकर आणि संयुक्त महाप्रबंधक प्रीती सी. एस. यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.अमरावती शहरातील पायाभूत सुविधा, नागरी विकास आणि विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी हुडकोची भागीदारी उपयुक्त ठरण्याची अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७७६/२०२६**
**अनिता व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.०३.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**

1. **Anita Ashok Gupta,** Age 67 years. Occu.: Household R/o. Behind Kadbi Bazar, Gawalipura, Amravati
2. **Anshul Ashok Gupta,** Age 41 years. Occu.: Business R/o. Behind Kadbi Bazar, Gawalipura, Amravati
3. **Anand Ashok Gupta,** Age 43 years. Occu.: Business R/o. Behind Kadbi Bazar, Gawalipura, Amravati
4. **Deepa Amit Gupta,** Age 49 years. Occu.: Business R/o. Flat No. 105, Tejas Apartment, Balaji Plot, Amravati
5. **Meena Sanjay Gupta,** Age 50 years. Occu.: Household R/o. Near Amey Apartment, Sharda Nagar, Amravati
6. **Jyoti Pankaj Nathwani,** Age 46 years. Occu.: Household R/o. Shiv Chowk, Madhymaeshwar Ward, Washim

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अशोक अंबादास गुप्ता** हे दिनांक **१८.०७.२०२०** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार अनिता व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिता व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४


paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


### वेदांत नगरातील नाली, सांडपाणी व सापांच्या वाढत्या उपद्रवाचा प्रश्न गंभीर

## कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अंतिम स्मरणपत्र

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील वेदांत नगर परिसरात अपूर्ण नाली बांधकाम, सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, वाढलेली झाडी तसेच सापांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करीत वेदांत नगरातील रहिवाशांच्या वतीने हरिचंद्र महादेव मेश्राम यांनी जिल्हाधिकारी, वाशिम यांना अंतिम स्मरणपत्र सादर केले आहे.



अर्जानुसार, कारंजा नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नं. १८२/२ मधील ६८ आर क्षेत्रामध्ये रामा क्र. एनएपी ३४/काळी/३/१९९९-२००० दिनांक २० जून १९९९ रोजी मंजूर करण्यात आलेल्या ले-आऊटमध्ये अनेक वर्षांपासून नागरिक कुटुंबासह वास्तव्यास आहेत. मात्र, या परिसरातील नालीचे काम सुमारे ७५ टक्के अपूर्ण अथवा बंदिस्त अवस्थेत असल्याने सांडपाणी व पावसाचे पाणी योग्य प्रकारे वाहून जात नसल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

परिसरातील पाण्याचा निचरा न झाल्याने अनेक ठिकाणी पाणी साचून राहत असून त्यामुळे अस्वच्छता वाढली आहे. तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात झाडी वाढून जंगलासारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. या झाडाझुडपांमुळे सापांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. अर्जदाराने ले-आऊट मालकावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व संबंधित कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. अर्जानुसार, कॉलनीमधील जोडरस्ते उपलब्ध करून देणे आवश्यक असताना पश्चिम, उत्तर व दक्षिण दिशेने भूखंड टाकून मार्ग बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

**आरोग्याच्या धोक्याबाबत नागरिकांमध्ये चिंता**

परिसरात साचलेल्या पाण्यामुळे व अस्वच्छ वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे अर्जदाराने म्हटले आहे. परिसरातील काही व्यक्तींना गंभीर आजार झाल्याचा उल्लेख अर्जात करण्यात आला असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढलेल्या झाडाझुडपांमुळे सापांचा वावर वाढल्याची तक्रारही करण्यात आली आहे. ले-आऊट मालकाच्या नावावर परिसरात अनेक भूखंड असून त्यांची स्वच्छता व देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित भूखंडधारकांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. मात्र, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**जबाबदारी निश्चित करण्याची मागणी**

वेदांत नगरातील सांडपाणी, पावसाच्या पाण्याचा निचरा, अपूर्ण नाली व्यवस्था, बंद झालेले मार्ग आणि वाढलेली झाडी यामुळे नागरिकांच्या आरोग्य व जीवितास भविष्यात धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित विभाग व व्यक्तींची जबाबदारी निश्चित करावी, नाल्यांची स्वच्छता व आवश्यक बांधकाम पूर्ण करावे, साचलेल्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी तसेच वाढलेली झाडी हटवून सापांच्या वाढत्या उपद्रवापासून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अर्जदार हरिचंद्र महादेव मेश्राम यांनी १ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या अंतिम स्मरणपत्रात, सात दिवसांच्या आत संबंधित निवेदनाची दखल घेऊन ठोस कार्यवाही करावी व वेदांत नगरातील नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता योजनेच्या कामांना गती द्या!

### आ. श्याम खोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभा स्तरीय समितीची आढावा बैठक

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता योजनेअंतर्गत मंगरूळपीर-वाशिम विधानसभा मतदारसंघातील शेत पांदन रस्त्यांच्या कामांना गती देऊन शेतकऱ्यांना दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विधानसभा स्तरीय समितीची आढावा बैठक बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी मंगरूळपीर तहसील कार्यालयातील नवीन सभागृहात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष तथा आमदार श्याम खोडे होते.

बैठकीस समितीचे सहअध्यक्ष डॉ. सुभाष नानोटे, समिती सदस्य पांडुरंग कोठाळे, बाळू पाटील, विनोद जाधव, गोटे, भेंडकर यांच्यासह समितीचे सदस्य सचिव तथा उपविभागीय अधिकारी रवी काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर, तहसीलदार पळसकर, तहसीलदार मंगरूळपीर अनासुने, गटविकास अधिकारी मंगरूळपीर सारिका कारले, गटविकास अधिकारी वाशिम सोनवणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चेके, जिल्हा परिषद उपविभागीय अभियंता खोडवे, तालुका कृषी अधिकारी मंगरूळपीर इंगोले, तालुका कृषी अधिकारी वाशिम तसेच भूमी अभिलेख विभागाचे तालुका निरीक्षक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत मंगरूळपीर तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांचा तसेच तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करण्यात आलेल्या शेत पांदन रस्त्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामांना आवश्यक त्या प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून गती देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

येत्या पंतप्रधानांच्या जन्मदिवसानिमित्त तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता योजनेअंतर्गत विविध कामांना सुरुवात करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश आमदार श्याम खोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## पीडीकेव्ही आदर्श ग्राम शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | रिसोड ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सन्माननीय कुलगुरू डॉ शरदजी गडाख यांचे मार्गदर्शन व नेतृत्वाखाली नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्प अंतर्गत वाशिम जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात निवडलेल्या एका गावामध्ये मॉडेल व्हिलेज म्हणजे आदर्श ग्राम ही संकल्पना कृषी विज्ञान केंद्र कृषी विभाग कृषी महाविद्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व इतर कृषी व कृषी पूरक विभागाच्या समन्वयातून राबविणे सुरू आहे या उपक्रमांतर्गत मानोरा तालुक्यातील मौजे गिरोली या गावात दिनांक १ सप्टेंबर २०२६ ला शेतकरी शास्त्रज्ञ व अधिकारी सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा यांची उपस्थिती लाभली या व्यतिरिक्त या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरामध्ये कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम येथील कीटक शास्त्रज्ञ संकल्पना शेतकऱ्यासमोर मांडली.

## 'पावसाचा प्रत्येक थेंब वाचवा; उद्याचे वाशिम जलसंकटापासून वाचवा!'

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पाणी म्हणजे जीवन आणि पाण्याचा प्रत्येक थेंब म्हणजे भविष्यातील सुरक्षिततेची हमी. आज शहराच्या वाढत्या लोकसंख्येसोबत पाण्याची गरजही झपाट्याने वाढत आहे. भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई आणि भूजल पातळीतील घट यांचा गांभीर्याने विचार करून वाशिम शहरात 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'चा व्यापक अवलंब करून पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरविण्याची लोकचळवळ उभी करावी, असे जनहितार्थ आवाहन भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष घनश्यामजी मंत्री यांनी केले आहे. वाशिम नगरपरिषद हद्दीतील सर्व शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालयांच्या इमारती, रुग्णालये, मोठ्या फ्लॅट स्कीम्स व गृहनिर्माण सोसायट्या, मोठी व्यापारी संकुले, लेआउटमधील खुल्या जागा तसेच शहरातील नागरिकांची स्वतःची घरे या सर्व ठिकाणी पावसाचे पाणी संकलित करून त्याचे भूजल पुनर्भरण करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगची प्रभावी व्यवस्था उभारण्यात यावी, असे त्यांनी म्हटले आहे.

**नवीन बांधकामांनी दाखवावा आदर्श!**

शहरात सध्या सुरू असलेल्या प्रत्येक नवीन बांधकामामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था आवर्जून करण्यात यावी. बांधकामाच्या आराखड्यातच पावसाच्या पाण्याच्या संकलनाचा व पुनर्भरणाचा विचार केला, तर भविष्यात त्याचा मोठा फायदा शहराला होऊ शकतो. आज मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी वाहून जाते. हेच पाणी योग्य पद्धतीने संकलित करून जमिनीत मुरविल्यास भूजल पातळी वाढण्यास, विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा टिकविण्यास आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते.

**'आजचा थेंब, उद्याची तहान!'**

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पाणी उपलब्ध असतानाच त्याचे संवर्धन करणे ही खरी दूरदृष्टी आहे. त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग ही केवळ शासकीय योजना किंवा बांधकामाशी संबंधित बाब न राहता ती प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आणि भविष्यातील पिढ्यांप्रती आपले कर्तव्य बनले पाहिजे. 'पाऊस काही दिवस पडतो; मात्र त्याचा प्रत्येक थेंब जपला तर वर्षभराची पाण्याची चिंता कमी होऊ शकते. आज आपण पाण्याचे संवर्धन केले, तर उद्याच्या पिढीला पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ येणार नाही,' असा संदेश मनीष मंत्री यांनी दिला.

**माहिती व मार्गदर्शनासाठी संपर्काचे आवाहन**

रेन वॉटर हार्वेस्टिंगची आवश्यकता, त्याची अंमलबजावणी, पावसाच्या पाण्याचे संकलन व भूजल पुनर्भरण याबाबत नागरिकांना किंवा संस्थांना काही माहिती अथवा मार्गदर्शन आवश्यक असल्यास त्यांनी मनीष घनश्यामजी मंत्री यांच्याशी संपर्क साधावा.



'थेंब थेंब जपूया वाशिमचे भविष्य घडवूया!' या संकल्पनेतून नागरिक, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, बांधकाम व्यावसायिक आणि व्यापारी वर्गाने एकत्रित पुढाकार घेतल्यास 'जलसुरक्षित वाशिम' घडविण्याची दिशा निश्चितच मिळू शकते.

जनहितार्थ आवाहन
**मनीष घनश्यामजी मंत्री**
भाजपा शहराध्यक्ष, वाशिम

## कुऱ्हाडीने गंभीर दुखापत केल्याप्रकरणी महिलेस एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

कुऱ्हाडीने गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी महिलेला एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व १० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. दंडाच्या रकमेपैकी ८ हजार रुपये जखमीस नुकसान भरपाई म्हणून देण्याचा आदेश येथील न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ख्वाजा कलाल यांनी २ सप्टेंबर रोजी दिला आहे.

अधिक माहितीनुसार दि.४ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी सात वाजता बिटोडा भोयर, ता. मंगरुळपीर येथे घरासमोरील अंगणात कौटुंबिक वादातून आरोपींमध्ये व फिर्यादीच्या कुटुंबीयांमध्ये वाद झाला. या वेळी आरोपी महिला हिने कुऱ्हाडीने संतोष कोंडीराम लोंढे यांच्या चेहऱ्यावर वार करून गंभीर दुखापत केली. या घटनेमध्ये संतोष यांच्या नाकाचे हाड फॅक्चर झाले होते.या प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे.या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सन्मती महावीर बाकलीवाल, सहायक सरकारी अभियोक्ता, मंगरुळपीर सन्मती महावीर बाकलीवाल यांनी प्रभावीपणे कामकाज पाहिले. तसेच जखमीस न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस उपविभागीय अधिकारी विशाल क्षिरसागर, आसेगावचे ठाणेदार रामकृष्ण भाकडे, , मपोशि. सरुबाई हिमगिरे (पैरवी अधिकारी) तसेच ए.एस.आय. ज्योती डोंगरदिवे व पो.शि. विशाल फुफुटे यांचे सहकार्य लाभले.


### जाहीर नोटीस

**परिशिष्ट ब आदेशिका क्रमांक १**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, दिग्रस**
**श्री. बी.एन. गोडबोले यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दिग्रस, दिग्रस, यवतमाळ.**

दावा निकालात काढण्यासाठी समन्स
(आदेश ५, नियम १, ५)
सरनामा

नियमित दिवाणी दावा/११/२०२०
अनंत रामकृष्ण देव वि. वसंत रामकृष्ण देव व इतर
पुढील तारिख : ३०-०९-२०२६

प्रति,
रमेश वसंतराव काळे
वय :
पत्ता : रा. गोकुळनगर मानोरा.

ज्याअर्थी अनंत रामकृष्ण देव, यांनी तुमच्याविरुध्द बद्यल या न्यायालयात दावा दाखल केला आहे; म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी ३०-०९-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने, किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो वादासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्याच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे, तुमच्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेऊ इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुमची तयारी असलीच पाहिजे. उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी. आज २५-०८-२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का


**आदेशानुसार**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर दिग्रस


## शेतकऱ्याच्या गोठ्याला भीषण आग; सुमारे ५ लाख रुपयांचे नुकसान

### ३ जनावरांसह शेती साहित्य जळून खाक

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील मौजे चिंचाबांभर शेत शिवारात एका शेतातील गोठ्याला दिनांक २ सप्टेंबर रोजी रात्रीच्या ८ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. रामेश्वर अश्रुजी जायभाये रा.कंकरवाडी अशी शेतकऱ्याचे नाव असुन या आगीत गोठ्यातील ३ जनावरे तसेच शेतीसाठी ठेवण्यात आलेले विविध साहित्य जळून ५ लाख रु चे मोठे नुकसान झाले आहे. याबाबत माहिती अशी की रामेश्वर जायभाये हे दैनंदिन प्रमाणे आपल्या शेतातील गोठ्यात आपली जनावरे बांधून त्यांना चारापाणी करत गोठा बंद करून संध्याकाळी आपल्या घरी



गेले.यादरम्यान ८ वाजताच्या दरम्यान शेतातील शेजाऱ्याने त्यांना फोन करून गोठ्याला आग लागल्याची माहिती दिली आग विझवण्या साठी कोणते प्रकारचे साधन नसल्याने आगीवर नियंत्रण मिळवता आले नाही. जायभाये हे आपल्या परिवाराच्या अन्य सदस्य सोबत गोठ्यावर पोहोचण्यापूर्वीच सर्व जळून खाक झाले होते. गोठ्याला आग लागताच आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने गोठ्यातील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.या दुर्घटनेत दोन गायी, एक गोऱ्हा तसेच शेती उपयोगी साहित्य स्प्रिंकलर संच, प्रेशर पंप, चार्जिंग पंप, ड्रिप बंडल, हळदीचे खत बैग, ताडपत्री गोठ्याचे साहित्य आणि इतर वस्तूंचे नुकसान झाले आहे.आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नसुन या आगीत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, शासनाकडून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.घटनेचा पंचनामा तलाठी प्रज्ञा गरकळ यांनी केला असून अहवाल शासन दरबारी पाठवला आहे.

## रिठद येथील सेवानिवृत्त शिक्षक जयराम आरु यांचे वाशिम मेडिकल कॉलेजला देहदान

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील रिठद येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व व सेवानिवृत्त शिक्षक स्व. जयराम सूर्याजी आरु यांनी मृत्यूनंतरही समाजासाठी काहीतरी देण्याचा आदर्श घालून दिला. दि. १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.५८ वाजता त्यांचे निधन झाले. त्यांनी २०१८ मध्येच देहदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या इच्छेनुसार कुटुंबीयांनी पुढाकार घेत त्यांचा देह वाशिम मेडिकल कॉलेजला दान केला. हे वाशिम जिल्ह्यातील पहिले देहदान असल्याचे सांगण्यात आले.

स्व. जयराम आरु हे रिठद गावातील ज्येष्ठ नागरिक असून, सेवानिवृत्त शिक्षक म्हणून त्यांनी सेवा बजावली होती. जनसेवेची आवड आणि सामाजिक बांधिलकी असलेल्या आरु यांनी आपल्या निधनानंतर देह वैद्यकीय शिक्षणासाठी उपयोगी पडावा, अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या या संकल्पाचा आदर करत ज्येष्ठ सुपुत्र जगन्नाथ आरु आणि लहान मुलगा सुरेश आरु यांनी वडिलांची इच्छा पूर्ण केली. वाशिम जिल्हा ग्रामीण रुग्णालयातील डॉ. सुनील कावरखे तसेच मेडिकल कॉलेजचे डॉ. वाडेकर यांच्या सहकार्याने नेत्रदानाची प्रक्रिया करण्यात आली. डॉ. ठाकरे व डॉ. साळवे यांनी स्व. जयराम आरु यांचे नेत्रदानासाठी डोळे संकलित केले. त्यानंतर देहदानाची प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा देह वाशिम मेडिकल कॉलेजला पाठविण्यात आला.



मेडिकल कॉलेजकडे देह सुपूर्द करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ज्येष्ठ सुपुत्र जगन्नाथ आरु, लहान मुलगा सुरेश आरु तसेच कुटुंबातील सदस्य ॲम्बुलन्ससोबत वाशिम येथे गेले. यावेळी अजय जगन्नाथ आरु, भानुदास आरु, चंद्रकांत आरु, संजय आरु, नारायण आरु, राजेंद्र आरु, विठ्ठल आरु, मारोती आरु यांच्यासह कुटुंबीय, नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते.


### नावात बदल - जाहीर नोटीस

मी, बालयोगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी असून माझे जुने नाव - **गोपाल गुलाबराव देशमुख** असे होते. आता माझे नवीन नाव - **बालयोगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी** (Balyogi Gopalnathji Yogi Balaknathji) माझे सर्व शासकीय, निमशासकीय, बँक व इतर सर्व व्यवहार, पत्रव्यवहार माझ्या नवीन नावाने करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.दोन्ही नावाची व्यक्ती एकच असून त्याबद्दल काहीही दुमत नाही. याकरिता ही जाहीर नोटीस देण्यात आली आहे.

**पत्ता -**
**योगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी,**
मु. पो. रत्नगड, जि. हिंगोली.
जुने नाव - Gopal Gulabrao Deshmukh
नवीन नाव - Balyogi Gopalnathji Yogi Balaknathji


## प्रलंबित विकासकामांसाठी आमरण उपोषणाचा इशारा; तहसीलदारांना निवेदन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

तालुक्यातील धनज बुद्रुक गावातील विविध प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, या मागणीसाठी ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते विशाल अघमेयांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन तसेच संबंधित विभागांकडे पाठपुरावा करूनही मागण्यांची ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ७ सप्टेंबर रोजी सकाळी साढे १० वाजता कारंजा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा देण्यात आला आहे धनज बुद्रुक येथील ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात



गावातील मूलभूत नागरी सुविधा आणि अनेक महिन्यांपासून रखडलेल्या

विकासकामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धनज बुद्रुक ते भामदेवी हिवरा-लाहे या मुख्य मार्गाचे नवीन व दर्जेदार दुहेरी पदरी डांबरीकरण करण्यात यावे, अशी ग्रामस्थांची प्रमुख मागणी आहे. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांची तसेच शेतकरी, विद्यार्थी आणिवाहनधारकांची मोठी ये-जा होत असल्याने रस्त्याची तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. धनज बुद्रुक येथील प्राथमिक आरोग्य वर्धिनी केंद्रात १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबरोबरच कायमस्वरूपी एमबीबीएस डॉक्टरची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी ही सुविधा अत्यावश्यक असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. रमाबाई आंबेडकर कॉलनीतील गढ़ सर्व्हे क्रमांक १३५ मधील अतिक्रमित रहिवाशांचे निवासस्थान नियमित करून शासनाच्या धोरणानुसार घरकुलाचा लाभ व नमुना मालकी हक्क देण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना व आवास प्लस २०२४ अंतर्गत पात्र आणि प्रलंबित लाभार्थ्यांना तातडीने घरकुलाचा लाभ मिळावा, अशी मागणी आहे. जिल्हा परिषद उर्दू शाळेच्च्या बाजूच्या रस्त्याचे नवीन कॉंक्रिटीकरण, मोहनलाल भन्साळी शाळेच्या रस्त्याचे नवीन डांबरीकरण तसेच तेलीपुरा ते ग्रामपंचायत कार्यालय या रस्त्याचे नवीन कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७८ ■ शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## ७७ लाखांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर जप्तीचा आदेश

### बेलीफ पोहोचताच प्रशासनाची तारांबळ ; महिनाभरात मोबदल्याचे लेखी आश्वासन

**वर्धा जनमाध्यम :** धरणासाठी शेतजमीन घेतली, न्यायालयाने शेतकऱ्याच्या बाजूने निकाल दिला मात्र वाढीव मोबदला देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ सुरूच राहिल्याने अखेर प्रकरण थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जप्तीपर्यंत पोहोचले. आर्वी तालुक्यातील मोरांगणा धरणासाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या वाढीव मोबदल्यापोटी ७७ लाख ९६ हजार ३६३ रुपये न दिल्याने न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी गुरुवारी बेलीफ जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाला. त्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली. अखेर एका महिन्यात वाढीव मोबदला देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावर



जप्तीची नामुष्की टळली.

मोरांगणा येथील धरणासाठी विनायक किसन वाघमारे यांच्या मालकीची १.५ हेक्टर शेतजमीन मृद व जलसंधारण विभागाने अधिग्रहित केली होती. त्यावेळी जमिनीचा नाममात्र मोबदला देण्यात आल्याने वाघमारे यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. हे प्रकरण वर्धा येथील न्यायालयात सुरू होते.

मार्च २०२५ मध्ये न्यायालयाने शेतकऱ्याच्या बाजूने निर्णय दिला. दरम्यान, विनायक वाघमारे यांचे निधन झाले. मात्र त्यांच्या कुटुंबाला न्यायालयाने ठरवून दिलेला वाढीव मोबदला मिळाला नाही.

मोबदल्यासाठी वाघमारे कुटुंबाने पुन्हा न्यायालयीन लढा सुरू ठेवला. ॲड. विजय चोरे यांनी वाघमारे कुटुंबाची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यानंतर आर्वी येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयाने ७७ लाख ९६ हजार ३६३ रुपयांची रक्कम अदा न केल्याप्रकरणी थेट जिल्हाधिकारी कार्यालयाविरुद्ध जप्तीचा आदेश पारित केला.

### बेलीफ पोहोचला अन् प्रशासनाची धावपळ

या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आर्वी न्यायालयातील बेलीफ विश्वनाथ महल्ले आणि विनायक वाघमारे यांचा मुलगा हेमंत वाघमारे गुरुवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले. न्यायालयाचा आदेश आणि जप्तीची कारवाई असल्याचे समोर येताच प्रशासनाची धावपळ सुरू झाली. हा प्रकार जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. त्यानंतर प्रकरण उपजिल्हाधिकारी संजीव जाधवार यांच्याकडे सोपविण्यात आले.

जाधवार यांनी तातडीने मृद व जलसंधारण विभागाच्या उपकार्यकारी अभियंता निकीता देशमुख यांना जिल्हाधिकारी कार्यालयात पाचारण केले. त्यानंतर दुपारी चार वाजेपर्यंत अधिकाऱ्यांमध्ये वाढीव मोबदल्याची रक्कम कशी अदा करायची, यावर खलबते सुरू होती.

अखेर चर्चेतून तोडगा काढत मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका महिन्याच्या आत वाघमारे कुटुंबाला वाढीव मोबदल्याची संपूर्ण रक्कम देण्याचे लेखी आश्वासन दिले. वाघमारे कुटुंबाने या आश्वासनास संमती दर्शविल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार होणारी जप्तीची कारवाई थांबविण्यात आली. न्यायालयाचा आदेश धडकताच प्रशासनाला जाग आली आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर ओढवलेली जप्तीची नामुष्की अखेर टळली.

## प्रोजेक्टच्या आमिषाचा धक्कादायक 'फंडा'

### संस्थाचालकाच्या खात्यातून २.०९ कोटी फिरवले, मोबाईल ताब्यात घेऊन गैरवापर केल्याचा आरोप; दोघांवर गुन्हा दाखल

**हिंगणघाट जनमाध्यम :** शेअर मार्केटिंग प्रोजेक्टचे आमिष दाखवून संस्थाचालकाकडून ३९ हजार रुपये उकळल्यानंतर त्याच्याच बँक खात्याचा गैरवापर केल्याचा धक्कादायक प्रकार हिंगणघाटमध्ये उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित खात्यातून तब्बल २ कोटी ९ लाख ११ हजार रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

इंदिरा गांधी वॉर्डातील रहिवासी सचिन भूदेव बरडे (४२) हे शैक्षणिक संस्था चालवितात. त्यांच्या संस्थेत काजल भगत, प्रज्वल तळवेकर आणि आकाश ठमके काम करतात. आकाश ठमके याने त्याचे मामा विनोद बळवंत सोनटक्के हे शेअर मार्केटिंग प्रोजेक्टचे काम करीत असल्याचे सांगून बरडे यांची सोनटक्के यांच्याशी भेट घडवून आणली.

सोनटक्के याने प्रोजेक्टची माहिती देत नोंदणीसाठी ३९ हजार रुपये भरण्यास सांगितले. यावेळी बरडे यांनी त्याला बँक पासबुक, पॅनकार्ड आणि आधारकार्ड दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर प्रोजेक्टच्या कामासाठी सोनटक्के बरडे यांना दिल्ली येथे घेऊन गेला. तेथे हॉटेलमध्ये मुक्काम असताना सोनटक्के याने बरडे यांचा मोबाईल ताब्यात घेऊन त्यातील माहिती मिळविल्याचा आरोप आहे. दरम्यान, बरडे यांच्या बँक खात्यातील रक्कम जवळपास शून्य झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संशय आल्याने त्यांनी प्रोजेक्ट करण्यास नकार देत पैसे परत मागितले. दिल्लीहून परतल्यानंतर मात्र त्यांच्या खात्यातून २ कोटी ९ लाख ११ हजार रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले.

प्रकार लक्षात येताच बरडे यांनी बँकेत धाव घेत खाते ब्लॉक करण्याची विनंती केली आणि हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी वर्धा येथील स्टेशनफैल परिसरातील विनोद सोनटक्के आणि शास्त्री वॉर्डातील आकाश ठमके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे.

## कारमध्ये तंबाखूचा काळा धंदा; झेंडा चौकात पोलिसांचा दणका

### प्रतिबंधित सुगंधित तंबाखूसह १.४४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**समुद्रपूर जनमाध्यम :** प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या तरुणाला समुद्रपूर पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकासोबत संयुक्त कारवाई करत पकडले. झेंडा चौकात करण्यात आलेल्या या कारवाईत कारसह सुमारे १ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सौरभ अरुण डफ (२६, रा. मांडगाव) असे आरोपीचे नाव आहे.

बुधवारी, २ सप्टेंबर रोजी सौरभ डफ हा पांढऱ्या रंगाच्या कारमधून प्रतिबंधित सुगंधित तंबाखू घेऊन समुद्रपूरकडे येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी झेंडा चौकात नाकाबंदी केली. यावेळी एमएच ४३ एएफ ३४५७ क्रमांकाची कार अडवून तिची झडती घेण्यात आली. कारमध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आढळून आल्याने पोलिसांनी कारसह तंबाखूचा साठा जप्त केला.

अन्न सुरक्षा अधिकारी पीयूष वसंत मानवतकर यांच्या उपस्थितीत जप्त मुद्देमालाचा पंचनामा करण्यात आला. याप्रकरणी सौरभ डफ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास समुद्रपूर पोलिस करीत आहेत.

## दहशत माजविण्यासाठी चाकू बाळगणाऱ्यास अटक

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील स्टेशनफैल परिसरात धारदार चाकू बाळगून दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या तरुणास वर्धा शहर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास अटक केली. पंकज रविंद्र येंडाळे (२८, रा. स्टेशनफैल, वर्धा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी पहाटे स्टेशनफैल परिसरात पंकज येंडाळे हा संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. त्याच्याकडे लोखंडी धारदार तसेच दाते असलेला चाकू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो चाकू बाळगत असल्याचा संशय असल्याने पोलिसांनी त्याला तातडीने ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान त्याच्याकडून धारदार चाकू जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिस हवालदार सुहास सुरेश चांदोरे यांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांची करडी नजर असून, अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. ही कारवाई सुहास चांदोरे, सचिन भारशंकर, मनोज काकपुरे, नवनित वानखेडे आणि उमेश कुंभरे यांच्या पथकाने केली.

## मातंग समाजाच्या अवमानाचा आरोप; नितेश कराळेंविरोधात पोलिसांत तक्रार

**आर्वी जनमाध्यम :** मातंग समाजाबाबत कथित आक्षेपार्ह व अश्लील वक्तव्य केल्याच्या आरोपावरून नितेश कराळे यांच्याविरोधात राष्ट्रीय लहू शक्तीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. कराळे यांच्या वक्तव्यामुळे मातंग समाजाच्या भावना दुखावल्या असून सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचा आरोप करीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. संबंधित वक्तव्यांची चौकशी करून नितेश कराळेंविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

नितेश कराळे हे गावरान शैलीत राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य करतात. व्यंगात्मक विश्लेषणाच्या नावाखाली विशिष्ट समाजाबाबत आक्षेपार्ह भाषा वापरली



जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. अशा वक्तव्यांमुळे समाजात असंतोष निर्माण होऊन सामाजिक शांततेला बाधा पोहोचू शकते, असा दावा तक्रारदारांनी केला.

कराळे यांच्याविरुद्ध यापूर्वी दाखल झालेल्या प्रकरणाचा संदर्भ देत पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या जामीन प्रक्रियेबाबतही कायदेशीर पडताळणी करण्याची भूमिका घेतली आहे. तसेच भविष्यात कोणत्याही समाजाच्या भावना दुखावणारी वक्तव्ये होऊ नयेत, यासाठी कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. पोलिस निरीक्षक सतीश डेहनकर यांना निवेदन देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त राजेश अहिव यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय लहू शक्तीचे जिल्हा उपाध्यक्ष कमलेश लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली धीरज शिंदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. तक्रारीची चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## पिपरी मेघे येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा जनमाध्यम :** पिपरी मेघे येथील गजानननगर वॉर्ड क्रमांक २ मध्ये ३५ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी दुपारी घडली.



मयूर दिनकरराव काकडे असे मृत युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,गुरूवारी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास घरात कोणीही नसताना मयूर याने घरातील स्टोअररूममध्ये स्लॅबच्या लोखंडी कडीला दोरी बांधून गळफास घेतला. काही वेळाने हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर कुटुंबीयांनी याची माहिती पोलिसांना दिली.

घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मृत मयूर काकडे यांच्या पश्चात वडील दिनकर काकडे, पत्नी आणि लहान मुलगी असा परिवार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रामनगर पोलिस ठाण्याचे जमादार उमंग मसराम आणि किरण कुरटकर करीत आहेत.

## राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेचा दिमाखदार समारोप; विजेत्यांचा गौरव

### राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्हा अमेच्युअर टेबल टेनिस असोसिएशनच्या वतीने आयोजित चौथ्या महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील विजेते, उपविजेते आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. विविध गटांतील खेळाडूंना चषक, पदके, प्रमाणपत्रे व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

तालुका क्रीडा अधिकारी संदीप खोब्रागडे, जमीर अख्तर, गणेश येळावार, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष मोहन शाह, असोसिएशनचे अध्यक्ष




अतुलबिहारी पांडे, डॉ. प्रवीण धाकटे, दिनकर काळे, दिनेश जवरे, मनोज शिंदे, डॉ. रवींद्र लांके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात इक्षिका उमाटे विजेती, तर स्वरा करमाकर उपविजेती ठरली. मुलांच्या गटात इशान खांडेकरने विजेतेपद पटकावले, तर प्रणव घोलकर उपविजेता ठरला. महिला गटात प्रिथा वर्तिकर विजेती, तर स्वरा करमाकर उपविजेती ठरली. पुरुष गटात कुशल चोपडा विजेता, तर अनिश सोंटक्के उपविजेता ठरला.समारंभाचे सूत्रसंचालन दीपक कानेटकर यांनी केले. आयोजन सचिव ओम तिवारी यांनी आभार मानले. वर्ध्यात प्रथमच राज्यस्तरीय मानांकन स्पर्धा झाल्याने खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेची अडीच लाखांची फसवणूक

### फेसबुकवर मैत्री करून शारीरिक संबंध; पोलिस असल्याचे भासवून उकळले पैसे

**आर्वी जनमाध्यम :** फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून महिलेची मैत्री संपादन केली. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवत तिच्याशी जवळीक साधून वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आपण महाराष्ट्र पोलिसांत कार्यरत असल्याचे भासवून महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिच्याकडून तब्बल अडीच लाख रुपये घेत फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी गजानन रामदास वानखडे (४५), रा. टाकरखेडा, ता. आर्वी, जि. वर्धा याच्याविरुद्ध आर्वी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) व ६९ अन्वये गुन्हा



दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फेसबुकच्या माध्यमातून संबंधित महिलेशी संपर्क साधला. मैत्री वाढल्यानंतर तिला लग्नाचे आश्वासन दिले. तसेच आपण महाराष्ट्र पोलिसांत कार्यरत असल्याचे सांगून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आर्वी येथील कमलेश कांमडी यांच्या हॉटेलमध्ये महिलेला बोलावून तिच्याशी जवळीक साधल्याचा आरोप आहे.

लग्न करून सोबत राहण्याचे आश्वासन देत आरोपीने महिलेकडून वेळोवेळी पैशांची मागणी केली. पतीच्या निधनानंतर मिळालेल्या पैशांपैकी तब्बल २ लाख ५० हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी सुरुवातीला तिवसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनास्थळ आर्वी पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्याने प्रकरण आर्वी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक महेश राठोड करीत आहेत.

## कामगारानेच कारखाना साफ केला

### दोन लाखांच्या साहित्यावर डल्ला; वेल्डिंग कामगाराविरुद्ध गुन्हा

**आर्वी जनमाध्यम:** कारखान्यात विश्वासाने कामाला ठेवलेल्या कामगारानेच मालकाच्या डोळ्यात धूळफेक करीत तब्बल दोन लाख रुपयांच्या साहित्यावर हात साफ केल्याचा धक्कादायक प्रकार कारंजा घाडगे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सावळी बु. परिसरात उघडकीस आला आहे. या घटनेने कारखाना परिसरात खळबळ उडाली आहे.

आर्वी येथील गणपती वॉर्डातील सचिन किसनलाल पालीवाल यांचा सावळी येथे एचपी पेट्रोल पंपाजवळ सोलर पॅनलचा प्रकल्प आहे. प्रकल्पातील कॅमेरा बंद असल्याने तसेच काही कामगार सुट्टीवर असल्याने कारखान्यातील काम ठप्प होते. दरम्यान, वेल्डिंगचे काम करणाऱ्या ठेकेदार मंगेश सोनवणे यांनी कामासाठी संजय फुकट याला तेथे पाठविले होते. काम पूर्ण झाल्यानंतर तो कारखान्यातच राहत होता. १९ ऑगस्ट रोजी पालीवाल कारखान्यात पोहोचले असता संजय गायब होता. त्याचा मोबाइलही बंद होता.

संशय आल्याने कारखान्याची पाहणी केली असता तीन फेज वेल्डिंग मशीन, सिंगल फेज वेल्डिंग मशीन आणि सुमारे ४०० फूट विद्युत केबल असा जवळपास दोन लाखांचा मुद्देमाल गायब असल्याचे स्पष्ट झाले. सीसीटीव्ही कॅमेरा १८ ऑगस्टपासून बंद असल्याचेही आढळले. अखेर संशयाची सुई संजय फुकटकडे वळली. कारंजा घाडगे पोलिसांनी नागपूर जिल्ह्यातील वडधामना जुनी वस्ती येथील संजय फुकट याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## शिवीगाळीचा वाद रक्तरंजित; लोखंडी रॉडने घाव घालून ४० वर्षीय व्यक्तीची हत्या

**वर्धा जनमाध्यम :** एकमेकांना अश्लील शिवीगाळ केल्याच्या कारणावरून झालेला शाब्दिक वाद विकोपाला जाऊन लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अनिल नारायण मंगरे (४०, रा. धानोरा) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही थरारक घटना बुधवारी रात्री सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल मंगरे आणि आरोपी आकाश गिरीधर वाटगुळे (३०) यांच्यात बुधवारी रात्रीच्या सुमारास अश्लील शिवीगाळीवरून वाद झाला. शाब्दिक बाचाबाची वाढत गेल्यानंतर आरोपी आकाशने लोखंडी रॉड हातात घेत अनिल यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अनिल गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत जखमी अनिल यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित केले. पोलिसांनी आरोपी आकाश वाटगुळे याला ताब्यात घेत त्याच्याकडून हल्ल्यात वापरलेला लोखंडी रॉड जप्त केला.

## ओबीसींच्या मागण्यांसाठी तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे

**हिंगणघाट जनमाध्यम :** ओबीसींच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाच्या वतीने हिंगणघाट तहसील कार्यालयासमोर गुरुवारपासून क्रमिक बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले. संततधार पावसातही आंदोलकांनी ठामपणे आंदोलन सुरू ठेवत शासनाचे लक्ष वेधले.



एससी-एसटीप्रमाणे ओबीसींची स्वतंत्र जातीनिहाय जनगणना करावी, राज्यनिहाय अधिकृत मास्टर जात निर्देशिका तयार करावी, प्रत्येक जातीला स्वतंत्र कोड द्यावा, प्रमाणकीकृत पर्याय आधारित प्रणाली लागू करावी, तसेच जातीनिहाय माहितीचे संकलन व सत्यापन पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने करावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

या मागण्यांसाठी २५ ऑगस्ट रोजी जिल्हा व तहसील मुख्यालयांवर ज्ञापन देण्यात आले होते. मागण्या मान्य न झाल्यास २ सप्टेंबरपासून देशव्यापी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार हिंगणघाटमध्ये आंदोलनाला सुरुवात झाली. यावेळी गेमदेव मस्के, गजानन माऊस्कर, गणेश बारी, लक्ष्मीकांत जवादे, ॲड. संदीप कांबळे, डोमाजी सलाम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# सर्वसमावेशक विकास हाच 'विकसित महाराष्ट्र २०४७'चा मुख्य आधारस्तंभ- मुख्यमंत्री फडणवीस

■ शिक्षक दिनानिमित्त विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक सत्कार ■ राज्यातील सर्व विशेष शिक्षकांचा प्रमाणपत्र देउन गौरव करणार



**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वसमावेशक विकास हा आपल्या भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा असून समाजात जन्माला येणा-या प्रत्येक मुलाला योग्य संधी व वातावरण मिळणे गरजेचे आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या ध्येयाकडे वाटचाल करताना समाजातील प्रत्येक घटकाचा विकास होणे आवश्यक असून 'दिशा' अभियानाच्या माध्यमातून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जात आहे. या अभियानाशी जोडलेल्या राज्यातील सर्व विशेष शिक्षकांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल राज्य शासनाच्या वतीने प्रमाणपत्र देउन गौरविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.विशेष मुलांना योग्य शिक्षण, संधी आणि वातावरण उपलब्ध करु न देणे ही सामूहिक जबाबदारी असून या क्षेत्रात महाराष्ट्र देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक स्वरूपात राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जय वकील फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना चंद्र, एसीईसीएफचे सह संस्थापक अमित चंद्र, जय वकील फाउंडेशनच्या अध्यक्ष व संचालक डा. अनायता हेगडे, बजाज फिनसर्व्हच्या अध्यक्षा शेफाली बजाज, एचटी पारेख फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी झिया लालकाका, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव माणिक गुरसळ, आयुक्त सत्यजित बडे, समग्र शिक्षा अभियानचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थानचे संचालक राम कुमार, मुख्यमंत्री यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांच्यासह राज्यभरातील विशेष शिक्षक ऑनलाईन उपस्थित होते.

**'दिशा' अभियान राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विशेष मुलांचे मूल्यमापन केवळ गुणांवर न होता, त्यांचा आत्मविश्वास आणि समाजात समरस होण्याची क्षमता यावर होते. सर्व शाळांमध्ये 'दिशा' अभियान स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सध्या राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ४५० हून अधिक शाळा, २७०० हून अधिक शिक्षक आणि २१ हजारांहून अधिक दिव्यांग व बौद्धिक अक्षम विद्यार्थी या अभियानाशी जोडले गेले आहेत. या मुलांना वैज्ञानिक आणि नव्या अध्यापन तंत्राच्या आधारे शिक्षण देण्यासाठी लागणारी साधनसामग्री या उपक्रमामुळे उपलब्ध झाली आहे.या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात पाच शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आपापल्या जिल्ह्यांत समारंभपूर्वक सर्व विशेष शिक्षकांना प्रमाणपत्र देउन सन्मानित करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. 'दिशा' अभियान हा शासनाच्या प्राधान्यक्रमातील महत्त्वाचा उपक्रम असून, याच्या प्रगतीचा व अडचणींचा 'वार रूम' मधून नियमित आढावा घेतला जाईल, दिव्यांग कल्याण विभागामार्फत दरवर्षी प्रत्येक विशेष मुलापर्यंत व त्याच्या कुटुंबापर्यंत दिशा अभियानाची उपयुक्त छापील वर्कबुक्स पोहोचविली जातील, त्याचप्रमाणे नियमित शाळांमध्ये शिक्षण घेणा-या बौद्धिक अक्षमता असलेल्या बालकांसाठी नियमित शिक्षकांच्या प्रशिक्षणात या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभाग आणि जय वकील फाउंडेशन एकत्रित प्रयत्न करतील आणि बालकांमधील विशेष गरजांची वेळीच ओळख व्हावी यासाठी विशेष 'प्रशिक्षण माड्यूल' विकसित करण्यात येईल, असे सांगून यासाठी जय वकील फाउंडेशनने पुढाकार घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.राज्य शासनासह समाज आणि सेवाभावी संस्थांच्या एकत्रित सहभागामुळे या क्षेत्रात मोठे काम उभे राहिले असून, या माडेलच्या माध्यमातून महाराष्ट्र दिव्यांग शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण देशात दिशादर्शक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

## महिलांच्या सबलीकरणासाठी प्रादेशिक तफावत दूर करावी- मंत्री शिवराज सिंह चौहान

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील महिला बचतगटांना केवळ शासकीय योजनांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना सक्षम उद्योजक बनवण्यासाठी बँकांनी संवेदनशीलतेने आणि सर्वोत्कृष्ट योगदान देउन काम करावे, असे आग्रही प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले.मुंबईतील ह?टेल हयात येथे आयोजित 'स्वयं सहाय्यता गट-बँक संलग्नता' या राष्ट्रीय आढावा बैठकीच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या राष्ट्रीय परिषदेला केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री कमलेश पासवान, केंद्रीय ग्रामीण विकास व दळणवळण राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी, महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, केंद्रीय ग्रामीण विकास सचिव रोहित कंसल आणि महाराष्ट्र ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह देशभरातील वरिष्ठ अधिकारी, बँक व्यवस्थापक उपस्थित होते.मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ६ कोटी लखपती दीदी घडवण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रशासनाने महिलांच्या अर्जांवर त्वरित कार्यवाही करून 'मिशन मोड'वर काम करावे. देशातील ३ कोटी 'लखपती दीदीं'चा टप्पा गाठणे तुलनेने सोपे होते; मात्र आता ६ कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वर्षाला ३० ते ५० हजार रुपये उत्पन्न असणा-या तळागाळातील महिलांना लखपती बनवावे लागेल . अनेकदा आधीच संपन्न असणा-या भागांत बँका सहजासहजी कर्जवाटप करतात.



## गडचिरोली ग्रीन स्टीलचे जागतिक केंद्र म्हणून विकसित होणार- पणन मंत्री रावल

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या औद्योगिक भविष्यास नवी दिशा देणारा आणि शाश्वत औद्योगिकीकरणाला चालना देणारा महत्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे. जान काकरिल इंडिया लिमिटेडसोबत करण्यात आलेला सामंजस्य करार हा केवळ औद्योगिक गुंतवणुकीचा करार नसून गडचिरोलीला ग्रीन स्टील उत्पादनाचे जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या महत्वाकांक्षी संकल्पाचा पाया असल्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. या करारासंदर्भात आयोजित बैठकीत जान काकरिल इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक, डा. फ्रेडरिक मार्टिन, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डा. पी. अन्बळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव डा. राजेश गवांदे आदी उपस्थित होते. यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे जागतिक गुंतवणूक, अत्याधुनिक तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि शाश्वत औद्योगिक विकासाला चालना देणारे अव्वल राज्य आहे. राज्याचा विकास हा केवळ आर्थिक वाढीपुरता मर्यादित नसून सर्वसमावेशक आणि संतुलित प्रादेशिक विकासावर आधारित आहे. गडचिरोलीतील हा उपक्रम केवळ नवीन उद्योग उभारण्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण जिल्ह्याच्या औद्योगिक परिवर्तनाचा पाया ठरेल. या प्रकल्पामुळे अत्याधुनिक हरित तंत्रज्ञान, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास आणि स्थानिक युवकांसाठी नवीन संधी उपलब्ध होतील. विदर्भातील नैसर्गिक व खनिज संपत्तीला पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रियेची जोड देत जबाबदार औद्योगिक विकासाचे आदर्श माडेल उभारले जाईल. पणन मंत्री रावल म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय संपर्क विभागाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय औद्योगिक भागीदारी अधिक मजबूत करण्यात येत आहे.

## सतत कार्यरत असणा-या पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याला प्राधान्य- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** सतत कार्यरत असणा-या पत्रकारांना अनियमित कामाच्या वेळांमुळे, तासनतास रस्त्यावर आणि घटनास्थळी राहून काम करावे लागल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेले आरोग्य तपासणी आणि उपचार शिबीर महत्वाचे ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयाने विधानभवन येथे पत्रकारांसाठी विशेष आरोग्य तपासणी, उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध तपासणी आणि उपचार शिबीराला भेट देउन पत्रकारांच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, आमदार योगेश सागर, आमदार अभिमन्यू पवार, आदींसह विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पत्रकारांचे काम हे २४ तास सुरू असते. कामाचे निश्चित वेळापत्रक नसल्याने अनेकदा तासनतास रस्त्यावर, घटनास्थळी तसेच रात्री-अपरात्री काम करावे लागते. त्याचा साहजिकच आरोग्यावर परिणाम होतो. अनेकदा नियमित आरोग्य तपासण्या होत नसल्यामुळे एखादा आजार बळावल्यानंतर त्याचे निदान होते. त्याऐवजी अशा आरोग्य तपासणी शिबिरांच्या माध्यमातून प्राथमिक लक्षणे वेळीच ओळखून त्यावर तातडीने उपचार करता येतील. या शिबिरामध्ये विविध तज्ज्ञ डाक्टर, नामांकित संस्था आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पत्रकारांसोबतच तासनतास उभे राहून काम करणा-या कॅमेरामनसाठीही आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. व्हेरिकोज व्हेन्ससारख्या समस्यांसाठी स्टाकिंगची व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरणा-या विविध सुविधांचा समावेश करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

**पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबाच्या मदत व समन्वयासाठी नोडल अधिकारी-**पत्रकारांच्या सर्व संघटनांनी एकत्र येउन हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व संघटनांचे अभिनंदन केले. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना आजारपणाच्या प्रसंगी आवश्यक ती मदत व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे.


### जाहीरनामा

[illegible] दिवाणी न्यायाधीश [illegible] अमरावती [illegible]

अर्जदार : 1. Rajesh Shankar Bhoyar, Aged about 41 Yrs. Occu.- Business
2. Samruddhi Rajesh Bhoyar, Aged 13 Yrs. Occu. Student
R/o Ward No.1, Shendur Khurd, Ta.Teosa, Dist.Amravati
-- विरुद्ध --
गैरअर्जदार- निरंक

[illegible] Application U/s.2 of The Bombay Regulation VIII of 1827 [illegible]

[illegible]

सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, [illegible]

### नगर परिषद कार्यालय, अचलपूर
### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव श्री./श्रीमती/कु. महेमुन्निसा मोहम्मद साबिक कसाब व ईतर ३ पत्ता [illegible] अचलपूर जि. अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या [illegible] संगणक मालमत्ता क्र.ACHA000/17584 जुना मालमत्ता क्र. ........... नझूल शिट क्र.१८ [illegible] [illegible] मोहम्मद साबिक कसाब व ईतर ३ यांच्या नावाने [illegible] [illegible] मुदतीनंतर [illegible] याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - [illegible]
पश्चिमेस - सरकारी रस्ता
दक्षिणेस - [illegible] यांचे घर
उत्तरेस - सरकारी रस्ता

मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
नि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
[illegible]
जाहीरनामा/[illegible]
[illegible]
Application under Section 2 of Bombay Regulation Act Clause VIII of 1827 for grant of Legal Heirship Certificate [illegible]
[illegible]


### जाहीर नोटीस
विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती
[illegible]

विद्यमान दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील एम.ए.शिलार, दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात
### जाहीर नोटीस
[illegible]
आदेशानुसार, सह.अधीक्षक (प्रशासन), दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील [illegible] दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात
### जाहीर नोटीस
[illegible]
आदेशानुसार, सहा.अधीक्षक (प्रशासन), दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर


## राम मंदिर विश्वस्तांमध्ये पहिल्यांदाच महिला विश्वस्तांचा समावेश

**अयोध्या :** अयोध्येतील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले. ट्रस्टने प्रथमच मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची नियुक्ती करण्यासोबतच नव्या सरचिटणीसाची आणि तीन विश्वस्तांची नियुक्ती केली. राम मंदिरातील देणगी चोरीच्या आरोपांनंतर सुरू झालेल्या चौकशा, अटकसत्र आणि तत्कालीन सरचिटणीस चंपत राय यांच्या राजीनाम्यानंतर जवळपास तीन महिन्यांनी हे बदल करण्यात आले आहेत. राम मंदिर विश्वस्तपदी पहिल्यांदाच एका महिलेची नियुक्ती करण्यात आली आहे.ट्रस्टच्या महत्त्वाच्या पदांपैकी माजी कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांच्यावर आता सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांनी पूर्णवेळ सरचिटणीस म्हणून काम करण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रस्टच्या बैठकीत जितेंद्र मिश्रा यांच्या नियुक्तीमुळे ट्रस्टच्या दैनंदिन व्यवस्थापनात महत्त्वाचा बदल होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत विश्वस्तांच्या नेतृत्वाखाली चालणा-या व्यवस्थापनात आता व्यावसायिक आणि कार्पोरेट पद्धतीच्या देखरेखीला महत्त्व मिळणार आहे. मंदिराची सुरक्षा, लाजिस्टिक्स, भाविकांची गर्दी व्यवस्थापन तसेच कोट्यवधी रुपयांच्या निधीचे व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदा-यांवर सीईओ लक्ष ठेवणार आहेत. बैठकीनंतर कृष्ण मोहन यांनी ही माहिती दिली. मात्र, ट्रस्टसाठी प्रवक्त्याची नियुक्ती करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.



## एमआयटी-एडीटीचा तेजस पाटील भारतीय आशियाई तलवारबाजी संघात!

**पुणे / नवी दिल्ली :** जपानमध्ये होणा-या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय तलवारबाजी (फेन्सिंग) संघाची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये पुण्याच्या एमआयटी आर्ट, डिझाईन आणि तंत्रज्ञान (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाचा विद्यार्थी तेजस मनोज पाटील याने भारतीय पुरुषांच्या फाईल संघात आपले स्थान पक्के केले आहे.भारतीय तलवारबाजी संघटनेच्या (फेन्सिंग असोसिएशन ऑफ इंडिया) निवड समितीने नुकतीच या पथकाची अधिकृत घोषणा केली. राष्ट्रीय मानांकन तसेच आशियाई वरिष्ठ तलवारबाजी चॅम्पियनशिप, जागतिक चॅम्पियनशिप आणि राष्ट्रकुल तलवारबाजी चॅम्पियनशिपमधील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे खेळाडूंची अंतिम निवड करण्यात आली आहे.निवड झालेले सर्व खेळाडू पटियाला येथे १५ सप्टेंबरपर्यंत चालणा-या राष्ट्रीय तयारी शिबिरामध्ये सहभागी होतील. त्यानंतर १६ सप्टेंबर रोजी स्पर्धापूर्व वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संपूर्ण भारतीय संघ थेट जपानमधील आयची-नागोया येथे रवाना होणार आहे.एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ काम्प्युटिंगचा (एसओसी) विद्यार्थी असलेल्या तेजस पाटील याने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरी, मेहनत आणि उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर यापूर्वी चीनमधील शांघाय येथे झालेल्या प्रतिष्ठित फाइल ग्रँड प्रिक्स आणि नायजेरियातील लागोस येथे झालेल्या राष्ट्रकुल तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या फाइल संघात स्थान मिळवले होते. या स्पर्धांमध्ये त्याने दोन रौप्य व एक कांस्य पदक पटकावले होते. आता पुन्हा एकदा आशियाई फेन्सिंग स्पर्धेत पुरुषांच्या फाइल प्रकारात तो भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



## फडणवीसांना उपपंतप्रधानपद देण्याची शक्यता-खा.राऊत

**मुंबई / प्रतिनिधी-**संजय राउत म्हणाले की, मोदींच्या मंत्रिमंडळात त्यांचा वारसदार म्हणून ज्या व्यक्तीची निवड होईल, त्यांनाच उपपंतप्रधानपद दिले जाण्याची चर्चा आहे. संघाची भूमिका लवकरच समोर येईल. ती व्यक्ती सध्या दिल्लीत नसून देवेंद्र फडणवीस यांना ही मोठी जबाबदारी दिली जाउ शकते, एवढी माहिती माझ्याकडे आहे.संजय राउत म्हणाले की, राम मंदिराला सीईओ देत त्यांचा व्यापार करण्याचा प्रयत्न सत्ताधा-यांकडून सुरू आहे. जेडीपीचा आकडा फुगवत देशातील जनतेला फसवले जात आहे. पंतप्रधान मोदींनी देशातील नागरिकांना मोफत राशन आणि महिलांना पैसे देण्याची सवय लावत देशाचा जीडीपी कसा वाढेल असा सवाल राउत यांनी केला आहे. मोदींचा फोटो काढला म्हणून देशद्रोह झाल्यासारखा लगेच अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल करण्यात आला ही कुठली व्यवस्था आहे? संजय राउत म्हणाले की, आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर गृहमंत्री राहिलेली कोणतीही व्यक्ती पंतप्रधान झालेली नाही. अमित शहा यांना पंतप्रधान होण्याची तीव्र इच्छा आहे, पण ते शक्य होणार नाही. जर मंत्रिमंडळात फेरबदल करायचे असतील तर आधी अमित शहा यांचा राजीनामा घ्या, मगच आम्ही राजीनामा देउ, असा इशारा काही वरिष्ठ मंत्र्यांनी थेट पंतप्रधानांना दिला आहे. अन्यथा तुम्ही आम्हाला बाजूला काढा असे संघाच्या जवळील काही मंत्र्यांनी मोदींना सांगितले आहे.



## तत्कालीन तहसीलदार बिरादार यांच्याकडे सापडली अपसंपदा

**परभणी :** सोनपेठचे तत्कालीन तहसीलदार आशिषकुमार बिरादार यांच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून कारवाई केली होती. या प्रकरणी त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपीच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली असून त्यांच्या उत्पन्नापेक्षा ८७ लाख ८४ हजार २८८ रूपये त्यांनी अपसंपदा संपादीत केल्याचे उघड झाले आहे.तसेच ही अपसंपदा सौ. अपर्णा आशिषकुमार बिरादार स्वतःच्या नावे करून बिरादार यांना गुन्हा करण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन झाले आहे. या प्रकणी दि. १ सप्टेंबर रोजी रात्री ७.५५ वाजता नानलपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून आरोपी बिरादार यांच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, सोनपेठ तालुक्यातील डिघोळ येथील व्यक्तीने सोनपेठचे तत्कालीन तहसीलदार बिरादार यांच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीनुसार कारवाई करीत गुन्हा दाखल करण्यात आला असून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी बिरादार यांच्या मालमत्तेची चौकशी होण्यासाठी अहवाल सादर करण्यात आला होता. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. ३ नोव्हेंबर २००७ ते दि. ३ ऑगस्ट २०२१ दरम्यान केलेल्या चौकशीत बिरादार यांच्याकडे उत्पन्नापेक्षा ८१.९१ टक्के अधिक उत्पन्न आढळून आले आहे. ही चौकशी पोलिस उपअधीक्षक महेश पाटणकर, पर्यवेक्षक अधिकारी पोलिस उपअधीक्षक किशोर तोरणे, तपास अधिकारी पोलिस निरीक्षक अल्ताफ मुलाणी यांच्या पथकाने केली. या प्रकरणी अद्याप बिरादार यांना अटक करण्यात आलेली नाही. या कारवाईने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## कटुतेच्या पार्श्वभूमीवर..

विद्यार्थ्यांच्या दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान त्याच्याशी संबंधित विविध राज्यांत; विशेषतः दिल्ली पोलिसांनी नोंदवलेले गुन्हे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी आपला विशेषाधिकार वापरून रद्द केले आणि त्यानंतर 'कॉक्रोच'नेही आपला ५ सप्टेंबरचा दिल्लीतील नियोजित मोर्चा मागे घेतला, ही गेल्या काही महिन्यांत घडलेली चांगली घटना म्हणता येईल. गेल्या काही महिन्यांत देशभरात जणू अविवेकाचे वादळ घोंगावते आहे. समोरच्याच्या भावना जराही समजून न घेता जहरी टीका,अविचारी प्रतिसाद,'जशास तसे' वृत्तीने देशातील वातावरण कमालीचे गढुळले आहे. क्रिये-प्रतिक्रियेने त्यात दर दिवशी भरच पडते आहे. अशावेळी सर्वोच्च न्यायालयाने एक पाऊल पुढे टाकून अनुच्छेद १४२ अन्वये आपल्याकडे असलेल्या विशेष अधिकाराचा वापर करून विद्यार्थी आंदोलकांवरील सर्व एफआयआर रद्द करण्याचा निर्णय दिला,हे समंजसपणाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणता येईल. महाराष्ट्र, आसाम, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांनी असे एफआयआर न नोंदवण्याच्या किंवा नोंदवलेच असतील, तर ते मागे घेण्याच्या घोषणा पूर्वीच केल्या होत्या. त्याबाबत रितसर परवानगीसाठी ही राज्ये सर्वोच्च न्यायालयात गेली होती. त्यावरील सुनावणीवेळी न्यायालयाने हा निर्णय दिला. त्यामुळे, देशाच्या राजधानीतल एक अकारण आंदोलन टळले. राज्यांनी घेतलेल्या निर्णयांना परवानगी देताना न्यायालयाने संपूर्ण देशासाठी निर्णय दिला असला, तरी या आंदोलनात घुसखोरी केलेल्या पूर्वाश्रमीच्या गुन्हेगारांना हा निर्णय लागू नाही. ज्यांच्यावर पूर्वीपासूनच काही ना काही आरोपावरून सर्वोच्च न्यायालयाने विशेषाधिकाराचा वापर करून विद्यार्थी आंदोलकांवरील गुन्हे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय आणि त्यानंतर 'कॉक्रोच'ने दिल्लीतील नियोजित मोर्चा मागे घेणे, या दोन्ही घटना निश्चितच स्वागतार्ह म्हणाव्या लागतील. वाढत चाललेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर संवाद आणि समंजसपणाच्या दिशेने पडलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गुन्हे नोंद आहेत, त्यांच्या विरोधातील गुन्ह्यांची नोंद कायम राहणारच आहे; शिवाय या आंदोलनात घुसून त्यांनी काही गैरकृत्य केली असतील, तर त्याचीही दखल घ्यायला पोलीस स्वतंत्र आहेत. आपल्या शैक्षणिक मागण्यांसाठी रीतसर, शांततामय आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची मात्र पोलिसी ससेमिरा आणि न्यायालयातील फेऱ्यांपासून या निर्णयाने सुटका केली आहे. सप्टेंबर १२ आणि १३ रोजी दिल्लीत 'ब्रिक्स' देशांच्या राष्ट्रप्रमुखांचे १८ वे शिखर संमेलन होणार आहे. भारतच त्याचा यजमान आहे. या शिखर संमेलनासाठी ज्या देशांचे राष्ट्रप्रमुख दोन दिवस दिल्लीत येणार आहेत, त्यांची व्यवस्था-सुरक्षा व्यवस्था पाहण्यासाठी, राजनैतिक भेटीगाठी आणि बैठका ठरवण्यासाठी, काही करार करण्यासाठी किंवा संमेलनात व्हावयाच्या चर्चेसंदर्भात यजमान देशाशी सहमती घडवण्यासाठी अनेक देशांची शिष्टमंडळे दिल्लीत पोहोचत आहेत. या सगळ्या शिष्टमंडळांचा वावर, निवासस्थाने, संमेलनाची जागा दक्षिण दिल्लीत आहे. 'कॉक्रोच'ने शिक्षक दिनी जाहीर केलेला मोर्चा 'इंडिया गेट'पासून सुरू करण्याचे ठरवले होते. 'इंडिया गेट' ही काही कुठल्या आंदोलनाची, मोर्चा नेण्याची किंवा ती सुरू करण्याची जागा नाही.'जंतर-मंतर' हे त्यासाठीचे पारंपरिक ठिकाण असूनही गेल्यावेळी केवढा गोंधळ झाला, तो साऱ्या जगाने पाहिला. यावेळी 'इंडिया गेट'ला तर तो काही पटींत वाढला असता. देशभरातून झपाटून आलेल्या कोवळ्या मुलांना रोखताना, त्यांना योग्य समज देताना पोलीस; पर्यायाने केंद्र सरकारच बदनाम झाले असते. कारण, दिल्ली पोलिसांची सूत्रे थेट केंद्रीय गृह खात्याकडेच आहेत, हे सर्वश्रुत आहे. गेल्या आंदोलनाच्या स्मृती पुसल्या गेल्या नाहीत, तोवर त्यात नवी भर पडली असती. अशा प्रकरणांमध्ये जगभर सहानुभूती नेहमी विद्यार्थ्यांच्या बाजूनेच असते. सरकारला हे एकूण प्रकरण भलतंच त्रासदायक ठरले असते. परदेशी पाहुणे मोठ्या प्रमाणावर त्याच शहरात असताना आंदोलन चिघळले असते तर सरकारची अवस्था खिंडीत गाठल्यासारखी झाली असती. त्यामुळे, या सगळ्या संभाव्य अडचणी टाळण्यासाठी ऐनवेळी सर्वोच्च न्यायालय मदतीला आले, ते बरेच झाले. स्वतःवरचा विद्यार्थ्यांचा रोष कमी करण्याची संधी न्यायालयाला यानिमित्ताने मिळाली, असा अर्थ कोणी काढत असेल, तर काढो.जे झाले, ते सर्वार्थाने चांगले झाले. या सकारात्मक घटनांमुळे काहींचा मात्र पोटशूळ उठला आहे.'कॉक्रोचां'बद्दल कालपर्यंत सहानुभूती असलेले, त्यांची बाजू घेऊन सरकारला दोष देणारे आज 'कॉक्रोचां'बद्दल नाराजी व्यक्त करू लागले आहेत.सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेमागे केंद्र सरकारची कशी सोय आहे,याचे विश्लेषण हे 'आंदोलनजीवी' करू लागले आहेत. मुळात ज्या कारणासाठी मोर्चा होता,ते कारणच संपल्यानंतर मोर्चा काढायचा कशासाठी? नव्या मागण्या पुढे करून आपल्याच सरकारचे नाक आंतरराष्ट्रीय पातळीवर कापण्यासाठी? या 'आंदोलनजीवी'चा आणि सारासार विवेकाचा काही संबंध नसतो. कसेही करून सरकारच्या बदनामीची मोहीम जिवंत ठेवायची, देशातले वातावरण सतत धुमसत, पेटते ठेवायचे एवढेच त्यांना हवे असते. त्यासाठी स्वार व्हायला ते सतत कोणाची ना कोणाची पाठ शोधत असतात.'कॉक्रोच'ने त्यांना यावेळी आपल्या पाठीवर पुन्हा चढू दिले नाही, हे चांगले केले.विद्यार्थ्यांच्या अध्य मागण्यांच्या सोडवणुकीसाठी हे मैदान चांगले तयार झाले आहे. सरकारने स्वतःहूनच त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. आज गरज आहे ती आणखी एका आंदोलनाची नव्हे, तर संवादाची. आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेण्याची आणि त्यावर ठोस निर्णय घेण्याची.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने निर्माण झालेली ही सकारात्मक संधी सरकारने गमावू नये.विद्यार्थ्यांनीही शांततामय मार्गाने आपल्या मागण्या मांडत राहाव्यात.

# निसर्ग बदलतोय; आता शेतीचे नियोजनही बदलले पाहिजे!



**पाऊस आला की शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद फुलतो. आभाळ भरून आले की त्याच्या डोळ्यांसमोर हिरवेगार शिवार उभे राहते. पावसाच्या प्रत्येक सरीत त्याला आपल्या कष्टाचे सोने दिसते. पण गेल्या काही वर्षांत पावसाचे हे पारंपरिक गणितच बदलत चालले आहे. कधी पाऊस लांबतो, कधी अचानक मुसळधार बरसतो, तर कधी गरजेच्या वेळी दडी मारून पिकांची चिंता वाढवतो.**

यंदाच्या खरीप हंगामातही महाराष्ट्राने पावसाच्या असमान वितरणाचा अनुभव घेतला आहे. २ सप्टेंबरपर्यंत राज्यात लक्ष्याच्या सुमारे ९५.१ टक्के क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असली तरी मागील वर्षाच्या तुलनेत पेरणीचे क्षेत्र कमी आहे. मका आणि कडधान्यांसारख्या काही पिकांच्या क्षेत्रात घट झाली आहे.म्हणजेच प्रश्न केवळ 'पाऊस किती झाला?' एवढाच राहिलेला नाही. पाऊस कुठे, केव्हा आणि किती झाला? हा शेतीच्या भवितव्याचा अधिक महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.

शेतकरी हवामानाच्या अंदाजावर विश्वास ठेवून पेरणी करतो. बियाणे, खत, औषधे, मजुरी आणि मशागतीवर खर्च करतो. त्यानंतर आकाशाकडे डोळे लावून बसतो. पाऊस वेळेवर झाला तर पीक उभे राहते; पण पावसाने अचानक रूप बदलले तर महिन्यांची मेहनत काही तासांत मातीमोल होऊ शकते. अलीकडे अवकाळी पावसामुळे काही जिल्ह्यात पिकांचे नुकसान झाले आणि शेतकऱ्यांसाठी भरपाई मंजूर करण्यात आली.तर काही ठिकाणी अत्यअल्प पावसामुळे पिकाची योग्य वाढच झाली नाही.एक प्रकारे तोही काही जिल्ह्यात दुष्काळच आहे.म्हणून त्यांना ही नुकसानभरपाई सरकार करणार का? या पिक-पाण्यार हजारो कुटुंबांचे स्वप्न, कर्जाचा भार, मुलांच्या शिक्षणाची चिंता आणि पुढच्या हंगामाची धडपड दडलेली आहे. पाऊस दोषी की आपले नियोजन?निसर्गाला आदेश देता येत नाही. पाऊस आपल्या सोयीने पडणार नाही. हवामानातील बदल पूर्णपणे थांबवणेही आपल्या हातात नाही. मग उपाय काय?

शेतकऱ्याला स्थानिक पातळीवर अधिक अचूक हवामानविषयक माहिती मिळाली पाहिजे. कोणत्या कालावधीत पाऊस अपेक्षित आहे, किती पाऊस होऊ शकतो, पिकाला त्याचा काय परिणाम होईल आणि अशा परिस्थितीत कोणती उपाययोजना करावी, याची माहिती वेळेत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय कृषी हवामान विभागाकडून स्थानिक हवामानाच्या आधारे कृषी सल्ला, 'मेघदूत'सारख्या सेवा आणि शेतकऱ्यांसाठी हवामानाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.

मात्र माहिती उपलब्ध असणे आणि ती शेतकऱ्याच्या मोबाईलपर्यंत, त्याच्या भाषेत आणि योग्य वेळी पोहोचणे, यात मोठा फरक आहे. प्रशासनाने 'नुकसान' नव्हे, 'जोखीम' मोजावी पाऊस झाला, पीक गेले, पंचनामा झाला आणि मग भरपाई- ही प्रक्रिया आवश्यक आहेच. परंतु ती पुरेशी नाही. प्रशासनाने आता आपत्ती आल्यानंतर मदत करण्यापेक्षा आपत्तीपूर्व नियोजनावर भर देण्याची गरज आहे.तालुकानिहाय हवामान जोखीम नकाशे तयार झाले पाहिजेत. कोणत्या गावात कोणते पीक अधिक धोकादायक आहे, कोणत्या भागात पाणी साचण्याची शक्यता आहे, कोणत्या पिकाला कमी कालावधीचे पर्याय आहेत, पाण्याचा निचरा कसा करायचा—याचे ग्रामपातळीवर नियोजन झाले पाहिजे.पिकांचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे आणि मदत यंत्रणा वेगाने काम करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या नैसर्गिक आपत्ती मदत व्यवस्थेत पीक नुकसानीसाठी निश्चित निकषांनुसार मदतीची तरतूद आहे आणि पंचनाम्याच्या माध्यमातून नुकसान नोंदविण्याची प्रक्रिया आहे.

परंतु शेतकऱ्याला मदत वेळेत मिळाली तरच तिचा खरा अर्थ आहे.विमा, बाजारभाव आणि हवामान- तीनही प्रश्न एकत्र सोडवावे लागतील शेतीचा धोका केवळ पावसाचा नाही. पाऊस चांगला झाला तरी बाजारभाव कोसळला तर शेतकरी अडचणीत येतो. पीक चांगले आले तर भाव पडतो आणि पीक खराब झाले तर उत्पादन कमी होते.म्हणून शेतकऱ्याच्या सुरक्षिततेसाठी तीन गोष्टींचे एकत्रित नियोजन आवश्यक आहे- हवामानाचा अंदाज, पीक विमा आणि बाजारभावाची हमी. याशिवाय जलसंधारण, शेततळे, निचरा व्यवस्था, ठिबक सिंचन, पीक विविधीकरण आणि स्थानिक परिस्थितीनुसार पिकांची निवड याकडे गांभीर्याने पाहावे लागेल.

### 'एकच पीक' मानसिकता अयोग्य

हवामान बदलत असताना पारंपरिक पद्धतींना आधुनिक ज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. एकाच पिकावर संपूर्ण आर्थिक अवलंबित्व ठेवण्याऐवजी शेतकऱ्याने उपलब्ध पाणी, जमीन आणि बाजारपेठ लक्षात घेऊन पीक विविधीकरणाचा विचार केला पाहिजे. यासाठी कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, कृषी अधिकारी आणि तज्ज्ञांनी शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचले पाहिजे. कार्यालयात बसून सूचना देण्यापेक्षा शेताच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करणारी यंत्रणा अधिक प्रभावी ठरेल. शेतकऱ्याला दया नको; सक्षम व्यवस्था हवी नुकसान झाले की शेतकऱ्याबद्दल सहानुभूती व्यक्त केली जाते. मदतीच्या घोषणा होतात. पण शेतकऱ्याला कायम मदतीचा हात लागावा, ही परिस्थितीच बदलायला हवी.शेतकऱ्याला दया नको आहे; त्याला जोखीम व्यवस्थापनाची सक्षम व्यवस्था हवी आहे.त्याला वेळेवर हवामान माहिती हवी. योग्य बियाणे हवे. पिकाचे संरक्षण करण्यासाठी तंत्रज्ञान हवे. नुकसान झाल्यास त्वरित पंचनामा हवा. विम्याची रक्कम वेळेवर हवी. आणि शेवटी त्याच्या मालाला उत्पादन खर्चापेक्षा समाधानकारक परतावा मिळाला पाहिजे.

### प्रश्न पावसाचा नाही, तयारीचा आहे


पाऊस कमी पडला तर संकट; जास्त पडला तरी संकट- अशी परिस्थिती असेल तर केवळ निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. निसर्ग अनिश्चित आहे; पण आपले नियोजन अनिश्चित असता कामा नये. आज गरज आहे ती हवामानाचा अंदाज आणि शेतीचे नियोजन यांना एकत्र आणण्याची. गरज आहे त्वरीत नदीजोड प्रकल्प राबवण्याची. गावागावात पाणी व्यवस्थापनाची नवी आखणी करण्याची. शेतकऱ्याला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याची. प्रशासनाला अधिक संवेदनशील आणि तत्पर करण्याची.पावसाची प्रत्येक सर शेतकऱ्यासाठी संकट ठरू नये; ती संधी ठरावी, अशी व्यवस्था उभी करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही- तर कृषी क्षेत्राशी संबंधित प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पाऊस आपल्या हातात नाही, पण पावसासाठीची तयारी आपल्या हातात आहे. निसर्ग बदलतोय; आता शेतीचे नियोजनही बदलले पाहिजे!

**पंडित रावजी पवळे**

# भारताची जीडीपी वाढ आणि भारतीय शेतीक्षेत्र

भारताची जीडीपी वाढ आणि भारतीय शेतीक्षेत्र हे एकाच देशाशी संबंधित असले तरी त्यांचा परस्पर संबंध राहिलेला नाही!

एकाच दिवशी खालील दोन बातम्या मीडियामध्ये प्रकाशित होणे हा काही योगायोग नाही;पहिली बातमी पावसावर अवलंबून असणा-या शेतीक्षेत्राची.या वर्षीच्या मान्सून सीझनवर एल निनोचा विपरीत परिणाम होणार असे इशारे सीझनच्या सुरुवातीला देण्यात आले होते. जुलै महिन्यात चांगला पाऊस झाला तसाच तो सुरु राहील या शतकऱ्यांच्या आशेला ऑगस्ट महिन्यातील पावसाने पाने पुसली. परिणामी महाराष्ट्रात ३६ पैकी ३१ जिल्हावार दुष्काळाची काळी सावली पडली आहे. देशातील पावसाचे चित्र देखील उत्साहवर्धक नाही. देशात ९१ टक्क्यांपेक्षा कमी पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. (संदर्भ अग्रोवन).




दुसरी बातमी एप्रिल-जून या तिमाहीतील देशाची जीडीपी ७,८ टक्के म्हणजे अपेक्षेपेक्षा खूप जास्त वेगाने वाढल्याची.याच तिमाहीत आखाती युद्धामुळे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतील अशी सार्थ भीती व्यक्त केली गेली होती. ती या आकडेवारीने खोटी ठरवली आहे. हे आकडे चालू वित्तवर्षाच्या फक्त पहिल्या तिमाहीचे असले तरी उरलेल्या नऊ महिन्यात देखील भारतीय अर्थव्यवस्था चान्गला वाढदर नोंदवेल असे सांगितले जात आहे.

कोरोनानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेने जे वाढदर नोंदवले आहेत ते प्रामुख्याने ज्याला इंगजीमध्ये K शेप रिकव्हरी म्हणतात त्यामुळे झाले आहेत.यामध्ये अर्थव्यवस्थेतील सुखवस्तू/मध्यमवर्गाची उत्पन्ने आणि म्हणून उपभोग वाढतो (K अक्षराची वरील दांडी अजून वर जाते.) आणि त्याच अर्थव्यवस्थेतील निम्न मध्यम/ गरीब कुटुंबांची उत्पन्ने आणि उपभोग आक्रसतात (K अक्षराची खालची दांडी अजून खाली जाते)

गेल्या तिमाहीतील जीडीपी वाढीमध्ये बांधकाम व्यवसाय/रियल इस्टेट, खाजगी वाहने, दागिने, व्यापार/ रिटेल/हॉटेल व्यवसाय/बँकिंग आणि वित्त क्षेत्राने भरीव योगदान दिले आहे. ज्याचे ग्राहक प्रामुख्याने देशातील २० टक्के कुटुंबे असतात. आणि अर्थात केंद्र सरकार पुरस्कृत पायाभूत सुविधा क्षेत्रावरील भांडवली खर्च.

शेतीक्षेत्रातील अरिष्टाची झळ प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना अर्थात जाणवतेच पण शेतमजूर, शेतीक्षेत्राला अनेकानेक सेवा पुरवणार्यांना देखील लगेच फटका बसतो. शेती आणि अनुषंगिक क्षेत्राचा देशाच्या जीडीपीमधील वाटा १५ टक्क्यांच्या आसपास गेली अनेक वर्षे लॉक झाला आहे. त्याचवेळी या क्षेत्रावर अनेक वर्षे देशातील ५० टक्के लोकसंख्या अवलंबून आहे.

पीक नुकसान भरपाई आता मोठ्याप्रमाणावर विमा कंपन्यांमार्फत दिली जाते. किमान कागदोपत्री. अनेक क्लिष्ट यमनियम वापरून आपला क्लेम्स रेशो वाढणार नाही याची या विमा कंपन्या काळजी घेत असतात. आणि शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीच्या तुलनेत नक्की किती नुकसान भरपाई मिळते यांची आकडेवारी शासन जाणूनबुजून गोळाच करत नाही.

तोट्यात जाणाऱ्या/बंद पडणाऱ्या कॉर्पोरेट क्षेत्राला गेली अनेक वर्षे देण्यात आलेल्या पॅकेजेस/बेल आउट/ हेयर कट यांचे लाखो कोटी रुपयांचे आकडे आणि देशातील शेतकऱ्यांना मिळणारी नुकसानभरपाई यांची तुलना केली की शेतीक्षेत्राला दिला जाणारा सापत्नभाव अधिक ठळक होईल. सर्वांना सर्व माहित आहे. सगळी अळीमिळी गुपचिळी आहे.

आताच हंगाम तोट्यात गेल्यागेल्या दुसरा हंगाम सुरु होणार असतो. त्यासाठी शेतकऱ्यांना हातात हक्काचे पैसे हवे असतात. संसार चालवणे , अत्यावश्क वस्तू, आधीची कर्जे फेडण्यासाठी आणि नवीन हंगामासाठी शेकडो ग्रामीण कुटुंबाना अधिकची कर्जे काढावी लागणार आहेत. त्यातून त्यांचा कर्जबाजारीपणा वाढणार आहे.

पंतप्रधान, वित्तमंत्री यांनी आनंद व्यक्त करत जनतेचे अभिनंदन केले आहे. पण ही जनता म्हणजे नक्की कोण ? सर्व १४० कोटी की त्यातील फक्त एक अल्पसंख्य लाभार्थी ? याचे उत्तर देखील कोणी देणार नाहीये. पावसाची चर्चा करताना आपण शहर वासियांना आपल्या शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या आजूबाजूच्या तलावात पाण्याची पातळी किती वाढली एवढयापुरता रस असतो.

या वर्षात देशात अन्नधान्याचे उत्पादन समजा घटले तर अन्नधान्य महाग होईल पण अन्नधान्याची टंचाई होणार नाही. कारण फूड कॉर्पोरेशनची गोडाउन्स आहेत आणि अंतरराष्ट्रीय धान्य बाजारातील बहुराष्ट्रीय कंपन्या आपली जहाजे भारताच्या बंदरावर पाठवायला उत्सुक आहेत.गेल्या काही वर्षात देशाच्या अर्थव्यवस्थेची अशी पुनर्रचना करण्यात आली आहे की शेतीक्षेत्राचा देशाच्या जीडीपीवर फारसा विपरीत परिणाम होत नाही. जीडीपी आणि शेतीक्षेत्र डिकपल केले गेले आहे.

**संजीव चांदोरकर**

# पुन्हा तेच ते !

मराठा समाजाचे 'संघर्षयोध्दे' मनोज जरांगे सालाबादप्रमाणे पुन्हा एकदा आंतरवली सराटीत उपोषणाला बसले आहेत. हे त्यांचे ११ वे उपोषण आहे. याआधी दोन वेळा 'जिंकलो रे पोरांनो' अशी डरकाळी फोडत अंगावर विजयी गुलाल उधळून, थाटामाटात मिरवून घेतले होते. आता हे 'शेवट'चे व 'आरपार' उपोषण असेल, अशी घोषणा त्यांनी केली होती. घोषणा म्हणण्यापेक्षा सरकारला 'ब्लॅकमेल' करण्यासाठी धमकी दिली, असे म्हणणेच, योग्य ठरेल. परंतु , पाचव्याच दिवशी प्रसाद लाड यांच्या हस्ते पाणी पिले व सलाईनही लावून घेतले. अपेक्षेप्रमाणे सरकारला नेहमीप्रमाणे पुन्हा चार दिवसांची मुदतवाढ दिली. पाणी व सलाईन घेईल पण, उपोषण सोडणार नाही, अशी तंबी त्यांनी सरकारला दिली. पाणी पिले याचा अर्थ उपोषण सुटले, असाच होतो. पण, 'उपोषणजीवी' जरांगेचे हे कोणत्या प्रकारचे आधुनिक 'आमरण' उपोषण आहे? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. यामुळे यांच्या या नौटंकीवर 'हसावे की रडावे'? असा प्रश्न संपूर्ण राज्याला पडला असणार. या नौटंकीचा गेल्या ३ वर्षांचा इतिहास बघता, हे 'गु-हाळ' अजून बरेच महिने चालणार, हे नक्की. कारण, 'जातपडताळणी समितीच रद्द करा' अशी अशक्यप्राय नवीन मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

३ वर्षांपूर्वी सुरुवातीला फक्त मराठवाड्यापुरते आरक्षण द्या, ही एकमेव मागणी केली होती. नंतर संपूर्ण महाराष्ट्राला सरसकट आरक्षण द्या, नंतर सगेसोय-यांना द्या, ओबीसीतूनच पाहिजे, असे करतकरत आतापर्यंत सुमारे १८ मागण्यांपर्यंत ते पोहोचेले आहेत. जर, उद्या पुन्हा अजून एखादी नवीन मागणी केली तर, अजिबात आश्चर्य वाटायला नको. कारण, त्यांनी सरकारची 'पोची' किंवा 'हतबलता' ओळखली आहे. 'जातपडताळणी समितीच रद्द करा' या अर्थहीन व अशक्यप्राय मागणीवरून ही व्यक्ती किती 'अज्ञानी' व 'बालिश' बुद्धीची आहे, हे मराठा समाजातील 'सूज्ञ' व 'सुशिक्षित' बांधवांना, जगाला समजले. पण, त्यांना 'दैवत' (?) मानणा-या व त्यांच्या नादी लागलेल्या 'अंधभक्तां'च्या डोक्यात अजूनही प्रकाश पडत नाही, याचे आश्चर्य वाटते. यावरून ही सर्व मंडळी कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे 'लाभार्थी' असावेत, अशी शंका वाटते.



आजपर्यंतचे या उध्दट माणसाचे कारनामे, भाषणे बघता, यांना आरक्षण पाहिजे की, राज्यात अराजकता माजवून फडणवीस सरकार पाडण्याचा यांचा कट आहे? असा संशयाचा वास आता येऊ लागला आहे. गनिमीकाव्याने मुंबईकडे निघा, असे वृत्तवाहिन्यांवर जाहीरपणे सांगायचे. याचाच अर्थ यांना 'गनिमीकावा' म्हणजे काय? हेच कळत नाही. सरकारचा मला अटक करण्याचा डाव आहे, आंदोलन मोडून काढायचा कट सरकार शिजवत आहे, मला मारण्याची सुपारी दिली आहे. अशी खोटी प्रक्षोभक वक्तव्ये करून हे एकीकडे समाजाची सहानुभूती मिळवत आहेत. तर, दुसरीकडे समाजाला भडकवत आहेत. परवा तर यांनी बंदुकीच्या गोळीची भाषा केली. 'आमचा एक मारला तर, आम्हीही तुमचा एक मारू' ही धमकी म्हणजे 'दंगलसदृष्य' परिस्थिती निर्माण करून, संभाव्य दंगलीला खतपाणी घालण्याचा प्रयत्न ते करत आहेत, अशी शंका येते. कारण, मुंबईत घुसण्याची वेळ त्यांनी मुद्दाम 'गणेशोत्सवा'ची निवडली आहे. जरांगे आज जे वागत आहेत, तोंडात येईल ते बोलत आहेत, त्यांचे हे कृत्य संशयास्पद वाटत आहे. त्यांच्याकडे बघून त्यांच्यात एवढी हिंमत आहे, असे अजिबात वाटत नाही. या सर्व 'षडयंत्रा'चा मूळ सुत्रधार दुसराच कोणीतरी मोठा राजकीय व्यक्ती आहे, अशी शंका आता दाट होऊ लागली आहे.

खरेतर आजचे उपोषण करण्याची गरजच नव्हती. ४ प्रमाणपत्रे रद्द झाल्याचा प्रश्न होता. ३ मंत्री काही लोकप्रतिनिधी आले होतेच. जातपडताळणी समितीच्या अध्यक्ष व अधिका-यांना बोलावले असते तर, समोरासमोर 'दूधका दूध आणि पाणीका पाणी' झाले असते.आपले पितळ उघडे पडू नये म्हणून तर जरांगे जातपडताळणी समितीला बोलवण्याची मागणी करत नाहीत का? अशी शंकेची पाल मनात चुकचुकल्याशिवाय राहत नाही.

**- प्रदीप व्ही. खोलमकर**

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# घरकाम करणाऱ्या महिलेनेच विवाहितेचा 'सौदा' केला..!

## दोन मुलांच्या आईला विवाहाच्या नावाखाली विकले, संशयित महिलेची चौकशी झाल्यास आणखी किती प्रकरणे उघडणार?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ शहरातील एका विवाहित व दोन मुलांच्या आईला विवाहाच्या नावाखाली विकल्याच्या धक्कादायक प्रकरणात आता यवतमाळमध्ये घरकाम करणाऱ्या एका महिलेची भूमिका समोर आल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे, ज्या महिलेने संबंधित विवाहितेचा कथितरित्या सौदा केला, ती महिला अद्याप पोलिसांच्या तपासाच्या कक्षेत आलेली नसल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

या संशयित महिलेची कसून चौकशी केल्यास विवाहाच्या नावाखाली सुरू असलेल्या आणखी काही व्यवहारांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळात आपल्या दोन मुलांसह व आईसोबत राहणारी ही महिला अहमदनगर येथे कंपनीत काम मिळणार असल्याचे सांगून घराबाहेर पडली. त्यानंतर यवतमाळ येथील महिलेने हिंगणघाट परिसरातील महिलेशी संपर्क साधून तिची परस्पर विक्री केली याच माध्यमातून तिचा विवाहासाठी व्यवहार झाल्याचे समोर आले आहे.

सुरुवातीला तीन लाख रुपयांचा व्यवहार होणार असल्याची माहिती असताना, मध्यस्थ दलालांना बाजूला करून संबंधित घरकाम करणाऱ्या महिलेनेच या विवाहितेचा दीड लाख रुपयांत सौदा केल्याचा आरोप आहे. त्यानंतर हिंगणघाट येथे तिला सुपूर्द करण्यात आले. हिंगणघाट येथे संबंधित युवका सोबत तिचा कौटुंबिक पद्धतीने विवाह लावून देण्यात आला आणि त्यानंतर तिला अहमदनगर येथे पाठविण्यात आले. मात्र, विवाहानंतर ग्रामपंचायतीमध्ये अधिकृत विवाह नोंदणी करण्यासाठी दोघे गेले असता संपूर्ण प्रकाराला अनपेक्षित वळण मिळाले. विवाह नोंदणीच्या प्रक्रियेत महिलेच्या हाताचा ठसा घेतल्यानंतर आधार शी संबंधित माहिती समोर आली. त्यामध्ये तिच्या पहिल्या पतीचे नाव आणि पूर्वीच्या वैवाहिक जीवनाची माहिती उघड झाली. त्यामुळे नव्या पतीला धक्का बसला. विचारणा केली असता महिलेने समाधानकारक माहिती न दिल्याने संशय अधिकच बळावला. यानंतर दुसऱ्या नवऱ्या कडील मंडळींनी तिला यवतमाळ येथे आणून या प्रकाराची माहिती स्थानिक सामाजिक व राजकीय व्यक्तींना दिली. महिलेची प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधित प्रकरणात पोलिसांकडे तक्रार करून विवाहाच्या नावाखाली महिलांची कथित खरेदी-विक्री करणाऱ्या रॅकेटचा तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीअभावी अनेक प्रकरणे दडपली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाकडे केवळ एका कुटुंबाच्या फसवणुकी पुरते न पाहता विवाहाच्या नावाखाली महिलांची विक्री करणाऱ्या संभाव्य रॅकेटचा तपास करावा, अशी मागणी होत आहे.

### दीड लाखांत हिंगणघाटला सुपूर्द

### 'ती' महिला पोलिसांच्या रडारवर कधी?

**या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे यवतमाळमध्ये घरकाम करणाऱ्या ज्या महिलेने कथितरित्या या विवाहितेचा व्यवहार केला, तिच्यापर्यंत अद्याप पोलिस तपास पोहोचलेला नसल्याची माहिती आहे. तिची चौकशी झाल्यास या व्यवहारा मागे आणखी कोण कोण आहेत, याचा उलगडा होऊ शकतो. यवतमाळ, हिंगणघाट आणि अहमदनगर दरम्यान विवाहाच्या नावाखाली अशा प्रकारचे किती व्यवहार झाले, याचा तपास करण्याची गरज आहे. राळेगाव परिसरातही यापूर्वी अशाच स्वरूपाचा प्रकार समोर आल्याची चर्चा असल्याने, 'लुटेरी दुल्हन'च्या नावाने सुरू असलेल्या**



# दहीहंडीचा विरोध नाही..! नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांनाचे का?

## खड्डेमय रस्ते, कचरा अन् मोकाट जनावरांवरून नागरिकांचा संताप.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ शहरातील खड्डेमय रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, अस्वच्छता, मोकाट जनावरे-कुत्र्यांचा वाढता त्रास, शिक्षण व आरोग्याच्या समस्या प्रलंबित असताना मोठमोठ्या कार्यक्रमांना प्राधान्य का दिले जात आहे.

मोठ्या सेलिब्रिटी बोलाऊन शहराचा विकास होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक, पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) नागरिकांनी आपल्या विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. ॲड. जयसिंग चव्हाण यांनी शहरातील कार्यक्रमांसोबत रस्ते व इतर मूलभूत सुविधांकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली. उमेश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांबाबत प्रशासनाने ठोस निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली. ॲड. धनंजय मानकर यांनी नगराध्यक्षपदाची जबाबदारी केवळ उत्सव व कार्यक्रमांपुरती मर्यादित नसून नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हेही प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. ॲड. प्रवीण धूळधुळे यांनी दहीहंडीला विरोध



नसल्याचे स्पष्ट करत, रस्ते, पाणी, स्वच्छता आणि अन्य नागरी प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. विद्यार्थी प्रतिनिधींनी शिक्षणाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. तर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कापूस, सोयाबीन व तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांनाही प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली. कार्यक्रमांना विरोध नाही. पण खड्डेमुक्त रस्ते, सुरळीत पाणीपुरवठा, स्वच्छ शहर आणि नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण कधी? असा सवाल उपस्थितांनी केला. यावेळी सचिन मनवर, कृष्णा पुसनाके, यशवंत वादाफळे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात

### आश्रम शाळेची विद्यार्थिनी शरयू मडावी यांची एमबीबीएस साठी निवड..



**राळेगाव :** उच्च माध्यमिक आश्रम शाळा सावरखेड येथील कु. शरयू संजय मडावी या गुणवंत विद्यार्थिनीने आपल्या मेहनत ,जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा येथेMBBS अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कु. शरयूने वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून नियमित अभ्यास शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःच्या मेहनतीच्या बळावर तिने हे स्वप्न साकार केले आहे. तिच्या या यशामुळे उच्च माध्यमिक आश्रम शाळा सावरखेड तसेच परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आश्रम शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय एमबीबीएस साठी प्रवेश मिळवणे हे शाळेसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. तिच्या यशामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्येही मेहनत ,जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर कोणतीही ध्येय गाठता येते हा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.शरयू मडावी हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच शाळा व्यवस्थापनाच्या वतीने तिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून तिच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### श्रावण मासानिमित्त मुकुटबनमध्ये भव्य कावड यात्रा उत्साहात


**झरी :** श्रावण मासानिमित्त मुकुटबन येथील श्री राजराजेश्वर मंदिरात



दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. पैनगंगा नदीतून गंगाजल आणून कावडधारी भाविकांनी गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढत श्री राजराजेश्वर मंदिरात पोहोचून भगवान शिवाचा जलाभिषेक केला. या कावड यात्रेत हजारो भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, भगवे ध्वज, ढोल-ताशांचा गजर आणि हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण मुकुटबन नगरी भक्तिमय वातावरणाने भारावून गेली होती. महिला व पुरुष भाविकांसह युवकांचाही मोठा सहभाग दिसून आला. जलाभिषेकानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. श्रावणातील या भक्तिमय कावड यात्रेमुळे मुकुटबनमध्ये धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### सर्वम दही हांडी उत्सव दत्त चौकात होणार - रजनीकांत बोरेले

**पांढरकवडा :** येथील दत्त चौकात, जगदंबा निवास स्थान पुढे श्री.



क्रिष्ण जन्माष्टमी च्या निमित्याने दहीहांडी उत्सव साजरे करण्यात येणार आहे. सर्वम दहीहांडी उत्सव समिती च्या वतीने हा दहीहांडी उत्सव कार्यक्रम साजरा करण्यात येते यावेळी श्री कृष्ण भगतांची आणि मटकी फोड गोविंदा यांची मोठ्या संख्येने गर्दी जमा होते यावेळी अलपपोहर आणि प्रसाद ची व्यवस्था, वाजंत्री आणि बक्षीस इत्यादि सर्व खर्च प्रख्यात व्हिसल ब्लोअर आणि माहिती अधिकार कार्यकर्ते, रजनीकांत बोरेले यांच्या कडून केले जातात. सर्वम दही हांडी उत्सव कार्यक्रम दिनांक ५/सेप्टेंबर/२०२६ रोजी ला सायंकाळी होणार आहे.

# जिल्हा परिषद मराठी-उर्दू शाळांतील १७ शिक्षक पदे रिक्त..!

## पद भरतीची मुस्लिम युवा वर्गाची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ३ :** येथील पी.एम. श्री जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी शाळा तसेच उर्दू माध्यमिक शाळेत शिक्षकांची तब्बल १७ पदे दीर्घकाळापासून रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असून ही रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी मागणी पांढरकवडा येथील समस्त मुस्लिम युवा वर्गाच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री यांना केळापूर तहसीलदारांमार्फत सादर करण्यात आले. निवेदनानुसार, दोन्ही शाळांमध्ये एकूण ३९ शिक्षक पदे मंजूर आहेत. मात्र, सध्या केवळ २२ शिक्षक कार्यरत



असून १७ पदे रिक्त आहेत. शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने शाळेच्या दैनंदिन शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन रिक्त पदे भरावीत आणि विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी नगरसेवक मोहम्मद युसुफ, अनिस पोसवाल, अतिक शेख, माजिद खान, वाजीद कुरेशी, निसार पोसवाल, मोईज अन्सारी, सलमान बेग, अन्वर राणा, तन्वीर शेख, शोएब शेख यांच्यासह पांढरकवडा येथील युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रीय पिछड़ा वर्ग मोर्चाचे अनिश्चितकालीन धरणे आंदोलन सुरू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

### ओबीसी च्या जातीनिहाय जनगणनेसाठी



**पुसद, दि. ३ :** आगामी २०२७ च्या जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीयांची (OBC) ओबीसी जातीनिहाय अचूक व वैज्ञानिक पद्धतीने गणना करण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी 'राष्ट्रीय पिछड़ा वर्ग मोर्चा'च्या वतीने देशभरात राष्ट्रव्यापी आंदोलन छेडण्यात आले आहे. या आंदोलनाचाच एक भाग म्हणून पुसद उपविभागीय तथा तहसील कार्यालयासमोर अनिश्चितकालीन (बेमुदत)क्रमिक धरणे आंदोलनाला सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय पिछड़ा वर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन चालवले जात आहे. संघटनेच्या जाहीरनाम्यानुसार,२५ ऑगस्ट २०२६ रोजी पहिल्या टप्प्यात देशभर जिल्हा व तहसील प्रशासनाला निवेदने देण्यात आली होती. त्यानंतर २ सप्टेंबर २०२६ पासून दुसऱ्या टप्प्यात अनिश्चितकालीन धरणे आंदोलनाला सुरुवात झाली आहे.स्वतंत्र पर्याय उपलब्ध करा: २०२७ च्या जनगणनेत ओबीसींच्या स्पष्ट ओळखीसाठी अर्जात स्वतंत्र रकाना (ऑप्शन) आणि जातींच्या अचूक नोंदीसाठी 'ड्रॉप-डाऊन सूची' देण्यात यावी. २०११ मधील जनगणनेदरम्यान उघड्या प्रविष्टी पद्धतीमुळे (ओपन कॉलम) आकडेवारीत मोठ्या त्रुटी राहिल्या होत्या. तीच चूक पुन्हा न करता पारदर्शक व अचूक पद्धतीने जातनिहाय जनगणना करण्यात यावी. सामाजिक-आर्थिक न्यायाची गरज: देशातील बहुसंख्याक ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक स्थिती समोर आल्याशिवाय योग्य धोरणनिर्मिती आणि न्याय्य प्रतिनिधित्व शक्य नाही, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. या धरणे आंदोलनामध्ये पुसद परिसरातील राष्ट्रीय पिछड़ा वर्ग मोर्चाचे स्थानिक पदाधिकारी, रामराव होडगीर, अमोल कवडे,गणपत गव्हाळे,दिपक कांबळे,देवराव पाईकराव,दिलिप गायकवाड विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते लक्ष्मण आगासे,सुधाकर चव्हाण,गौतम जगताप,सतिश दानकरी,रवि सुर्वे,संतोष पोले आणि ओबीसी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# 'पैगाम-ए-रहमत'मधून सामाजिक विकृतींवर प्रहार..!

## व्यसन,आत्महत्या व कन्याभ्रूणहत्येविरोधात जनजागृती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** समाजातील वाढत्या व्यसनाधीनता, आत्महत्या, कन्याभ्रूणहत्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास या गंभीर समस्यांविरोधात सामाजिक प्रबोधनाची गरज अधोरेखित करत वहदत-ए-इस्लामी, हिंदतर्फे रबिउल-अव्वल महिन्यानिमित्त 'पैगाम-ए-रहमत-ए-आलम(स.)' या विषयावर जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत बुधवारी (२ सप्टेंबर) स्टेट बँक चौकातील हॉटेल मिडटाऊन येथे उद्बोधन कार्यक्रम झाला.

प्रमुख वक्ते प्रा. वहाब मलक यांनी मानवी मूल्यांचा होत असलेला ऱ्हास ही अनेक सामाजिक समस्यांची मुळं असल्याचे सांगत समाजाला आत्मपरीक्षणाची गरज असल्याचे स्पष्ट केले. व्यसनामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत असून केवळ कायद्याने नव्हे, तर




सामूहिक सामाजिक प्रयत्नांतून व्यसन मुक्तीची चळवळ उभी करावी, असे आवाहन त्यांनी केले. आत्महत्येच्या वाढत्या घटनांवर भाष्य करताना संकटातील व्यक्तीशी संवाद, आधार आणि वेळेवर मदत ही आत्महत्या रोखण्याची प्रभावी साधने असल्याचे त्यांनी नमूद केले. कन्याभ्रूणहत्येविरोधात बोलताना मुलगी ओझे नसून कुटुंब आणि समाजाची ताकद आहे. त्यामुळे मुलीच्या जन्माकडे समस्या म्हणून पाहण्याची मानसिकता बदलली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. पर्यावरण संवर्धनाबाबत वृक्षारोपण, पाण्याची बचत आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, डॉ. विजय कावलकर, रुपेश टेंभुरणे, राजेश गढीकर, ॲड. संजय टी. जैन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी वहदत-ए-इस्लामी, हिंदचे महासचिव डॉ. अनिस अहमद होते. सर्वधर्मीय नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.


# जि.प. अध्यक्षांचा बंगला ठेकेदाराच्या ताब्यात..!

## ४५ सुरक्षारक्षकांच्या नावावर केवळ ३५ जण वेतन-पीएफमध्येही कथित घोळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** जिल्हा परिषद यवतमाळ येथील सुरक्षा रक्षक व कर्मचारी पुरवठ्याचे कंत्राट घेणाऱ्या ठेकेदाराच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, जि.प. अध्यक्षांचा शासकीय बंगला कार्यालयासह खासगी वापरासाठी वापरला जात असल्याचा कथित प्रकार समोर आला आहे.

त्यामुळे शासकीय मालमत्तेचा वापर आणि कर्मचारी पुरवठा कंत्राटातील अनियमिततेची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरावार नामक ठेकेदाराकडे जिल्हा परिषदेच्या विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक तसेच साफसफाईसाठी महिला-पुरुष कर्मचाऱ्यांचा पुरवठा करण्याची जबाबदारी आहे. सुमारे ४५ सुरक्षारक्षक अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ ३५ कर्मचारी कार्यरत असल्याचा आरोप आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या



नावावर दाखविला जाणारा निधी नेमका कोणाच्या घश्यात जातो, असा सवाल उपस्थित होत आहे. याशिवाय कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमानुसार वेतन मिळते का, त्यांच्या भविष्य निर्वाह निधीची (पीएफ) रक्कम नियमित भरली जात नसून त्यामध्येही अनियमितता आहे. याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे कामगारांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारला जात असल्याचा आरोप असून, संबंधित कंत्राटची सखोल तपासणी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, अध्यक्षांचा बंगला सध्या रिक्त असताना त्याची देखभाल व सुरक्षा करण्याऐवजी या शासकीय बंगल्यातच ठेकेदाराने कार्यालय थाटल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर ठेकेदाराच्या नातेवाईकांच्या राहण्याची व्यवस्था याच ठिकाणी करण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे शासकीय बंगल्याला खासगी मालमत्तेचे स्वरूप आले आहे का? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बंगल्याच्या साफसफाई व उद्यान देखभालीसाठी सहा कर्मचारी दाखविले जात असताना प्रत्यक्षात चारच कर्मचारी काम करीत असल्याचा आरोप आहे. ही बाब खरी असल्यास कर्मचारी पुरवठा कंत्राटातील नोंदी आणि प्रत्यक्ष उपस्थिती यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद बांधकाम विभाग व प्रशासनाने बंगल्याचा वापर, कर्मचारी उपस्थिती, वेतन, पीएफ तसेच ठेकेदाराला झालेली देयके यांची विशेष चौकशी करावी. आरोप सिद्ध झाल्यास संबंधित ठेकेदाराचा ठेका रद्द करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भा.ज.पा.महिला मोर्चाच्या महागाव तालुका अध्यक्षपदी निर्मलाताई सोयाम निवड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ३ :** भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या महागाव तालुका अध्यक्षपदी निर्मला सोयाम यांची निवड करण्यात आली. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी तसेच महिला वर्गाला पक्षाच्या विचारधारेसोबत जोडण्यासाठी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

ही निवड मायाताई शेरे महाराष्ट्र प्रदेश सचिव महिला आघाडी भा.ज.पा., जयश्रीताई राठोड महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भाजपा(यवतमाळ), श्रीधर भवानकर भा.ज.पा.सवना,गुंज, मंडळ तालुका अध्यक्ष (महागाव), निलेश विश्वासराव नरवाडे भा.ज.पा. महागाव शहर मंडळ अध्यक्ष (महागाव) यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली निर्मलाताई सोयाम यांनी यापूर्वी पक्षाच्या



विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत संघटन वाढीसाठी योगदान दिले आहे. त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांची भा.ज.प. महिला मोर्चाच्या महागाव तालुका अध्यक्षपदी निवड केली. या निवडीबद्दल भाजप पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व समर्थकांकडून निर्मलाताई सोयाम यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. निर्मला सोयाम यांच्या निवडीमुळे महागाव तालुक्यात भाजप महिला मोर्चाला नवी ऊर्जा मिळणार असून, संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# फुलसावंगी परिसरात जिओचे नेटवर्क ठप्प!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. ३ :** आजच्या डिजिटल युगात जग मोबाईलच्या एका क्लिकवर आले. मात्र, फुलसावंगी परिसरात गेल्या दोन दिवसांपासून डिजिटल इंडियाची चाके रुतल्याचे चित्र दिसत आहे. रिलायन्स जिओ कंपनीची मोबाईल सेवा आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी पूर्णपणे कोलमोडल्याने ग्राहक पुरते त्रस्त झाले असून, 'जिओ झाले निर्जीव' अशी म्हणण्याची वेळ स्थानिक नागरिकांवर आली आहे.

मागील ४८ तासांपासून जिओचे टॉवर सिग्नल दाखवत नसल्याने केवळ फोन कॉल्सच नाही, तर हायस्पीड इंटरनेटवर अवलंबून असलेली सर्व कामे ठप्प झाली आहेत. नातेवाईक किंवा कामाच्या ठिकाणी साधा फोन करणेही अशक्य झाले आहे. गूगल पे, फोन पे यासारख्या यूपीआय सेवा बंद असल्याने छोट्या व्यापाऱ्यांपासून ते ग्राहकांपर्यंत सर्वांचे आर्थिक व्यवहार रखडले आहेत. घरगुती आणि व्यावसायिक कामांसाठी वापरली जाणारी जिओ फायबर सेवाही बंद असल्याने वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आणि विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हजारो रुपये खर्च करून घेतलेले महागडे स्मार्टफोन सध्या केवळ कॅमेरा किंवा म्युझिक प्लेयर म्हणून वापरावे लागत असल्याची भावना ग्राहकांनी व्यक्त केली आहे. 'आम्ही वेळेवर रिचार्ज करतो, मग सेवेच्या बाबतीत ही टाळाटाळ का?' असा सवाल संतप्त ग्राहकांनी विचारला आहे. दोन दिवस उलटूनही कंपनीकडून तांत्रिक बिघाडाबाबत कोणतीही अधिकृत माहिती किंवा सुधारणेचे संकेत न मिळाल्याने नाराजी अधिकच वाढली आहे. फुलसावंगी परिसरातील दुर्गम भागातील नेटवर्कची समस्या नेहमीचीच असली, तरी मुख्य बाजारपेठेत दोन दिवस सेवा बंद राहणे हा चिंतेचा विषय ठरत आहे. जिओ कंपनीच्या तांत्रिक विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ही निर्जीव झालेली सेवा त्वरित सजीव करावी, अशी मागणी जोर धरत आहे.


# मुडाण्यात व महागाव तालुक्यात 'बोगस बंगाली डॉक्टरां'चा सुळसुळाट..!

## वैध पदवी-नोंदणी नसल्याचा आरोप, चौकशी करून फौजदारी कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ३ :** तालुक्यातील मुडाणा येथे वैध वैद्यकीय पदवी अथवा शासनमान्य नोंदणी नसतानाही कथितरित्या वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्याची गंभीर तक्रार तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अर्जदार अर्जुन पंडित जाधव यांनी केली आहे. मुडाणा परिसरात काही व्यक्तींकडून कोणतीही वैध वैद्यकीय पात्रता अथवा अधिकृत नोंदणी नसताना रुग्णांवर उपचार केले जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. ग्रामीण



भागातील नागरिकांकडून अशा कथित बोगस डॉक्टरांकडे उपचार घेतले जात असल्याने चुकीचे निदान, औषधांचा गैरवापर तसेच रुग्णांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. 'पदवी-नोंदणीची पडताळणी करा' महागाव तालुक्यातील संशयित डॉक्टरांची तातडीने चौकशी करून त्यांच्या शैक्षणिक पात्रता व वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या नोंदणीची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुद्ध लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी, अशीही मागणी तक्रारदाराने केली आहे.तालुकाभर विशेष तपासणी मोहीम राबवा केवळ मुडाणा गावापुरती कारवाई न करता संपूर्ण महागाव तालुक्यात अशा संशयित वैद्यकीय व्यवसायांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून अहवाल पारदर्शकपणे जाहीर करावा, अशी मागणी अर्जदार अर्जुन पंडित जाधव यांनी केली आहे. प्रशासनाकडून तातडीने योग्य ती कारवाई न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यामुळे आता आरोग्य विभाग या तक्रारीची दखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी कधी करणार, याकडे मुडाणा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पाठीवरचे ओझे कमी करण्यासाठी आता 'स्कूल बॅग पॉलिसी'

## पूर्व प्राथमिक स्तराची दप्तर विना शाळा

**अमरावती/सुधीर केने**

शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्या वर होणारे दुष्परिणाम टाळण्या साठी आणि त्यांचे अध्ययन अधिक आनंददायी करण्यासाठी राज्य शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयाने स्कूल बॅग पॉलिसीची शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शरीराच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या धोरणाची काटेकोर अंमल बजावणी करण्यासाठी शिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणा धिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये शाळांसाठी महत्त्वाचे नियम लागू करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांच्या शरीराच्या वजनाचा विचार करून दप्तराचे वजन १० टक्क्यांपेक्षा जास्त वाढणार नाही, याची दक्षता मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी घ्यावी लागेल. शाळांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांचे व दप्तराचे वजन तपासून त्याची नोंद ठेवावी. वजन मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शक्य असल्यास शाळांनी विद्यार्थ्यांसाठी वर्गातच कपाटे, शेल्फ किंवा लॉकरची व्यवस्था करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना दररोज सर्व पुस्तके घरी नेण्याची आवश्यकता भासणार नाही. असे स्पष्ट करण्यात आले आहे



**पाण्याच्या बाटल्या आणणे बंद**

शाळांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना घरातून जड पाण्याच्या बाटल्या आणाव्या लागणार नाहीत. शाळांमधील पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरेशी व कार्यरत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी प्रशासनावर टाक ण्यात आली आहे.. पूर्व-प्राथमिक व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलत: पूर्व-प्राथमिक वर्गातील लहान विद्यार्थ्यांना शक्यतो शाळेत दप्तर आणण्याची आवश्यकता राहणार नाही, असे नियोजन शाळांनी करावे. तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शारीरिक गरजा लक्षात घेऊन आवश्यक सवलती व पर्यायी व्यवस्था करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# सहदुय्यम निबंधक कार्यालयात 'हेलपाट्यांचा' कारभार!

**अमरावती/का.प्र.**

अचलपूर येथील जमीन-घराच्या खरेदी-विक्रीपासून गहाणखतापर्यंतच्या महत्त्वाच्या व्यवहारांची नोंदणी करण्यासाठी अचलपूर सहदुय्यम निबंधक कार्यालयात येणाऱ्या नागरिकां च्या पदरी गैरसोयच पडत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. नव्याने रुजू झालेल्या सह दुय्यम निबंधकांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असून, दस्त नोंदणीसाठी वेळ देऊन आलेल्या नागरिकांना प्रतीक्षेत बसावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. एवढेच नव्हे तर दस्त नोंदणी झाल्यानंतर कागदपत्रांसाठीही नागरिकांना पुन्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचा आरोप होत आहे.



**नागरिकांच्या वेळेशी खेळ; प्रशासन झोपेतच?**
**चौकशी करून कारवाईची मागणी**

नागरिकांच्या वेळेची किंमत प्रशासनाच्या लेखी आहे की नाही? सरकारी कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागणे आणि पुन्हा पुन्हा चकरा माराव्या लागणे ही कोणती 'नागरिकाभिमुख' सेवा? असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे. दस्त नोंदणी ही केवळ कार्यालयीन प्रक्रिया नसून नागरिकांच्या आयुष्यभराच्या मालमत्ता व्यवहाराशी संबंधित बाब आहे. अनेक नागरिक दूरवरून वेळ आणि पैसा खर्च करून कार्यालयात येतात. दस्त नोंदणीसाठी तारीख दिल्यानंतर नागरिकांनी नियोजन करून उपस्थित राहायचे आणि कार्यालयीन कामकाजातील अडचणींमुळे त्यांनाच पुन्हा तारीख मिळणार असेल, तर या व्यवस्थेचा जाब कोण घेणार, असा सवाल नागरिकांतून होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकारी कार्यालयीन वेळेत नियमितपणे उपलब्ध राहत नसल्याच्या तक्रारी आहेत. अधिकारी उशिरा आल्यास दस्त नोंदणीच्या कामावर त्याचा परिणाम होतो आणि नागरिकांना प्रतीक्षा करावी लागते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे दररोज होणाऱ्या दस्त नोंदणींवर परिणाम होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाचा महसूल वाढविण्याची जबाबदारी असताना दस्त नोंदणीचे कामच वेळेत होत नसेल तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल आता ऐरणीवर आला आहे.

कागदपत्रांच्या बाबतीतही नागरिकांची अडचण कायम असल्याची तक्रार आहे. दस्त नोंदणी पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रे मिळण्यासाठी विलंब होत असून, कार्यालयातील प्रिंटरमध्ये बिघाड असल्याचे कारण सांगितले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तांत्रिक बिघाड हा कोणत्याही कार्यालयात होऊ शकतो; मात्र पर्यायी व्यवस्था करणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का? एखाद्या प्रिंटरच्या बिघाडामुळे नागरिकांना पुन्हा कार्यालयात बोलावून त्यांचा वेळ आणि पैसा वाया जाणे कितपत योग्य आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

# विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा-यांचा 'कर्तव्यपूर्ती सोहळा'

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी आयोजित 'कर्तव्यपूर्ती सोहळ्यात' अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच सत्कारमूर्ती गणेश व्यवहारे, व्यवहारे, अंजली गणोरकर, देवानंद गणोरकर, रजनी चपाटे, सुनिल चपाटे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व सत्कारमूर्तीचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर व्यवहारे यांचा मोनाली तोटे पाटील, अंजली गणोरकर यांचा पुनम जाधव, रजनी चपाटे यांचा मनिषा कु-हेकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला. यावेळी सत्कारमूर्ती गणेश व्यवहारे, अंजली गणोरकर, रजनी चपाटे यांनी आपल्या मनोगतात सेवाकाळात सहका-यांकडून मिळालेला प्रेम, आदरभाव याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करुन सेवाकाळात केलेल्या कार्याची त्यांनी माहिती दिली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने कोषाध्यक्ष राजेश एडले, प्रज्ञा बोडे, डॉ. नितीन कोळी यांनी सत्कारमूर्तीचा भागभांडवलाचा धनादेश व प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तीच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# भाजीपाला दुकानात शिरली कार

**अचलपूर/वार्ताहर**

२ सप्टेंबर रोजी रात्री दरम्यान परतवाडा-अमरावती मार्गावरील शहरातील विदर्भ मील परिसरात एक चारचाकी वाहन चक्क भाजीपाला दुकानाच्या आतमध्ये शिरल्याने वाहनचालक आणि एक प्रवाशी जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे रात्रीचा वेळ असल्याने ते भाजीपाला दुकान बंद होते. अन्यथा मोठी घटना घडली असती. एकीकडे या मार्गावर वाहनाची मोठी गर्दी असते. हा अपघात नेमका कसा घडला? याबाबत विविध चर्चाना उधाण आले आहे. ही चारचाकी वाहन अल्टो असून वाहन क्रमांक एम एच ३० ए ए ४०८१ आहे. यावेळी नागरिकांची गर्दी जमा झाली होती. एकीकडे या मार्गावर अनेक दुकाने आहे. यामुळे नेहमी वाहतुकीला अडथळा होत असतो. विशेष म्हणजे बसेस, ऑटो, चारचाकी वाहन, दुचाकी चक्क रस्त्याचा मध्ये उभी असतात. यामुळे लहान-मोठे अपघात तर नित्याचेच झाले आहे. यामुळे हा अपघात नेमका कसा झाला? याला दोषी कोण? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.



# एस.टी.च्या अरेरावीविरोधात काँग्रेस-युवक काँग्रेस आक्रमक!

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

उड्डाणपूल सुरू होऊन दोन वर्षे उलटली तरीही प्रवाशांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या एस.टी. महामंडळाच्या मनमानी कारभाराविरोधात माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने छेडलेल्या तीव्र आंदोलनाला मोठे यश आले आहे. एनएसयूआय व युवक काँग्रेसच्या माध्यमातून झालेल्या या आंदोलनात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व नागरिकांची उपस्थिती होती. एस.टी. महामंडळाकडून जादा दराची तिकिटे आकारली जात असल्याचा व सामान्य जनतेची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा मुद्दा उचलत काँग्रेसने आगार व्यवस्थापकांना धारेवर धरले होते. अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले असून, चांदूर रेल्वे आगारामधून चालणाऱ्या धामक-बेलोरा मार्गावरील वाढीव तिकीट दर कमी करण्यात आले आहेत.

गेल्या दोन वर्षांपासून चांदूर रेल्वे ते राजुरा या मार्गावर रेल्वे उड्डाणपुलावरून वाहतूक सुरू झाली होती, मात्र प्रवाशांकडून जुन्या लांब मार्गानुसारच जादा तिकीट वसूल करून प्रवाशांची सतत पिळवणूक केली जात होती. यामुळे विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेत आगार व्यवस्थापकांना थेट घेराव घातला होता. या आक्रमक आंदोलनामुळे प्रशासनाला अखेर झुकत माप द्यावे लागले असून, संगणकीय प्रणालीतील किलोमीटर अंतरामध्ये सुधारणा करत नवीन कमी केलेले तिकिट दर लागू करण्याचे लेखी आदेश द्यावे लागले आहेत. या संपूर्ण आंदोलनात युवक

**चांदूर रेल्वे-बेलोरा मार्गावरील वाढीव तिकीट दर अखेर कमी**
**आ. वीरेंद्र जगताप यांच्या आंदोलनाला यश**



तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलनाला महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे काँग्रेस शहराध्यक्ष रूपेश पुडके यांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

यावेळी केवळ तिकीट दरवाढीचा प्रश्नच नव्हे, तर प्रवाशांच्या मूलभूत सुविधांकडेही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. चांदूर रेल्वे एस.टी. डेपो परिसरातील स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करावी आणि प्रवाशांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी आक्रमक मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. भविष्यात प्रवाशांची अशीच पिळवणूक केल्यास याहून अधिक महासचिव परीक्षित जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांनी व विद्यार्थ्यांनी या लढ्यात आक्रमक सहभाग नोंदवला. तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व सर्वसामान्य प्रवासी सहभागी झाले होते. लढा यशस्वी केल्याबद्दल परिसरातील जनतेकडून माजी आमदार वीरेंद्र जगताप, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप, युवक काँग्रेस, एनएसयूआय व काँग्रेस पक्षाचे जोरदार स्वागत व अभिनंदन केले जात आहे.

# धारणी नगर पंचायतीतील सोलर लाईट खरेदीवर प्रश्नचिन्ह

## लाखोंचा खर्च तरी लाईट बंद; वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी

**मेळघाट/वार्ताहर**

नगरपंचायतीकडून करण्यात आलेल्या सोलर लाईट खरेदी आणि त्यावर करण्यात आलेल्या लाखो रुपयांच्या खर्चाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. एका सोलर लाईट खांबाची किंमत जवळपास २ लाख ४० हजार रुपये असल्याची माहिती समोर आली असून, प्रत्यक्ष खांब आणि त्यावरील सोलर यंत्रणा पाहता एवढी मोठी किंमत योग्य आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका यंत्रणेमध्ये दोन सोलर प्लेट, दोन लहान बॅटऱ्या आणि चार सोलर लाईट अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे. शासनाच्या धोरणानुसार ही खरेदी करण्यात आल्याचे सांगण्यात येत असले, तरी प्रत्यक्ष साहित्य आणि त्याची गुणवत्ता पाहता खरेदीची किंमत जास्त असल्याची शंका व्यक्त होत आहे. त्यामुळे या संपूर्ण खरेदीची, दरांची आणि गुणवत्तेची शहानिशा जिल्हा धिका ऱ्यांनी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

धारणी नगरपंचायतीमध्ये यापूर्वीही जवळपास दीड वर्षापूर्वी अशाच प्रकारे सिंगल लाईट आणि एक बॅटरी असलेले सुमारे ४० सोलर खांब बसविण्यात आले होते. मात्र आज या खांबांपैकी अनेकांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे दिसून येत आहे. अनेक लाईट बंद असून, काही साहित्य खराब अवस्थेत आहे. लाखो रुपये खर्च



करून बसविण्यात आलेली ही यंत्रणा काही वर्षातच निष्प्रभ होणे ही सार्वजनिक निधीच्या योग्य वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी बाब आहे. अनेक सोलर लाईट कधी सुरू तर कधी बंद असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही लाईट बसविल्यानंतर नेमके किती काळ सुरू राहिले आणि नंतर केव्हा बंद पडले, याची स्पष्ट माहितीही नागरिकांना उपलब्ध नाही. संबंधित सोलर लाईट बंद पडल्यानंतर त्यांच्या दुरुस्ती आणि देखभालीकडे नगरपंचायतीने पुरेसे लक्ष दिले नसल्याचा आरोप होत आहे.

या सोलर लाईट खरेदीबाबत वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, तक्रारी असूनही बंद पडलेल्या लाईटची दुरुस्ती करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शासनाचा निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असताना तो नेमका कुठे आणि कशा पद्धतीने खर्च केला जात आहे, तसेच खर्च करण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता आणि त्याची देखभाल कोणाच्या जबाबदारीत येते, याचीही सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

एवढा मोठा खर्च करून उभारण्यात आलेली सोलर लाईट यंत्रणा किमान १० ते १५ वर्षे कार्यरत राहणे अपेक्षित असताना काही वर्षातच ती बंद पडत असेल, तर या खर्चाची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे धारणी नगरपंचायतीतील सर्व सोलर लाईट खरेदी, त्यावरील खर्च, साहित्याची गुणवत्ता, तांत्रिक तपासणी, दुरुस्ती आणि देखभाल याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहानिशा करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे.

# संक्षिप्त

## डॉ. श्रीकांत शेळके यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**अमरावती** - संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील श्री. श्रीकांत शेळके यांनी वनस्पतीशास्त्र (Botany) विषयामध्ये आपली पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय 'Studies on Morphotaxonomy and Antimicrobial Analysis of Poroid Fungi from Melghat, Amravati' असा असून, या संशोधनामध्ये मेळघाट परिसरातील पोरॉइड बुरशींच्या आकारिकी, वर्गीकरणात्मक तसेच प्रतिजैविक गुणधर्मांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांनी आपले संशोधनकार्य डॉ. दिलीप व्ही. हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक व संशोधनात्मक यशाबद्दल श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, विभागप्रमुख डॉ. डी. डी. खेडकर तसेच डॉ. जी. बी. हेडाव, डॉ. रेखा मंगीरवार, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. पुंडकर, डॉ. अंकित काळे, डॉ. अविनाश दर्शिमे तसेच इतर प्राध्यापक व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. श्रीकांत शेळके यांच्या या यशामुळे श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे.

## गोरक्षण संस्थेस कडबा कटर मशीन देऊन गो-सेवा




**दर्यापूर** - परिसरातील माहुली (धांडे) शेत शिवारात कार्यरत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेस एका आधुनिक कडबा कापणी यंत्राची भेट मिळाली आहे. येथील सुप्रसिद्ध दुर्गा वेल्डिंग वर्कस् यांनी दान देऊन ही गो सेवा साधली आहे. या प्रतिष्ठानचे संचालक सूरज राजपूत हे नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती जीवनासाठी सुविधा असणाऱ्या विविध यंत्रांची निर्मिती करीत असतात. त्यांचे द्वारे गोरक्षण संस्थेस अत्यंत गरजेचे असणारे कडबा-कटर यंत्र दान स्वरूपात उपलब्ध झाल्याने संस्थेच्या विश्वस्त मंडळाने सूरज राजपूत यांचे मनस्वी अभिनंदन केले आहे. या यंत्राचे विधिवत पूजन संस्थेस सदिच्छा भेट देणारे पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील गायत्री गोशाळा संस्थेचे संचालक तथा सेवानिवृत्त अधिकारी विक्रम बोके यांचे शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी प्रगतीशील शेतकरी जयसिंगदादा देशमुख तथा तळवेल येथील संभाजी देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. गोरक्षण संस्था व दुर्गा वेल्डिंग वर्कस् यांच्यात शेती विषयक कार्यासाठी विविध संशोधीत उत्पादने व यंत्र निर्मिती यासाठी सामंजस्य करार होत आहे हे या प्रसंगा निमित्याने अधोरेखांकित ठरणारे आहे. संचालक प्रा. गजानन भारसाकळे यांना केंद्र शासनाने नुकतेच गाईच्या शेणाची गोवरी निर्मिती आय ओ टी बेस यंत्रासाठी पेटेंट देऊन सन्मानित केलेले आहे ही बाब इथे उल्लेखनिय आहे.

## गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची संयुक्त पाहणी



**अंजनगाव सुर्जी** - आगामी गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी हद्दीत मधील मुख्य गणपती मिरवणूक मार्गाचे निरीक्षण (रूट ऑडिट) करण्यात आले. या रूट ऑडिट पाहणीमध्ये पोलीस, महसूल आणि नगरपरिषदसह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी एकत्रितपणे सहभागी झाले होते. यावेळी प्रामुख्याने खालील अधिकारी उपस्थित होते. सुनील हुड, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग अंजनगाव सुर्जी वैष्णवी बाविस्कर, उपविभागीय दंडाधिकारी (एस्ड), विजय लोहकरे, मुख्याधिकारी, नगरपरिषद अंजनगाव यांच्यासह स्वच्छता विभाग, विद्युत विभाग आणि नगर विभागाचे अधिकारी पुष्पा सोळंके, तहसीलदार, अंजनगाव यश चव्हाण, सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अंजनगाव किशोर राऊत, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंजनगाव तसेच बॅरिकेटिंग व ध्वनीचे काम पाहणारे ठेकेदार व इतर कर्मचारी. अनेक ठिकाणी इलेक्ट्रिक तारा, वायर लोंबकळत असल्याचे, इलेक्ट्रिक खांब, टेलिफोन खांब व केबल वायर धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच रस्त्यावरील खड्डे, धोकादायक व जीर्ण भिंती (शिकस्त भिंती), शेडींग नेट, तसेच मिरवणुकीस अडथळा ठरू शकणारे बॅनर व फ्लेक्स बोर्ड आढळून आले. मिरवणूक निर्विघ्नपणे व सुरक्षितपणे पार पडावी यासाठी संबंधित सर्व विभागांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या आहेत. लोंबकळणाऱ्या तारा काढणे, खड्डे बुजवणे, धोकादायक बॅनर काढणे आणि बॅरिकेटिंग व ध्वनी यंत्रणा सुसज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## राष्ट्रीय स्तरावरील अॅबॅकस स्पर्धेत उत्साहात



**अचलपूर** - ५४ वी राष्ट्रीय स्तरावरील अॅबॅकस स्पर्धेचे परतवाडा महालक्ष्मी लॉन येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अचलपूर तालुक्यातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. अवघ्या पाच मिनिटात बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग असे गणिते विद्यार्थ्यांनी क्षणात सोडवली. त्यापैकी परतवाडा मिल-कॉलनी येथील शिक्षिका अपर्णा जावरकर यांना या कार्यक्रमात बेस्ट टीचर आणि स्टार टीचर या दोन पारितोषिकाने गौरविण्यात आले. अपर्णा जावरकर याच्या क्लास मधील ४ विद्यार्थी चॅम्पियन्स, ३ विद्यार्थी मास्टर अॅबॅकस, २६ विद्यार्थी टॉप-टेन मध्ये आणि १५ विद्यार्थी हे एक्सलेंट आणि बेस्ट चे मानकरी ठरले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रविण तायडे, नगराध्यक्ष रुपाली माथने, नगरसेविका अपर्णा रोडे, अरविंद अपाले, शरद काळे, हेमंत जावरकर, गजानन सोनवणे, सुधीर जवंजाळ, परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी कनक राम चुलेट हिने अवघ्या ५ मिनिटात १३८ बेरीजा, प्रणई निखिल ढेपे हिने बेरीज वजाबाकी १३९, शौर्य प्र. रायबोले याने ११९, आर्यन निलेश बैराळे याने ९८ गणिते सोडवुन चॅम्पियन्स ट्रॉफी मिळवली. तर अर्पित असरकर, भूमि बद्रटीये, अनया बद्रटीये हे विद्यार्थी विशेष मास्टर चे मानकरी ठरले. प्रियल अ. चित्रकार १४१ गुणाकार, तन्वी ढेपे हिने ११९ वजाबाकी - बेरीज, निलम हेडाऊ १२९ गुणाकार, मनस्वी ठाकरे ११९ गुणाकार, आराध्या मालखेडे ११८, श्रवण असरकर ८७, परी ढिंगे १०४ गुणाकार, हिमांशु जावरकर ९८, रेयांश दातीर १०६, परम गाडगे १०४, देवांशी इचे १११, स्वानंद उताणे १०० आणि इतर सर्व विद्यार्थी हे एक्सलन्ट आणि बेस्ट चे मानकरी ठरले.

# सक्तीच्या शिक्षणाच्या निव्वळ बाता

**शि**क्षणाचे वाढलेले प्रमाण हा समाधानाचा पैलू असला तरी गुणवत्तेत मात्र फार बदल जाणवत नाही. शाळांत मुलांची वाचन-लेखनातली प्रगती अजूनही समाधानकारक नाही. मेळघाटमधील एका शाळेत आम्ही गेलो तेव्हा मुले डिजिटल क्लासमध्ये चित्रपट बघत बसली होती. मुलांची शिक्षिका गावातच कुठे तरी गेल्या होत्या. आम्ही गेल्यावर त्या आल्या. मुलांना फळ्यावरील 'दिनविशेष' हा शब्द वाचायला सांगितला. मुले तो वाचू शकली नाहीत. चौथीच्या मुलाला दोन आकडी संख्या वाचायला प्रयास पडत होते. शाळा मात्र डिजिटल होती!



परभणी जिल्ह्यात जिंतुर तालुक्यातल्या एका छोट्या गावातल्या शाळेत दोनच शिक्षक नेमलेले होते; पण ते शाळेत आलटून पालटून उपस्थित राहत असावेत असे उत्तरांवरून वाटत होते. रस्त्याने येताना जाणवले की सकाळच्या शाळा एक तास अगोदर सोडून दिलेल्या होत्या. शाळा सुटण्याची प्रत्यक्षातली वेळ गावकऱ्यांनाही सांगता येत नव्हती. हे सर्व तपशील नकारात्मक आहेत पण हे वास्तव एकूणच शाळांची विश्वासार्हता ठरवते हे लक्षात घ्यावे. उस्मानाबाद जिल्ह्यातल्या जळकोटमधील भटक्यांच्या वस्तीत दीडशे घरे आहेत. वस्तीत सर्व मिळून फक्त २२ मुले शाळेत जातात. वस्तीतली सर्वांत जास्त शिकलेली मुलगी आता पाचवीत आहे. संपूर्ण वस्तीत फक्त तीन मुली शिकतात. मेळघाटमधीलच खडीमल येथील शाळेत २७ पैकी १९ मुले हजर होती. शाळेतल्या नऊ विद्यार्थ्यांचे पालक स्थलांतर करणार असल्याने ती मुले शाळा सोडून जाणार आहेत. जिथे जातील तिथे परत शाळेत भरती होतील की नाही, हे खात्रीशीररीत्या सांगता येत नाही. विद्याथ्यर्थ्यांकडे कोणतेच साहित्य नव्हते. अनेकांकडे पाटीही नव्हती; पुस्तकांची तर बातच सोडा. शिक्षक म्हणाले, 'मुलांना साहित्य दिले आहे, पण मुले ते आणत नाहीत.' मुले काहीच बोलत नव्हती. मला दप्तराच्या ओझ्यावरील निरर्थक चर्चा आठवली. शाळेतल्या केवळ एका मुलाला वाचता येत होते. तो मुलगादेखील मूळचा त्या शाळेतला नव्हताच, दुसऱ्या गावातला होता.

नागपूर जिल्ह्यातील मौंदा येथील धीवर वस्तीत ३०० कुटुंबे आहेत. या वस्तीत अगदी थोडी मुले बारावी पास झाली आहेत. संगीता मारबती या मुलीकडे जातीचा दाखला नव्हता. त्यामुळे महाविद्यालयाने तिच्याकडे पाच हजार रुपये मागितले होते. त्यामुळे तिचा पुढल्या शिक्षणाचा मार्ग खुंटला होता. आदल्या वर्षी तिची बहीण माधुरी हिने जातीचा दाखला निघत नाही व त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण परवडत नाही म्हणून शिक्षण सोडलेले. ती आता आईसोबत मजुरीला जाते. वडील मासे पकडतात. घर अतिशय साधे आहे. दोघी बहिणी सुट्टीच्या काळात केटरर्सकडे भांडी घासतात. मुलींचे वडील त्यांच्या दाखल्यासाठी स्वतःच्या जन्मगावी भंडारा इथे गेले; पण तिथे आता त्यांना ओळखणारे कोणीही नाही. वडिलांचा जन्म १९४०च्या दशकातला. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांना 'त्या काळातील नोंदी वाचता येत नाहीत' असे लेखी उत्तर दिले. एकेक कागदपत्रे मिळवताना येणाऱ्या अडचणींमुळे वंचितांच्या उच्च शिक्षणाला खीळ बसते.

**पैशांच्या चणचणीमुळे गुणी मुलांच्या शिक्षणाचा झालेला खेळखंडोबा, हे चित्र विदीर्ण करणारे आहे. असे हताश करणारे चित्र असले तरी काही आशेची किरणेही दिसली.**

पैशांची चणचण आणि त्यामुळे गुणी मुलांच्या शिक्षणाचा आईच्या शस्त्रक्रियेच्या खर्चासाठी एक मुलगा शाळा सोडून सालगडी झालेला मी बघितला. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवतीत बंजारा जमातीच्या एका मजूर महिलेला दारू विकण्याच्या केवळ संशयावरून पोलिसांनी बेदम मारले, त्यामुळे तिला पोटाचा विकार सुरू झाला. ती आता मजुरीला जाऊ शकत नाही. ती आपल्या दोन्ही मुलांचा एकटीने सांभाळ करते. पैशाअभावी तिने नाइलाजाने मुलांना शाळेतून काढले. ती मुले आता शेळ्या चारायला जातात. शेळ्या वळण्याचे मोठ्या मुलाला १५० रुपये व लहान मुलाला १०० रुपये मिळतात. ती आता मोठ्या मुलाला सालगडी करणार आहे. त्यातून तिच्या शस्त्रक्रियेचा खर्च निघेल असे तिला वाटते. एकीकडे सक्तीच्या शिक्षणाच्या बाता होत असताना राज्यातल्या अनेक विभागांमध्ये असे चित्र नजरेस पडते.

शिक्षण घेतानाच्या इतरही काही अडचणी आहेत. लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील रेल्वे स्टेशनजवळ एक उघड्यावरची वस्ती आहे. तिथल्या अनेक मुलांनी शाळा सोडली आहे. त्याचे कारण त्यांना विचारल्यावर एकजण पटकन म्हणाला, की शाळेत त्यांना इतर मुले मारायची. शिक्षकांना सांगितले तर शिक्षकही आम्हालाच मारायचे. खरे खोटे काहीही असो, पण ती मुले आज शाळेबाहेर आहेत. त्या भागातल्या काही आश्रमशाळांना जेव्हा विद्यार्थ्यांची गरज होती तेव्हा त्यांनी या वस्तीतील मुलांना आपणहून शाळेत नेले. त्यांच्यासाठी गणवेश शिवून घेतले. मुलांना आणण्यासाठी रोज रिक्षा यायची; पण त्यांची गरज संपली. आत्ता रिक्षा पाठवत नाहीत आणि मुलंही शाळेत जात नाहीत.

आशेची किरणे

शिक्षणाबाबत हताश करणारे चित्र असले तरी त्याच्या जोडीला राज्याच काही यशोगाथाही लिहिल्या जात आहेत. हेमलकशाच्या लोकबिरादरी प्रकल्पातर्फे नेलगुंडा इथे सुरू मुले आनंदाने येतात. येथे दुसरीच्या वर्गातील मुले सहजपणे झालेले साधना विद्यालय बघता आले. भामरागडपासून आत जंगलात २९ किलोमीटरवरील या शाळेत लांबलांबून इंग्रजीचं पुस्तक वाचत होतो. शाळेत मुलांना मातीकाम व इतर कलांसाठी खूप वेळ ठेवलेला आहे.शाळेच्या दिशेला जाणारा घड रस्ता नाही. आसपास दाट जंगल आहे. असे असूनही मुले शाळेत येण्यास नेहमीच उत्सुक असतात. समीक्षा आमटे आणि शाळेचे इतर शिक्षक शाळेवर, मुलांसाठीच्या विविध उपक्रमांवर खूप मेहनत घेत आहेत. असेच एक उदाहरण हिंगोली जिल्ह्यातील एका शाळेचे. जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यात तरोदा येथील शाळेत देविदास गुंजकर या शिक्षकाने मुलांच्या क्षमता विकसित करण्यावर खूप मेहनत घेतली आहे. शाळेतल्या दुसरीच्या मुलांनी दहावीच्या पाठ्यपुस्तकातील अनेक कठीण शब्द लिहून दाखवले. हे सर्व गाव आदिवासी लोकवस्तीचे आहे. तालुक्यातील इतर शाळेतल्या शिक्षकांसाठी गुंजकर गुरुजींच्या इथे कार्यशाळा घेतल्या जातात. मुलांचे वर्ग सुरू असताना कार्यशाळेचे शिक्षकही वर्गात बसलेले असतात. आतापर्यंत अशा ८० कार्यशाळा झाल्यात. गुंजकर गुरुजी म्हणतात, 'जो शिक्षक घाईघाईने शिकवतो त्याचे विद्यार्थी शिकण्यात मागे पडतात आणि जो शिक्षक सावकाश, दमादमाने शिकवतो त्याची मुले झपाट्याने प्रगती करतात.'

शिक्षणामागचे मर्म जाणले तरच महत्त्वाचे आहे. असे झाले तरच वाड्या-वस्त्यांवरचे शिक्षण खऱ्या अर्थाने वरच्या वर्गात जाईल. सरकारी शाळांकडे संसाधने कमी आहेत. त्यासाठी संघर्ष करावाच लागेल पण तरीही या शाळा गुणवत्तेनेच स्पर्धा करू शकतात हे अनेक शाळांनी आणि शिक्षकांनी सिद्ध केले आहे. अशा मराठी शाळांनी इंग्रजी शाळेकडून विद्यार्थी खेचले आहेत.(उत्तरार्ध)

**हेरंब कुलकर्णी**
८२०८५८९१९५

# दहीहंडीचा 'जल्लोष' की जीवाचा 'जुगार'?



**श्री**कृष्ण जन्माष्टमी हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत पवित्र सण. श्रीकृष्णाचे बालपणीचे लीलामृत आणि त्याने दिलेला कर्मयोगाचा संदेश आपल्याला नेहमीच संकटांशी लढण्याची आणि सत्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो. हा आनंदोत्सव एकमेकांमध्ये आपुलकी वाढवणारा असावा; मात्र काळानुरूप या सणाला जोडल्या गेलेल्या व्यावसायिकतेमुळे आज आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

आज दहीहंडी म्हणजे शुद्ध आनंदोत्सव राहिला नसून ते शक्तीप्रदर्शन, राजकीय चढाओढ आणि जाहिरातींचे मैदान बनले आहे. यातही सर्वात चिंतेची बाब म्हणजे, लाखो रुपयांच्या बक्षीसांसाठी उंचच उंच दहीहंडी बांधण्याची लागलेली स्पर्धा. प्रसिद्धीसाठी मानवी मनोरे रचताना अनेक गोविंदा पथके अतिशय धोकादायक पद्धतीने आपला जीव धोक्यात घालतात. काही लाखांच्या बक्षीसासाठी किंवा प्रसिद्धीसाठी तरुणांचे अपघात होणे, अपंगत्व येणे किंवा जीव जाणे अत्यंत दुर्दैवी आहे.


श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये मानवी जीवनाचे आणि कर्माचे महत्त्व सांगितले आहे. 'मनुष्य जन्म अत्यंत दुर्मिळ असून तो अनेक योनींमधून भ्रमण केल्यानंतर प्राप्त होतो.' अशा या अमूल्य मानवी जीवनाला केवळ काही लाखांच्या बक्षीसांसाठी आणि क्षुल्लक प्रसिद्धीसाठी अशा धोकादायक कसरती करत धोक्यात घालणे अजिबात योग्य नव्हे.ही स्पर्धा आता थांबायला हवी. प्रशासनाचे नियम पाळून सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे आहे. यंदाची जन्माष्टमी केवळ प्रसिद्धीचा धोक्याचा खेळ नव्हे, तर मानवी जीवनाचा सन्मान करणारी आणि श्रीकृष्णाच्या खऱ्या विचारांची जोपासना करणारी ठरावी!

**प्रिया बागडदेव**

# नवसाचा कान्हा अन् पिढ्यान पिढ्यांची श्रद्धा

**शि**रजगाव-मोझरी गावात गोकुळाष्टमी म्हणजे केवळ श्रीकृष्णजन्माचा उत्सव नाही, तर पिढ्यान पिढ्या जपल्या गेलेल्या एका श्रद्धेचा पुनर्जन्म असतो. गोकुळाष्टमीची चाहूल लागताच गावातील घराघरांत लगबग सुरू होते. अंगणे स्वच्छ होतात, देव्हारे सजतात आणि सायंकाळी मातीच्या श्रीकृष्णाच्या मूर्तीचे घरात आगमन होते. देव्हाऱ्यात कान्हाची स्थापना होताच घरातील वातावरण भक्तिमय होते. पूजा, आरती आणि भजनांच्या स्वरांतून जणू गोकुळच घराच्या उंबरठ्यावर अवतरते.

या गावातील तेली समाजासाठी श्रीकृष्णभक्तीची ही परंपरा केवळ धार्मिक विधी नाही.तिच्यामागे श्रद्धेची एक जुनी कथा आहे.गावातील ज्येष्ठांच्या कथनानुसार,पूर्वी एका तेली समाजातील व्यक्ती गवळ्याच्या घरी काम करीत होती.त्याला अपत्य नव्हते.त्याने श्रीकृष्णाला नवस केला.पुढे त्याची मनोकामना पूर्ण झाल्याची श्रद्धा निर्माण झाली आणि श्रीकृष्ण नवसाला पावतो,अशी भावना समाजात दृढ झाली.याच श्रद्धेतून घराघरांत नवसाचा श्रीकृष्ण बसवण्याची परंपरा सुरू झाल्याचे सांगितले जाते.तेव्हापासून कृष्णजन्माचा हा



सोहळा शिरजगाव-मोझरीच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला.गोकुळाष्टमीच्या सायंकाळी मातीच्या मूर्तीची स्थापना होते आणि मग सुरू होते ती मध्यरात्रीच्या कृष्णजन्माची प्रतीक्षा.घरात उपवास केलेला असतो. घड्याळाचे काटे मध्यरात्रीकडे सरकत असताना टाळ-वीणेचा नाद अधिक खुलत जातो.भजनांचे सूर वातावरण व्यापून टाकतात. बारा वाजताच कृष्णजन्म साजरा होतो.कान्हाला नैवेद्य दाखवला जातो आणि त्यानंतर उपवास सोडला जातो. त्या क्षणी घरातील प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्ती आणि समाधानाचे भाव असतात.

या उत्सवाचे वैशिष्ट्य एवढ्यावरच थांबत नाही.दुसऱ्या दिवशी घराघरांत गोपाळकाला आणि भोजनाचा प्रसाद होतो.दीड दिवस घरात विराजमान राहिल्यानंतर कान्हाच्या निरोपाची वेळ येते. संध्याकाळी पाचच्या सुमारास घराघरांतून श्रीकृष्णाच्या मूर्ती बाहेर काढल्या जातात. ढोल-ताशांच्या गजरात त्या हनुमान मंदिराकडे आणल्या जातात. गावातील सर्व कान्हे एका ठिकाणी एकत्र येतात. सामूहिक पूजा आणि आरती होते. प्रसादाचे वाटप झाल्यानंतर या सर्व मूर्तींची मिरवणूक गावातून निघते.

मिरवणुकीत ढोल-ताशांचा निनाद असतो, कृष्णनामाचा जयघोष असतो आणि भक्तिभावाने सहभागी झालेला गाव असतो. घराघरांत वेगवेगळ्या देव्हाऱ्यांत विराजमान झालेला कान्हा या क्षणी मात्र संपूर्ण गावाचा होतो.गावच्या रस्त्यांवरून निघालेली ही मिरवणूक नदीकाठी पोहोचते आणि विधीपूर्वक श्रीकृष्णमूर्तींचे विसर्जन होते.मातीचा कान्हा नदीच्या प्रवाहात विलीन होतो; पण त्याच्यासोबतची श्रद्धा मात्र संपत नाही. पुढच्या गोकुळाष्टमीची चाहूल लागेपर्यंत ती प्रत्येक घराच्या स्मरणात राहते. नवसाची ही कथा खरी-खोटी ठरवण्यापेक्षा तिच्यातून पिढ्यान पिढ्या जपली गेलेली आस्था महत्त्वाची ठरते. काळ बदलला, गाव बदलले, जगण्याच्या पद्धती बदलल्या; पण शिरजगाव-मोझरीतील तेली समाजाच्या घराघरांत येणारा हा नवसाचा कान्हा आजही त्या जुन्या श्रद्धेची आणि परंपरेची साक्ष देत उभा आहे.

**मयुरी बारी**

## त-ड-का

### हे कृष्णा..!

अर्जुनाचा सारथी बनुनी
तु दिलेस अध्यात्माचे धडे
तुझ्या राजनीतीचे आजही
त्रिभूवनी वाजती चौघडे...!

भ्रष्टाचाराने बरबटलेले
प्रजेचे काय करतील भले
देश गहाण टाकण्यासही
हे न पाहती मागे पुढे...!


दिशाहीन राज्यकर्ते
रथ हाकती विनाशाकडे
हे कृष्णा, डोळस दृष्टी
देण्या
तू ये सत्वर गडे...!

राजनितीज्ञांचा पितामह तू
वंदन करती जग सारे
पण नेते आमचे
स्वार्थापायी
आज 'राजधर्म' विसरले
रे...!



**प्रा अशोक सारडा, मेहकर**
९४२१३९४३३९

# ...सलाम त्या रणरागिणीला



साडी सोडली, पण माणुसकी जिंकली! हे वाक्य वाचायला जरी वेगळे वाटत असले तरी हे वाक्य खूपच सुंदर आणि अर्थपूर्ण आहे! हे वाक्य अशा प्रसंगाचे वर्णन करते जिथे एखाद्या महिलेने स्वतःच्या साडीची किंवा वैयक्तिक बाबींची अब्रूची पर्वा न करता, संकटसमयी दुसऱ्याचे प्राण वाचवण्यासाठी किंवा मदत करण्यासाठी धावून जाणे पसंत केले. नेपाळ-तिब्बत सीमेवर आलेल्या भीषण महापुरात तामिळनाडूच्या मयूराम येथील पुंगुझली नावाच्या महिलेने आणि त्यांचे पती रत्नाकुमार यांनी दाखवलेले हे अद्भूत शौर्य आहे. जिथे या महिलेने स्वतःची साडी नदीत बुडणाऱ्याला वाचवण्यासाठी दोरखंड म्हणून वापरली, किंवा अपघाताच्या वेळी लाज-लज्जा बाजूला सारून माणुसकीचे दर्शन घडवले.साडी ही स्त्रीची अब्रू असते, साडी सोडल्याचा महाभारताचा इतिहास आहे, मात्र एका स्त्रीने आपल्या अब्रूची पर्वा न करता आपल्या अंगावरची साडी सोडून नेपाळमधील भीषण महापुरात तामिळनाडूच्या एका धाडसी महिलेने आपल्या साडीचा दोरीसारखा वापर करून २१ भाविकांचे प्राण वाचवले तामिळनाडूतील ५७ भाविक नेपाळ-तिबेट सीमेजवळ कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते महाभारतात द्रौपदीच्या वस्त्रहरणाची आणि तिच्या अब्रूची कथा आपण ऐकतो, पण या कलियुगात एका स्त्रीने पारंपरिक समजुतींच्या पलीकडे जाऊन, संकटाच्या वेळी आपला जिव धोक्यात घालून अंगावरची साडी हेच जीव वाचवण्याचे शस्त्र बनवून भाविकांचे प्राण वाचविले अशा या रणरागिणीला मानाचा सलाम..

**राजू जाधव**

# ८ व्या वर्षी 'पॅड' सांभाळणारी तुमची मुलगी... ही प्रगती की अधोगती?

**प**रवाची गोष्ट. ओपीडीत एक आई-बाबा आपल्या आठ वर्षांच्या मुलीला घेऊन आले. मुलीच्या एका हातात अजूनही तिची आवडती 'गोड डॉल' होती आणि दुसरीकडे आईच्या डोळ्यात पाणी.

तक्रार काय?

'डॉक्टर, तिला 'पाळी' (Periods) सुरु झाली आहे.'

हे वाचून तुमच्या काळजात धस्स झालं ना?

मला नाही झाले.कारण आता माझ्या क्लिनिकमध्ये हे रोजचे झालेय. ज्या वयात मुलींनी दोरीच्या उड्या मारायच्या, त्या वयात त्या चिमुरड्या जीवांना सॅनिटरी पॅड्सची कटकट आणि पोटाचे क्रॅम्प्स सांभाळावे लागत आहेत.

'आई, मला रक्त का येतेय?' हा ८ वर्षांच्या मुलीचा प्रश्न ऐकून त्या मातेचे काळीज फाटले होते... आणि एक डॉक्टर म्हणून माझे डोके सुन्न झाले होते.

हे बालपण हिरावून घेणे नाही, तर काय आहे?

एक बालरोगतज्ज्ञ (Pediatrician) म्हणून मी तुम्हाला अत्यंत कडू सत्य सांगतो, जे पचवायला तुम्हाला जड जाईल:

आपण आपली मुले 'वाढवत' नाही आहोत, आपण त्यांना 'फुगवतोय'.जसे पोल्ट्री फार्ममध्ये इंजेक्शन देऊन ४० दिवसांत 'ब्रोयलर चिकन' तयार केले जाते, तशीच काहीशी अवस्था आज आपण आपल्या पोटच्या गोळ्याची केली आहे. ही 'वाढ' नाही, ही शरीराची 'सूज' आहे!

याला जबाबदार कोण?आपली 'मॉडर्न' लाईफस्टाईल आणि पालकांची सोयीस्कर वृत्ती!

बघा आपण नकळत त्यांच्या आयुष्याशी कसे खेळतोय:

५०० रुपयांचा पिझ्झा की आयुष्याची होळी?

विकेंडला मॉलमध्ये ५००-८०० रुपयांचा पिझ्झा/बर्गर खाताना तुम्ही फोटो काढून 'इन्स्टा'वर टाकता... 'फॅमिली टाईम!'

अहो, तो 'फॅमिली टाईम' नाही, ती तुमच्या पोरांच्या आरोग्याची 'होळी' आहे! तो रबरासारखा मैदा आणि 'प्रोसेस्ड चीझ' म्हणजे हार्मोनल इम्बॅलन्सचा कारखाना आहे.

शरीरात जेवढी चरबी जास्त, तेवढे 'इस्ट्रोजेन' जास्त तयार होते. आणि हेच जास्तीचे हार्मोन त्या ८ वर्षांच्या मुलीच्या कोवळ्या मेंदूला सांगते, 'बाळा, तुझे बालपण संपले, आता तू बाई झालीस!'

गरम अन्नासाठी प्लॅस्टिकचा डबा?

स्टीलचा डबा जड वाटतो आणि प्लास्टिकचा डबा फॅन्सी दिसतो, म्हणून तो मुलांच्या माथी मारताय?

जेव्हा तुम्ही त्यात वाफाळलेली गरम भाजी टाकता,तेव्हा त्यातील 'झिनो-इस्ट्रोजेन्स' (Xenoestrogens) अन्नात उतरतात. हे रसायन शरीरात गेल्यावर 'बहुरुपिया' (Imposter) सारखे वागते. शरीराला वाटते हे इस्ट्रोजेनच आहे आणि शरीर अकाली वाढायला लागते.

तुमच्या 'फॅन्सी' सवयीने तुम्ही निसर्गाचे घड्याळच बिघडवून टाकले!

दूध-चिकन की 'हार्मोनल बॉम्ब'?

'डॉक्टर,पोरगी खूप बारीक आहे,तिला नॉन-व्हेज देऊ का? दूध किती पाजू?'

तुम्ही तिला खायला नक्की घाला, पण बाजारातले ते ४० दिवसात फुगलेले 'ब्रॉयलर' कोंबडे आणि पिशवीतले 'केमिकल' दूध देताना शंभर वेळा विचार करा.

चिकन:त्या कोंबडीला लवकर मोठे करण्यासाठी 'ग्रोथ हार्मोन्स'चे हेवी डोस दिले जातात.तेच तिच्या पोटात जातात. यामुळेच आजकाल चौथीतल्या मुलींच्या ओठांवर लव (Facial Hair) येते. हे PCOD चे पहिले लक्षण आहे!

दूध:गाई-म्हशींना जास्त दुधासाठी दिलेली 'ऑक्सिटोसिन'ची इंजेक्शन्स दुधावाटे तुमच्या मुलीच्या



इवल्याशा गर्भाशयाला 'मोठे होण्याचे'चुकीचे सिग्नल देतात.

तुम्ही 'प्रथिने' समजून जे खाऊ घालताय,ते प्रत्यक्षात 'हार्मोनल बॉम्ब' आहेत!

**सर्वात भयानक वास्तव**

या वयात पाळी सुरू झाली म्हणजे तिची हाडे लवकर जुळणार आणि उंची कायमची थांबणार. हे थांबवण्यासाठी मग उपाय काय?'हार्मोन सप्रेशन थेरपी!'

कल्पना करा..त्या ८ वर्षांच्या कोवळ्या फुलाला,तिची पाळी थांबवण्यासाठी पुढची ३-४ वर्षे दर महिन्याला एक वेदनादायक, जाड सुईचे इंजेक्शन घ्यावे लागणार!

तुमची लाडकी लेक दर महिन्याला त्या सुईच्या भीतीनी थरथर कापणार आणि तुम्ही हतबल होऊन ते बघणार.

**विचार करा पालकांनो...**

१० वर्षांनंतर जेव्हा ती तुम्हाला विचारेल: 'आई-बाबा, तेव्हाच का नाही लक्ष दिले? त्या पिझ्झा-बर्गरपेक्षा माझे आयुष्य महत्त्वाचे नव्हते का?' तेव्हा तुमच्याकडे काय उत्तर असेल?

अजूनही वेळ गेलेली नाही... सुधरा!

- किचनमधून 'व्हाईट पॉयझन'(मैदा, साखर) फेकून द्या.
- प्लॅस्टिकच्या डब्याला काडी लावा:फक्त स्टील वापरा.
- मुलांना 'ब्रॉयलर'बनवू नका:त्यांना मातीत खेळू द्या,उन्हात धावू द्या.
- लाड करणे म्हणजे विष खाऊ घालणे नाही, हा निष्काळीजपणा आता थांबवा!

**डॉ. सुजित भरत पाटील**
बालरोगतज्ज्ञ, पुणे.

# पीआरसी समितीने घेतली मुर्तीजापूर पंचायत समितीची झाडाझडती!

## तीन तास सखोल पाहणी ; योजना, विकासकामे, निधीवापरासह विभागनिहाय कामकाजाची तपासणी

**■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायत राज समितीने (पीआरसी) गुरुवारी मुर्तीजापूर पंचायत समितीच्या कामकाजाची तब्बल तीन तास सखोल पाहणी करून विविध शासकीय योजना, विकासकामे, निधीचा वापर आणि विभागनिहाय कामकाजाचा आढावा घेतला. समितीच्या या पाहणीमुळे पंचायत समिती प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती.

पीआरसी समितीचे अध्यक्ष तथा विधानसभा सदस्य संतोष दानवे यांच्या अध्यक्षतेखाली ही पाहणी करण्यात आली. यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रतापराव अडसूळ, आमदार संजय मेश्राम, उपसचिव रवींद्र जगदाळे, समितीचे अधिकारी रुपेश पार्टी, अमेय कासते, सतीश चोरगे, अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे तसेच मुर्तीजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मिलिंद मोरे उपस्थित होते. समितीने पंचायत समितीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची कागदपत्रे, नोंदवही, मंजुरी आदेश, खर्चाचे विवरण, कामांची प्रगती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. विशेषतः २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध योजनांसाठी प्राप्त निधी, झालेला खर्च आणि विकासकामांची सद्यस्थिती याची छाननी करण्यात आली.

केवळ कागदोपत्री नोंदी तपासण्यापुरती समितीची पाहणी मर्यादित राहिली नाही. योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे का, विकासकामे नियमानुसार झाली आहेत का आणि उपलब्ध निधीचा योग्य वापर झाला आहे का, याबाबतही समितीने अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली.



समाजकल्याण, महिला व बालकल्याण, दिव्यांग योजना, शिक्षण, आरोग्य, शालेय पोषण आहार, बांधकाम यांसह विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. लाभार्थी निवड प्रक्रिया, प्रशासकीय नोंदी, विकासकामांशी संबंधित कागदपत्रे तसेच प्रलंबित बाबींचीही समितीने तपासणी केली. समितीच्या प्रश्नांना संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तरे देत विभागनिहाय माहिती सादर केली.

### "कंझरा शाळा, अंगणवाडीचीही पाहणी

दरम्यान, पीआरसी समितीचे सकाळी ११ वाजताच्या सुमारास मुर्तीजापूर पंचायत समितीत आगमन झाले. पंचायत समितीतील कामकाजाची पाहणी केल्यानंतर समितीने मुर्तीजापूर-पिंजर मार्गावरील कंझरा येथील जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडीला भेट देऊन तेथील व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा, शैक्षणिक व्यवस्था तसेच अंगणवाडीतील कामकाजाबाबत समितीने माहिती जाणून घेतली. यावेळी नागरिकांनी विविध बाबींसंदर्भात समितीकडे तक्रारी साद केल्याचेही समजते. त्यानंतर समिती धोत्रा मार्गे बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजरकडे रवाना झाली.

### नेमके काय निष्पन्न झाले?

तब्बल तीन तास चाललेल्या या पाहणीदरम्यान समितीने विविध विभागांच्या कामकाजातील बारकावे तपासल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांचे लक्ष समितीच्या प्रश्नांकडे लागले होते.

समितीने कोणत्या बाबींवर आक्षेप नोंदविले, प्रशासनाला कोणत्या सूचना केल्या आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत समितीच्या पाहणीत नेमके काय निष्पन्न झाले, याबाबत अधिकृत अहवालानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पीआरसीच्या या पाहणीच्या निष्कर्षांकडे मुर्तीजापूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पुनर्विवाहाच्या बहाण्याने महिलेची फसवणूक; आरोपीला अटक



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

पुनर्विवाहासाठी व्हॉट्सॲप ग्रुपवर बायोडाटा टाकलेल्या महिलेचा विश्वास संपादन करून आपण नायब तहसीलदार असल्याचे भासवित बनावट ओळखपत्र तयार करणाऱ्या आरोपीला सिव्हिल लाइन पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा येथून अटक केली. आरोपीने संबंधित महिलेशी धार्मिक पद्धतीने विवाह करून सुमारे दोन महिने तिच्यासोबत वास्तव्य केले आणि यादरम्यान तिची १ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी न्यू तापडिया नगर, अकोला येथील ४१ वर्षीय महिलेने सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. महिलेने पुनर्विवाह करण्याच्या उद्देशाने व्हॉट्स?प ग्रुपवर आपला बायोडाटा टाकला होता. याच माध्यमातून आरोपी संदीप उर्फ सुवर्णदिप पुरुषोत्तम वानखडे (३९, रा. पातुर्डा, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा) याने तिच्याशी संपर्क साधला.

आरोपीने आपण नायब तहसीलदार असल्याचे भासवून महिलेचा विश्वास संपादन केला. त्यासाठी नायब तहसीलदार पदाचे बनावट ओळखपत्रही तयार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने संबंधित महिलेशी धार्मिक पद्धतीने विवाह केला आणि सुमारे दोन महिने तिच्यासोबत वास्तव्य केले. यादरम्यान महिलेची १ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल झाली.

### नायब तहसीलदार असल्याचे भासवून बनावट ओळखपत्राद्वारे लग्न; १ लाख ८० हजारांची फसवणूक

या प्रकरणी सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५८७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ८५, ३१९(२), ३१८(४), ३३६(३) व ३४०(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपासाची मदत घेतली. या तपासाच्या आधारे आरोपीचा ठावठिकाणा निश्चित करून पोलिसांनी पातुर्डा, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा येथून त्याला ताब्यात घेत अटक केली.

अटकेनंतर आरोपीला अकोला जिल्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सिव्हिल लाइन पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मालती कायटे, सहायक पोलीस निरीक्षक महेंद्र शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन घाटोळे आणि पोलीस कॉन्स्टेबल शाम तोंडे यांनी केली.

जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अकोला व वाशिम
बुलढाणा अर्बन बँकेच्यासमोर, टिळक रोड, अकोला ४४४००१
दूरध्वनी क्र. - ०७२४-२९९२१६६ ईमेल - dwoakola@mahawakf.com

क्र.मरावमं/जिव अका/चौकशी /योजना/ २/९/ २०२६ दिनांक:- २४ ऑगस्ट २०२६

(जाहीर प्रगटन)

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणेबाबत.

**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता :-** दारुल उलूम गौसिया अहले सुन्नत-उल-जमात मस्जीद-ओ-मसलके-आला हजरत बरेली, अकोट, ता. अकोट, जि. अकोला (MSBW/21/2007)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री मोहम्मद जावेद अब्दुल जब्बार सिद्दिकी व इतर यांनी दिनाकं १२/०८/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत निवडणूकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मोहम्मद जावेद अब्दुल जब्बार सिद्दीकी | अध्यक्ष |
| २ | मोहम्मद इस्माईल हाजी अहेमद जी | उपाध्यक्ष |
| ३ | अब्दुल रहीम शमशुद्दीन खत्री छिपा | सचिव |
| ४ | अब्दुल सत्तार हाजी अहमदजी | खजिनदार |
| ५ | मोहम्मद याकुब मोहम्मद शौकत | सदस्य |
| ६ | सत्तार शाह कादर शाह | सदस्य |
| ७ | इमरान खान जमीर खान | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अकोला व वाशिम, बुलढाणा अर्बन बँकेच्या समोर, टिळक रोड, अकोला-४४४००१ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

(शेख इब्राहीम)
जिल्हा वक्फ अधिकारी अकोला व वाशिम

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम

**■ प्रतिनिधी | अकोल ■**

भारत निवडणूक आयोगाने दि.०१.१०.२०२६ या अर्हता दिनांकावर आधारीत घोषित केलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरण कार्यक्रमाचाही समावेश होता. मतदान केंद्रांच्या सुसुत्रिकरणानंतर जिल्हयात एकूण १ हजार ७४० मतदान केंद्रे आहेत. अकोला जिल्हयाच्या मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरण प्रस्तावास मा. भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार अकोला जिल्हयात ३२-मुर्तिजापूर (अजा) विधानसभा मतदार संघातील शेलु बाजार येथील मतदार संख्येचा विचार करता एकाच इमारतीमध्ये असलेल्या दोन मतदान केंद्रापैकी मतदान केंद्र क्रमांक २१ हे मतदान केंद्र क्रमांक २० मध्ये पूर्णपणे समाविष्ठ करण्यात आले आहे.

याव्यतिरीक्त जिल्हयातील मतदान केंद्रामध्ये कोणताही बदल नाही व कोणतेही नविन मतदान केंद्र तयार होत नाही.

# मिटकरींच्या निवासस्थानी पंचायत राज समिती सदस्यांची सदिच्छा भेट

## अकोला जिल्ह्यातील विकासकामांसह ग्रामीण प्रश्नांवर चर्चा

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायत राज समितीच्या अकोला जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार अमोल मिटकरी यांच्या निवासस्थानी समिती सदस्यांची सदिच्छा भेट झाली. मिटकरी यांनी समिती सदस्यांचे स्वागत करून जिल्ह्यातील विविध विकासात्मक प्रश्नांवर त्यांच्याशी संवाद साधला.

पंचायत राज समितीचे सदस्य आमदार संजय मेश्राम, आमदार विक्रम काळे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार किरण लहामटे, आमदार जयंत आसगावकर आणि आमदार नितीन देशमुख यावेळी उपस्थित होते.ग्रामीण भागातील विकासकामे, पंचायत राज व्यवस्थेचे बळकटीकरण, स्थानिक



स्वराज्य संस्थांसमोरील अडचणी तसेच जिल्ह्यातील विविध विकासविषयक प्रश्नांवर यावेळी चर्चा झाली.

ग्रामीण भागाच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

समिती सदस्यांच्या अकोला दौऱ्याच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत जिल्ह्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर माजी आमदार मिटकरी यांनी चर्चा केली. लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय आणि संवादातून स्थानिक प्रश्नांना प्रभावीपणे मांडता येते, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. पंचायत राज समितीच्या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण विकास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित प्रश्नांना पुन्हा एकदा व्यापक व्यासपीठ मिळाले असून, या पार्श्वभूमीवर झालेली सदिच्छा भेट महत्त्वाची ठरली.

जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे नीता सुधाकर रोकडे यांचे वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - काळी, शेत सर्वे क्रं. १६८ मधील लेआऊट प्लॉट क्रं. १६९ याचे ऐकून क्षेत्रफळ १०५४.४८ चौ. फुट, ता. कारंजा लाड आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे नीता सुधाकर रोकडे यांच्या मालकीची आहे. तदनंतर, त्यांनी Vastu Housing Finance Corporation Ltd. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि. २३/०१/२०२० रोजीचे दस्त क्र. ३६३ हे मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/ इतर बँक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ३ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही आणि सदर मालमत्ता हि Vastu Housing Finance Corporation Ltd.. येथे गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना.

**ठिकाण-** तालुका- कारंजा लाड, जिल्हा वाशीम
दि. ०३/०९/२०२६

आपला
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती, मो. नं. ९८२३६९८७४५

# बाळापूर तालुका पत्रकार संघातर्फे २४ वा गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात



**■ प्रतिनिधी | मोखा ■**

अकोला जिल्हा पत्रकार संघाशी संलग्न बाळापूर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मोखा येथील सखाराम महाराज विद्यालयात २४ वा गुणवंत विद्यार्थी सत्कार समारोह उत्साहात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, अकोला जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकत अली मिरसाहेब, चिटणीस संजय खांडेकर, उपाध्यक्ष रामदास वानखडे, ज्येष्ठ पत्रकार रमेश ठाकरे, पत्रकार दिलीप दांदले ,नितीन गुप्ता, यांच्यासह आयोजक राजू वैराळे, बबलू देशमुख, अमोल जामोदे तसेच बाळापूर तालुक्यातील पत्रकार व मान्यवर उपस्थित होते. 'गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान' — सिद्धार्थ शर्माङ

यावेळी मार्गदर्शन करताना मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आणि क्षमता आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि व्यासपीठ मिळाले तर हे विद्यार्थी भविष्यात समाजाचे नाव उज्ज्वल करतील. बाळापूर तालुका पत्रकार संघाने गेल्या २४ वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची परंपरा सातत्याने जपली आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. पत्रकारांनी केवळ वृत्तांकन न करता समाजातील सकारात्मक उपक्रमांना बळ देण्याचे कामही केले

# शासकीय आश्रमशाळेत शिक्षक भरती उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया आजपासून सुरू झाली. यासंदर्भातील सविस्तर जाहीर सूचना व वेळापत्रक अमरावती अपर आयुक्त कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार संपूर्ण पडताळणी प्रक्रिया शनिवार (दि.५) पर्यंत पार पडणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या २ हजार ४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखती शिवाय निवड झालेल्या प्राथमिक शिक्षक- ९२७, माध्यमिक शिक्षक- ४२१ आणि उच्च माध्यमिक शिक्षक- २५२ अशा एकूण १६०० उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. त्यात पेसा क्षेत्रातील ४५९ तर नॉन-पेसा क्षेत्रातील ११४१ उमेदवारांचा समावेश आहे.

संबधित उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक अर्हता कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. नाशिक विभागात सर्वाधिक पात्र ५८८ उमेदवार असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ४२४ उमेदवार, नागपूर विभागात २९६उमेदवार तर अमरावती विभागात २९२ उमेदवार आहे. संबंधित उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे, जाहिरातीनुसार लागणारी कागदपत्रे आणि प्रत्येक कागदपत्राची एक साक्षांकित (self-attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. निर्धारित केलेल्या दिनांक व वेळेत अनुपस्थित राहिल्यास त्याबाबतची जबाबदारी उमेदवाराची राहणार आहे. पात्र उमेदवारांची सविस्तर यादी https://tribal. maharashtra. gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश - २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस
प्रोसेस नं.१९४०/२०२६ दिनांक : ३१/०८/२०२६
Guardian Wards No. 592 / 2026 Fix for: 29/09/2026
1) Masarrat Jahan Wd/o Syed Sardar, 2) Syed Azeem S/O Syed Sardar, 3) Ashemeera Kashaf D/o Syed Sardar, 4) Syed Wasique S/O Syed Sardar, Applicants No. 2 to 4 are Minors through their Natural Guardian Mother i.e. Applicant No. 1, All R/o Khidki Pura, Barshitakli, Tq. Barshitakli, Dist. Akola
-Vrs-
NIL

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'APPLICATION UNDER SECTION 7 OF THE GUARDIAN AND WARDS ACT, 1890 FOR APPOINTMENT OF GUARDIAN OF MINOR APPLICANTS NO. 2 TO 4 AND THEIR PROPERTY' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख २९/०९/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला २९/०९/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ३१ माहे ऑगस्ट सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला :-
दिनांक :-३१/०८/२०२६

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

Change In Name

I Have change My Name from
GHAFFAR KHAN SATTAR KHAN
-TO- GAFFAR KHAN SATTAR KHAN
My Residential Address In KASID PURA,
Patur Akola 444501

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पातूर पंचायत समितीची पंचायतराज समितीकडून झाडाझडती

## जीर्ण इमारतीच्या अवस्थेवर समितीची तीव्र नाराजी ; त्रुटींची पूर्तता करण्यासाठी अधिका-यांना मुदत

**■ प्रतिनिधी | पातूर ■**

अकोला जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायतराज समितीने गुरुवारी पातूर तालुक्यातील विकासकामे आणि पंचायत राज संस्थांच्या कारभाराची झाडाझडती घेतली. समितीने बाबुळगाव ग्रामपंचायतीतील दस्तऐवज, विविध योजनांची अंमलबजावणी तसेच पातूर पंचायत समितीच्या प्रशासकीय कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. दरम्यान, पंचायत समितीची जीर्ण व धोकादायक इमारत पाहून समितीचे गटप्रमुख आमदार विक्रम काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

आमदार विक्रम काळे यांच्या नेतृत्वाखालील समितीमध्ये आमदार जयंत आजगावकर आणि आमदार



किरण लहामटे यांचा समावेश होता. समितीने सर्वप्रथम बाबुळगाव ग्रामपंचायतीला भेट देत ग्रामपंचायतीच्या विविध नोंदवह्या, कागदपत्रे आणि विकासकामांशी संबंधित अभिलेख तपासले. शासकीय योजनांची अंमलबजावणी, ग्रामपंचायतीच्या कामकाजातील पारदर्शकता आणि विकासकामांची कागदोपत्री पूर्तता याबाबत समितीने संबंधितांकडून माहिती जाणून घेतली.

यानंतर समितीने पातूर पंचायत समिती कार्यालयाला भेट देत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी पंचायत समितीची प्रशासकीय इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

इमारतीची अवस्था पाहून आमदार काळे यांनी नाराजी व्यक्त केली. धोकादायक इमारतीत अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून प्रशासकीय कामकाज सुरू असल्याबाबत त्यांनी गांभीर्याने दखल घेतली. इमारतीच्या नूतनीकरणासह नवीन प्रशासकीय इमारतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाकडे विशेष शिफारस करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची तपासणी

पंचायतराज समितीने ग्रामसेवक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचीही तपासणी केली. विविध योजनांची अंमलबजावणी, विकासकामांची नोंद, आवश्यक अभिलेख आणि प्रशासकीय कागदपत्रांची पाहणी करताना काही त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या. संबंधित त्रुटींची तातडीने पूर्तता करून आवश्यक कागदपत्रे समितीसमोर सादर करण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवकांना मुदत देण्यात आली.

### शुक्रवारी ऑडिट अहवाल सादर होणार

पातूर पंचायत समितीच्या संपूर्ण कामकाजाचा लेखापरीक्षण अहवाल शुक्रवारी जिल्हा परिषदेत होणाऱ्या विशेष सभेत सादर केला जाणार आहे. या अहवालातील निरीक्षणे आणि त्रुटींच्या आधारे समितीकडून पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बैठकीकडे पातूर तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेसह नागरिकांचेही लक्ष लागले आहे. पाहणी दौऱ्यावेळी पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी, विविध ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, विभागप्रमुख तसेच अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# संस्कारांची शिदोरीच पुढच्या पिढीची खरी संपत्तीः आपणों उत्सवा'तून कुटुंबव्यवस्थेला साद

## नाती जपा, संस्कार जपा; नाहीतर संपत्ती राहील, पण आपलेपणा हरवेल - भगवतीदेवी बल्दवा यांचा कानमंत्र

**वर्धा/जनमाध्यम**

पैसा, संपत्ती आणि व्यवसाय पुढच्या पिढीला वारशाने देता येतो मात्र संस्कारांचा वारसा कृतीतूनच देता येतो. त्यामुळे अधिकारांची मागणी करण्यापूर्वी कर्तव्यांची जाणीव ठेवा आणि संस्कारांची साखळी तुटू देऊ नका, असा मोलाचा संदेश प्रसिद्ध उद्योजिका तथा 'हर्बल फार्मा क्वीन' भगवतीदेवी बल्दवा यांनी दिला. माहेश्वरी मंडळ वर्धाच्या वतीने आयोजित 'आपणों उत्सव' उत्साहात पार पडला. यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

नव्या पिढीला केवळ उपदेश करून संस्कार देता येत नाहीत, तर मुले मोठ्यांचे आचरण पाहून शिकतात, असे सांगत बल्दवा यांनी कुटुंबव्यवस्थेतील अनेक संवेदनशील प्रश्नांवर रोखठोक भाष्य केले. सण-उत्सव केवळ औपचारिकता न ठेवता त्यामागील परंपरा आणि संस्कृती मुलांना समजावून सांगा, असे आवाहन त्यांनी केले.

महिलांनी शालीन वस्त्रांना प्राधान्य द्यावे, मुलांच्या वर्तनासोबत त्यांच्या वस्त्रांची निवडही विचारपूर्वक करावी, असे सांगताना त्यांनी तरुणांना व्यसनांपासून दूर राहण्याचा आणि मित्रांची निवड काळजीपूर्वक करण्याचा सल्ला दिला. मुलांना यशस्वी नव्हे, तर चांगला माणूस बनवा, असा संदेशही त्यांनी पालकांना दिला. सासरी गेलेल्या मुलींच्या संसारात वारंवार हस्तक्षेप न करण्यासोबतच बहू-बेटींमध्ये भेदभाव न करण्याचे आवाहन त्यांनी केले. पालकांनी स्वतः



मोबाइलमध्ये व्यस्त राहून मुलांना मोबाइलपासून दूर राहण्याचा उपदेश करू नये, असेही त्यांनी सुनावले. सुशिक्षित सून घरात येत असेल तर मुलांनाही घरकामात हातभार लावण्याची सवय लावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

**डॉ.रमण हेड़ा यांचा गौरव**

विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. रमण हेड़ा यांचा सत्कार करण्यात आला. वर्ध्याच्या स्वातंत्र्यसैनिक शांतिदेवी जाजू यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी वर्ध्याच्या मातीला नमन केले. प्रत्येक समाजबंधूने व्यवसायात पुढे जावे, महिला आत्मनिर्भर व्हाव्यात आणि समाजाने सर्वांच्या कल्याणाची परंपरा कायम ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात ज्येष्ठांचा सन्मान, गोपीरतन पारिवारिक न्यासातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, सांस्कृतिक कलाकारांचा सत्कार तसेच स्व. कमलादेवी गोपालदास राठी यांच्या स्मरणार्थ गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाला रंगत आणली.

राजकुमार जाजू यांनी संचालन केले. हरीश गांधी यांनी आभार मानले. अध्यक्ष नंदकिशोर भुतडा यांनी प्रास्ताविक केले. गोविंद टावरी यांच्यासह चारही मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विविध समित्यांनी परिश्रम घेतले.

# वाघाच्या दहशतीने ई-पिक पाहणीला 'ब्रेक'

## शेतात जाण्यास कर्मचारी धजावेनात; तहसीलदारांकडे कामातून माफीची मागणी

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यात वाघाच्या वाढत्या वावराने शेतकरी आणि शेतमजुरांसह आता शासकीय कर्मचाऱ्यांमध्येही धडकी भरली आहे. वडाळा, वधपूर, भडकुंभ आणि सातापूर परिसरात ई-पिक पाहणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या चार कर्मचाऱ्यांनी थेट तहसीलदारांकडे धाव घेत कामातून माफी देण्याची मागणी केली आहे. वाघाच्या दहशतीत शेतात जाऊन पाहणी करायची तरी कशी, असा प्रश्न कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. महसूल सेवक दीपक साहेबराव वानखेडे, पोलीस पाटील पुनम विजय भोंड, वैशाली निलेश काळे आणि राजेश मुरलीधर पोटे यांनी याबाबत लेखी निवेदन दिले आहे. गेल्या महिनाभरापासून या परिसरात वाघाचा वावर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नरसिंगपूर शिवारात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. वडाळा आणि वधपूर परिसरात दोन गायींसह दोन गुरांवरही वाघाने हल्ला करून त्यांना ठार केले. भांबोरा परिसरातही वाघाचा वावर आढळून आला आहे. दररोज शेतशिवारात वाघाचे ठसे दिसत असल्याने शेतकरी शेताकडे जाण्यास धजावत नाहीत.

वडाळा गाव सावंगा पिंपळा जंगलालगत असल्याने वन्यप्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. वनविभागाकडून गस्त घालून नागरिकांना



एकट्याने शेतात न जाण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. अशा परिस्थितीत ई-पिक पाहणीसाठी कर्मचाऱ्यांना शेतात पाठविणे म्हणजे त्यांच्या जीवाशी खेळ करण्यासारखे असल्याची भावना व्यक्त होत आहे. वाघाने हल्ला केला तर जबाबदार कोण असा प्रश्न कर्मचाऱ्यांनी प्रशासनासमोर उभा केला आहे. ई-पिक पाहणीचे काम महत्त्वाचे असले तरी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे. त्यामुळे सुरक्षित पर्यायी व्यवस्था करूनच पाहणीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. वाघाचे ठसे दररोज दिसत आहेत. शेतकरी आणि शेतमजूरच शेतात जाण्यास तयार नाहीत. आमच्यावरही हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आम्हाला या कामातून माफी द्यावी, अशी मागणी चारही कर्मचाऱ्यांनी केली आहे.वाघाची दहशत आता थेट शासकीय कामकाजाच्या दारात पोहोचल्याने प्रशासन काय निर्णय घेते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### भरधाव दुचाकी बॅरिकेट्सवर आदळली

**खरांगणा (मो.)**-भरधाव दुचाकी बॅरिकेट्सवर आदळून झालेल्या अपघातात दोघे जखमी झाल्याची घटना मजरा शिवारात घडली. ऋषीकेश उर्फ गुड्डू पवार व पप्पू पुरुषोत्तम पाटील अशी जखमींची नावे आहेत. अपघातानंतर दोघांनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.मजरा शिवारातून दुचाकीने जात असताना चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर भरधाव दुचाकी रस्त्यावरील बॅरिकेट्सवर जाऊन आदळली. या अपघातात दुचाकीवरील ऋषीकेश उर्फ गुड्डू पवार आणि पप्पू पुरुषोत्तम पाटील हे दोघे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून अपघाताची नोंद घेतली. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### पतीने हाणला पत्नीच्या डोक्यात फरशीचा तुकडा

**वर्धा**-क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीच्या डोक्यात फरशीचा तुकडा हाणून जखमी केल्याची घटना आनंदनगर परिसरात घडली. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हनिफा शेख युनूस असे जखमी महिलेचे नाव असून युनूस शेख असे आरोपी पतीचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमध्ये कोणत्यातरी क्षुल्लक कारणावरून वाद झाला.वाद वाढत गेल्याने आरोपी युनूस शेख याने संतापाच्या भरात पत्नीच्या डोक्यात फरशीचा तुकडा मारला.या हल्ल्यात हनिफा शेख यांच्या डोक्याला दुखापत झाली. घटनेनंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले. याप्रकरणी जखमी महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# पांजरा येथे एसआरटी बाह्य शेतीशाळा उत्साहात

**आर्वी/जनमाध्यम**

तालुक्यातील पांजरा येथे प्रगतिशील शेतकरी कम्माभाई काझी यांच्या शेतात एसआरटी बाह्य शेतीशाळा शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात एसआरटी शेती पद्धतीचे तज्ज्ञ, प्रयोगशील शेतकरी आणि विचारवंत सहभागी झाले.



जालना येथील अधिकृत एसआरटी प्रशिक्षक विठ्ठल वैद्य यांनी जमिनीतील कार्बनचे प्रमाण वाढविणे, मातीचे आरोग्य व सुपीकता टिकविण्याबाबत मार्गदर्शन केले. छत्रपती संभाजीनगर येथील रावसाहेब मोरे यांनी पारंपरिक पिकांसोबत नवीन प्रयोग करण्याचे आवाहन केले. प्रत्येक शेतकऱ्याने किमान २० टक्के क्षेत्रात नावीन्यपूर्ण प्रयोग करावा, असा सल्ला त्यांनी दिला.

पळसखेड पिंपळा येथील पिंपळे यांनी एसआरटी शेतीतील अनुभव व अडचणी सांगितल्या. त्यांच्या गावातील सुमारे १२० शेतकऱ्यांनी ही पद्धत स्वीकारल्याचे त्यांनी नमूद केले. गणेश पाटील पोटे यांनी शून्य मशागत व कमी खर्चातील शेतीचे अनुभव मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजाभाऊ देशमुख यांनी केले. प्रा. संजय वानखेडे, गोपाल मरज कोल्हे, संजय देशमुख, राकेश यलचटवार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. शिबिरामुळे शेतकऱ्यांमध्ये आधुनिक व प्रयोगशील शेतीबाबत उत्साह निर्माण झाला.



# प्रा.सुरेंद्र वैद्य यांचा सपत्नीक भावपूर्ण निरोप

**हिंगणघाट/जनमाध्यम**

डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. सुरेंद्र लक्ष्मणराव वैद्य यांच्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला भावपूर्ण निरोप देण्यात आला. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या प्रा. वैद्य यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा. पंकज ठाकरे यांनी वैद्य यांच्या सेवाकाळातील कार्याचा व अनुभवांचा परिचय करून दिला. संस्था सचिव अनिल जवादे, उपाध्यक्षा मंदाकिनी जवादे, कोषाध्यक्ष जी. एस. भगत, संचालक बी. एस. पाटील, आर. के. पाटील, डॉ. चंद्रकांत नगराळे, प्राचार्या सुनीता खैरकार आदींच्या हस्ते प्रा. वैद्य यांचा पुष्पगुच्छ, गौरवचिन्ह व भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्रा. महेंद्र घुले यांनी सहवासातील आठवणींना उजाळा दिला. प्रा. वैद्य यांनी सेवाकाळातील अनुभव सांगत सर्वांचे आभार मानले. संस्था सचिव अनिल जवादे यांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सुख, समाधान व उत्तम शुभेच्छा दिल्या. संचालन अश्विनी कापसे यांनी केले, तर आभार प्रशांत पाटील यांनी मानले.

# राशी अर्बन पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**हिंगणघाट/जनमाध्यम**

राशी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, जिल्हा वर्धा मुख्यालय हिंगणघाटची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा लक्ष्मी मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली. प्रारंभी सरस्वती पूजन, माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी संचालक मंडळ व दैनिक प्रतिनिधींचे स्वागत अध्यक्षा सिंधुताई कडु व उपाध्यक्ष ऋषभ वरघणे यांनी केले.

उपाध्यक्ष वरघणे यांनी संस्थेच्या दोन वर्षांच्या कार्यकाळाचा अहवाल सादर केला. मुख्य कार्यकारी अधिकारी



शंकर चंदनखेडे यांनी संस्थेची कार्यप्रणाली, विविध योजना,ठेवी, कर्जवाटप व सोनेतारण कर्जाबाबत माहिती दिली. संस्थेने कमी एनपीए ठेवण्यावर भर दिल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षा सिंधु कडु यांनी संस्थेवरील विश्वास अधिक बळकट करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन संजय शेजवलकर यांनी केले.व्यवस्थापिका विभा कडु यांनी आभार मानले. यावेळी सभासद, ठेवीदार, भागधारक, संचालक व कर्मचारी उपस्थित होते. उत्कृष्ट दैनिक ठेवीदारांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नाट्य स्पर्धेसाठी प्रवेशिका सादर कराव्या

**वर्धा**- सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने १६ नोव्हेंबर पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून २५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात आल्या आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार आहे. २३ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर पासून विविध १० केंद्रांवर तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर पासून आयोजित करण्यात येणार आहे. नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://mahanatyaspardha.com या वेबसाईटवर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका २५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.



# वेध व्यक्तिमत्त्वाचा' पुस्तकाचे प्रकाशन

**वर्धा/जनमाध्यम**

व्यक्तिमत्त्व विकास, आत्मभान आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या डॉ. विजयता विटणकर-वंजाळकर लिखित 'वेध व्यक्तिमत्त्वाचा' या पुस्तकाचे नागपूर येथे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

व्यक्तिमत्त्व विकास हा केवळ बाह्य व्यक्तिमत्त्वापुरता मर्यादित नसून आत्मभान, विचारशक्ती, निर्णयक्षमता, वेळेचे नियोजन, नेतृत्वगुण, भावनिक संतुलन, ताण-तणावाचे व्यवस्थापन आणि योग्य सवयी यांचा एकत्रित परिणाम असल्याचे पुस्तकातून सोप्या व प्रभावी भाषेत मांडण्यात आले आहे.

प्रकाशनप्रसंगी विश्वास नांगरे पाटील यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी व तरुणांनी शैक्षणिक यशासोबतच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.डॉ. विटणकर-वंजाळकर या प्राध्यापिका, लेखिका व प्रेरणादायी वक्त्या असून त्यांनी यापूर्वी विद्यार्थी केंद्रित आठ पुस्तकांची निर्मिती केली आहे. 'वेध व्यक्तिमत्त्वाचा' हे पुस्तक विद्यार्थ्यांसह व्यक्तिमत्त्व विकासाची दिशा शोधणाऱ्या प्रत्येकासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# कीटकनाशक फवारणी करताना काळजी घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात शेती व्यवसायात पिकांचे कीड आणि रोगांपासून संरक्षण करण्यासाठी कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र, योग्य खबरदारी न घेतल्यास शेतकरी व शेतमजुरांना गंभीर विषबाधेचा सामना करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर, शेतकरी आणि शेतमजुरांनी फवारणी करताना अत्यंत काळजी घेण्याचे आणि खबरदारी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कीटकनाशके नेहमी शिफारस केलेल्या व मान्यताप्राप्त कंपन्यांकडूनच खरेदी करावीत. डब्यांवरील लाल, पिवळा, निळा किंवा हिरवा त्रिकोण पाहून त्यांची विषारीपणाची तीव्रता ओळखावी. लाल त्रिकोण सर्वाधिक विषारी तर हिरवा सर्वात कमी विषारी दर्शवतो. खूपच आवश्यकता असल्यास लाल त्रिकोणाचा वापर करावा. औषधे कुलूपबंद पेटीत लहान मुलांपासून लांब ठेवावीत. वापरापूर्वी माहिती पत्रकावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

फवारणी सकाळी किंवा सायंकाळी करावी, शक्यतो उन्हामध्ये फवारणी टाळावी तसेच हवेच्या विरुद्ध दिशेने फवारणी करणे टाळावे. फवारणी करताना संरक्षक कपडे, बूट, हातमोजे आणि चेहऱ्यावर मास्कचा वापर करावा. पंपाचे नोझल तोंडाने साफ न करता योग्य नोझल वापरावा. फवारणीच्या ठिकाणी अन्न-पाणी ठेवू नये व फवारणीदरम्यान खाणे, पिणे किंवा तंबाखू, सिगारेटचे सेवन टाळावे. फवारणी संपल्यावर हात, पाय आणि तोंड साबणाने स्वच्छ धुवावे.

सर्व काळजी घेऊनही अपघाताने विषबाधा झाल्यास घाबरून न जाता तात्काळ प्रथमोपचार करावेत. बाधित व्यक्तीला त्वरित अपघात स्थळापासून लांब मोकळ्या हवेत न्यावे आणि अंगावरील औषध लागलेले कपडे बदलावेत. शरीराचा भाग ताबडतोब साबण आणि पाण्याने धुऊन पुसावा. कीटकनाशक पोटात गेले असल्यास ओकारी करण्याचे उपाय करावेत. रुग्णाला दूध, तंबाखू, बिडी किंवा सिगारेट देऊ नये तसेच रुग्ण बेशुद्ध असल्यास काहीही खायला-प्यायला देऊ नये.

रुग्णाचा श्वासोच्छ्वास तपासावा आणि श्वास थांबल्यास कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू करावा. थंडी वाजल्यास पांघरूण द्यावे व घाम आल्यास पुसावा. प्रथमोपचारानंतर रुग्णाला औषधाच्या माहिती पत्रकासह तात्काळ डॉक्टरांकडे नेऊन उपचार सुरू करावेत. शेतकरी बांधवांनी स्वतःची काळजी घेऊन सुरक्षित शेती करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर यांनी केले आहे.

# बियाणे, खते व कीटकनाशक विक्री परवाना प्रक्रिया झाली ऑनलाइन

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील नवीन कृषी पदवीधारक आणि विद्यमान कृषी सेवा केंद्र चालकांसाठी बियाणे, खते, कीटकनाशके आणि कापूस बियाणे विक्रीचे नवीन परवाने मिळवणे, नूतनीकरण करणे किंवा दुरुस्ती करण्याची संपूर्ण प्रक्रिया आता आपले सरकार पोर्टलवरून घरबसल्या ऑनलाइन उपलब्ध झाली आहे. यामुळे अर्जदारांना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज उरलेली नाही. संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे पेपरलेस आणि पारदर्शक झाली आहे. ज्या कृषी सेवा केंद्र चालकांनी अद्याप आपल्या परवान्यांचे नूतनीकरण केलेले नाही किंवा परवान्यात सुधारणा करणे बाकी आहे, अशा सर्व परवानाधारकांनी पुढील १५ दिवसांत ऑनलाइन अर्ज करून परवाने अद्ययावत करावेत, अन्यथा संबंधित केंद्रांवर कृषी विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येणार आहे. शासनाने निर्धारित केलेले शुल्क ऑनलाइन ग्रास प्रणालीद्वारे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वर्धा यांच्या नावे भरून ते चलन पोर्टलवर अपलोड करावे लागेल. नवीन परवान्यासाठी कापूस बियाण्याकरिता ५०० रुपये व इतर बियाण्यांसाठी १ हजार रुपये, खते विक्रीसाठी किरकोळ विक्रेत्यास ४५० रुपये व घाऊक विक्रेत्यास २ हजार २५० रुपये आणि कीटकनाशक विक्रीसाठी ७ हजार ५०० रुपये शुल्क आहे.

परवाना नूतनीकरणासाठी कापूस व इतर बियाण्यांना प्रत्येकी ५०० रुपये तसेच रासायनिक खतांच्या किरकोळ ४५० व घाऊक परवान्यासाठी २२५० शुल्क लागू राहील. दुरुस्तीसाठी कापूस बियाणे १०० रुपये, इतर बियाणे ५०० रुपये, खते किरकोळ ३० रुपये, घाऊक १५० रुपये आणि कीटकनाशकांसाठी ३०० रुपये शुल्क आकारले जाईल.

# कपाशीवरील रसशोषक किडींचे एकात्मिक व्यवस्थापन करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

खरीप हंगामातील महत्त्वाचे नगदी पीक असलेल्या कपाशीवर सध्या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढत आहे. अधूनमधून ढगाळ व कोरडे वातावरण तसेच तापमानात झालेली वाढ यामुळे मावा, तुडतुडे, फुलकिडे आणि पांढरी माशी या किडींची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कपाशी पिकाचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने किडींचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

मावा पिवळसर किंवा फिक्कट हिरव्या रंगाचा असून तो कोवळ्या डहाळ्यांवर व पानांच्या खालच्या बाजूस समूहाने राहून रस शोषतो. प्रादुर्भाव वाढल्यास पाने कोकडतात व झाडाची वाढ खुंटते. तुडतुडे फिक्कट हिरव्या रंगाचे असून ते पानांच्या खालच्या बाजूने रस शोषतात. त्यामुळे पानांच्या कडा प्रथम पिवळ्या व नंतर तपकिरी होतात. फुलकिड्यांमुळे पानांवर पांढुरके चट्टे व तपकिरी ठिपके दिसतात. पांढरी माशीही पानांच्या खालच्या बाजूस राहून रस शोषते. तीव्र प्रादुर्भावात पाने लालसर होऊन वाळतात. सरासरी १० मावा किटक प्रति पान किंवा १५ ते २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे, २ ते ३ तुडतुडे प्रति पान, १० फुलकिडे प्रति पान, तसेच ८ ते १० प्रौढ पांढऱ्या माश्या किंवा २० पिल्ले प्रति पान आढळल्यास व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. मावा, तुडतुडे व फुलकिडे मिळून सरासरी १० किडी प्रति पान आढळल्यासही उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी शिफारशीपेक्षा अधिक नत्र खताचा वापर टाळावा तसेच पिवळे व निळे चिकट सापळे शेतात लावावेत. सिरफिड माशी,कातीन,ढालकिडे,क्रायसोपा यांसारखे मित्रकीटक पुरेशा प्रमाणात आढळल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा. सुरुवातीच्या प्रादुर्भावासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझॅडीरेक्टिन ३०० पीपीएम निमतेल बेस डब्ल्यू.एस.पी.५० मिली किंवा अझॅडीरेक्टिन ५ टक्के ५ मिली किंवा व्हार्टिसिलियम लॅकेनी ५० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरील उपायांनंतरही किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्यास कृषी विभागाच्या शिफारशीनुसार नोंदणीकृत कीटकनाशकांपैकी योग्य एका कीटकनाशकाची फवारणी करावी. दुसरी फवारणी करताना कीटकनाशकाचा गट बदलावा. फवारणीपूर्वी उत्पादनाच्या लेबलवरील सूचना,प्रमाण व सुरक्षितता नियमांचे काटेकोर पालन करावे, असे कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जीवन कतोरे यांनी कळविले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# Couchpuffy Furnitures ची यशस्वी वाटचाल, ४ वर्षे पूर्ण
## -विदर्भात उभारला १ लाख चौरस फुटांचा Premium Furniture Mall

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीच्या Furniture Market मध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या Couchpuffy Furnitures, Dreamland ने आज आपल्या यशस्वी वाटचालीची ४ वर्षे पूर्ण केली आहेत.

या चार वर्षांच्या प्रवासात Couchpuffy Furnitures ला अमरावती, नागपूर, अकोला आणि यवतमाळवासीयांकडून भरभरून प्रेम, विश्वास आणि समर्थन मिळाले. याच ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर कंपनीने आपल्या विस्ताराला नवी दिशा देत आता १ लाख चौरस फुटांचा Premium Furniture & Home Decor Mall उभारला आहे.आंतरराष्ट्रीय दर्जाचे Furniture आता Amravati मध्ये Affordable Prices मध्ये येथे उपलब्ध आहेत.

Couchpuffy Furnitures चे संचालक अनिलकुमार अग्रवाल आणि अमित अग्रवाल यांच्या मते, ग्राहकांना एकाच ठिकाणी उत्तम variety, उच्च दर्जाची quality आणि आकर्षक किमतींमध्ये premium furniture उपलब्ध करून देणे हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे.

Couchpuffy Furniture's हे स्वतः Direct Importer & Manufacturer आहे. कंपनी Turkey, Italy, Malaysia आणि China येथून Furniture Import करते. त्यामुळे ग्राहकांना आंतरराष्ट्रीय डिझाईन आणि Quality चे Furniture Affordable Prices मध्ये उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. Dreamland, Amravati येथील या भव्य showroom मध्ये Home Furniture पासून Office Furniture पर्यंतची विस्तृत range उपलब्ध आहे.

कंपनीने नुकताच Dreamland, Amravati येथे २०,००० चौरस फुटांचा विशेष Office Furniture Mall सुरू केला आहे.




यामध्ये Office Chairs, Office Tables, Sofas, Conference Tables, Reception Tables यासह ऑफिस सेटअपसाठी आवश्यक जवळपास सर्व प्रकारचे Furniture उपलब्ध आहे. नवीन Office Furniture Mall च्या introductory offer अंतर्गत निवडक Office Chairs वर 'Buy 1 Get 1 Free' ऑफरही उपलब्ध आहे.

Dreamland, Amravati येथील Couchpuffy Furnitures मध्ये Home Decor ची विदर्भातील सर्वात मोठी भव्य Gallery तयार करण्यात आली आहे.

येथे Modern पासून Antique आणि Unique Gift Articles, Planters & Pots, Wall Clocks, Frames, Paintings तसेच घर सजवण्यासाठी विविध प्रकारचे Decorative Products उपलब्ध आहेत.

ग्राहकांना Pinterest वर पाहायला मिळणाऱ्या Modern Home Decor Ideas ची आठवण करून देणारे अनेक unique products येथे पाहायला मिळतील. निवडक Home Decor Products वर सध्या 'Buy 1 Get 1 Free' ऑफरही सुरू आहे. Couchpuffy Furniture's चे संचालक अनिलकुमार अग्रवाल आणि अमित अग्रवाल यांनी सांगितले,

'ग्राहकांना एकाच ठिकाणी चांगली variety, top quality आणि premium products योग्य व affordable prices मध्ये उपलब्ध करून देणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. गेल्या चार वर्षांत अमरावतीसोबतच नागपूर, अकोला आणि यवतमाळ येथील ग्राहकांचे आम्हाला भरभरून प्रेम आणि विश्वास मिळाला. हाच आमचा सर्वात मोठा motivation आहे. आम्ही आमचे assortment आणि showroom experience सातत्याने अधिक चांगले करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व ग्राहकांनी एकदा Dreamland, Amravati येथील आमच्या showroom ला नक्की भेट द्यावी आणि Furniture व Home Decor ची संपूर्ण range स्वतः अनुभवावी.'

Couchpuffy Furniture's च्या ४थ्या वर्धापनदिनानिमित्त अमरावती आणि संपूर्ण विदर्भातील ग्राहकांसाठी Dreamland, Amravati येथील १ लाख चौरस फुटांचा Premium Furniture & Home Decor Mall पाहण्याची ही एक खास संधी आहे.

---

## कार्यालय, विशेष वसुली व विक्री अधिकारी
विदर्भ क्रे.को-ऑपरेटीव्ही सोसायटीज फेडरेशन लि., अमरावती
मु.पो.मेघदुत, राजापेठ बस स्टॉप जवळ, बडनेरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती-४४४६०५
संपर्क - ९६३७८५५५५१/५२/५३

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७(११)(ड-१)(३) अन्वये**
**ताबा नोटीस प्रसिध्दी**

सर्व नागरिकांना व थकबाकीदार सभासदांना जाहीर नोटीस देण्यात येते की, वादी संस्था आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., वलगांव रजि.नं.३४७ या संस्थेच्या खालील थकबाकीदार सभासदांनी वादी पतसंस्थेची थकबाकीचा भरणा न केल्यामुळे त्यांची खालील स्थावर मालमत्ता जप्त करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) (३) अन्वये प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. प्रत्यक्ष ताबा मिळण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रस्ताव दाखल केलेला आहे. खालील मालमत्तेसंबंधी खालील थकबाकीदार सभासदांशी कोणताही आर्थिक व्यवहार करु नये. केला असल्यास वादी संस्थेच्या थकबाकीस अधिन रहावे लागेल.

| अ.क्र. | थकबाकीदार व मालमत्ता धारकाचे नांव व पत्ता | गावाचे नांव | मालमत्ता क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ | आकारणी व भोगवटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.संतोष साहेबराव खोहरे मु.पो.टेकडीपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | मौजे-वलगांव ता.जि.अमरावती | शिट नं.५, भुमापन क्र.९८३/१, प्लॉट नं.९८३/1 मालमत्ता क्र.१३१४ | ११९.२ चौ.मी. | --- |
| २. | श्री.सचिन रामदासराव खैरकार मु.पो.धनगरपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | मौजे-वलगांव ता.जि.अमरावती | भुमापन क्र.७५७ भूधारणा पध्दती-भोगवटदार वर्ग-१ | ०.८२.०० हे.आर | ३.६५ |
| ३. | श्री.तुळशिराम नारायण बोबडे मु.पो.धनगरपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | ग्रा.पं.वलगांव मौजे.वलगांव ता.जि.अमरावती | मालमत्ता क्र.२६८७ व २५०४ | १६५४ हे.आर चौ.की.खुली जागा दगड विटा वापरलेली मातीची ईमारत/आर.सी.सी. पध्दतीची ईमारत | कर रु.७००/- |
| ४. | श्री.दिलीप सुखदेवराव टेकाडे मु.पो.धनगरपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | ग्रा.पं.वलगांव मौजे वलगांव ता.जि.अमरावती | वार्ड क्र.४, भुमापन क्र.१२३ | २६४ चौ.फुट दिलीप सुखदेव टेकाडे यांचा हिस्सा | --- |
| ५. | श्री.दशरथराव गोविंदराव मानकर मु.पो.कुंभारपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | ग्रा.पं.वलगांव ता.जि.अमरावती | मालमत्ता क्र.१७३४/१६०१ | एकुण १२३८ चौ.फुट आर.सी.सी.बांधकाम ३६० चौ.फुट खुली जागा ३९८ चौ.फुट व चुनाविटाचे बांधकाम ४८० चौ.फुट श्री.दशरथ गोविंद मानकर यांचा हिस्सा | कर ८५२ |
| ६. | श्री.सचिन सुभाषराव शिरस्कार मु.पो.कुंभारपुरा, वलगांव ता.जि.अमरावती-४४४८०१ | मौजे वलगांव भाग(२) (९४४४७३) PUID | भूमापन क्र.५०९/५३ खाते क्र.१२४८७ मालमत्ता क्र.४७७ (टी) प्लॉट नं.५३ | १.२०.०० हे.आर. चौ.मी. श्री.सचिन सुभाष शिरस्कार यांचा हिस्सा क्षे.१४९.९५ चौ.मी. श्री.सचिन सुभाष शिरस्कार यांचा हिस्सा | १५.०० |
| ७. | श्री.दिनकरराव रामचंद्रजी निर्मळ मु.पो.वार्ड नं.५, निर्मळ विद्यालया-जवळ, वलगांव, ता.जि.अमरावती-४४४८०१ | मौजे आमला (५३२६६५) ULPN | भूमापन क्र.२७ खाते क्र.२७२ | २.६८.०० हे.आर चौ.मी.श्री.दिनकर रामचंद्र निर्मळ यांचा हिस्सा | १४ रु. |

**विशेष सुचना -**
ताब्यात असणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव - वरील स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेली असून, वरील स्थावर मालमत्तेवर विशेष वसुली व विक्री अधिकारी, विदर्भ क्रे.को-ऑपरेटीव्ह सोसायटीज फेडरेशन लि., अमरावती यांचा प्रतिकात्मक ताबा आहे.

**जावक क्र.-** अजिसपफे/विववविअ/दै.प्र./८२३/२०२६-२७
**दिनांक** २०.०८.२०२६

**स्वाक्षरी/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**विदर्भ क्रे.को-ऑपरेटीव्ह सोसायटीज फेडरेशन लि.,**
**अमरावती**

---

MAHAVITARAN
**E-TENDER NOTICE**

The Executive Engineer, Achalpur Division, on behalf of MSEDCL invites tender through E- tendering portal for following details- Tender no-EE/ACH/T/2026-27/T-05- Tender for work of meter reading through CMRI/MR-9 and bill distribution services of PC O consumers (above and below 20 KW and PWW consumers) in all subdivisions under Achalpur division, value-10 Lac

The tender document will be available on web site from 04.09.2026 till 14.09.2026 up to 18.00 Hrs, please visit web site http://works.mahadiscom.in/eTender/etender.

**PRO No. 178**
**Executive Engineer, MSEDCL, O&M Dn. Achalpur**

**Old Passport Name -**
RASHIDA BI
**Husband Name -**
SHAIKH MAHEBOOB
**Pass Reissue given**
New Name :
RASHIDA BEE SHAIKH MAHEBOOB
**Old Passport No.:**
R6635086
**-Address-**
Naya Plot
Post : Mahuli Jahagir
Tq.Dist.Amravati-444901
(Maharashtra)

## महत्त्वाचे कागदपत्र हरविले आहे

अमरावती ते मोर्शी एसटी बस मध्ये येताना पॅन कार्ड,आधार कार्ड,आरसी बुक, ड्रायव्हिंग लायसन, इत्यादी हरविले आहे कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून देणाऱ्यास योग्य बक्षीस देऊ

**प्रदीप पांडुरंग ढोले, मोर्शी**
**मो.: ९१५६८०३७६६**

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

---

## जाहीर नोटीस
**अमरावती येथील विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २३५/२०२६** **ने.ता.०६.१०.२०२६**

**Applicant :-** **1. Manorama Dhanraj Umekar,** Age 78 yrs, Occu.- Household
R/o. Devari, Devara, Tq. Dist. Amravati
**2. Shital Santosh Umekar,** Age 41 yrs, Occu.- Household
**3. Niyati Santosh Umekar,** Age 17 yrs, Occu.- Education
**4. Om Santosh Umekar,** Age 11 yrs, Occu.- Education
Applicant No. 2 to 4 R/o. Dhote House,
Shree Apartment, Khorej Colony, Vidharbha, Amravati
**5. Sanket Rameshwar Chandurkar,** Age 36 yrs, Occu.- Business
R/o. Priynka Colony, Shegaon, Amravati

....V/s......

**Non-applicant :-** Nil

**APPLICANT UNDER SECTION 7 AND 29 OF THE GUARDIANS AND WARDS ACT, 1890 FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY STANDING IN THE NAMES OF MINORS.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता वि.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

DESCRIPTION OF PROPERTY

Mouje Changapur, Pragane Nandgaon Peth, Tq. & Dist. Amravati bearing field survey no. 2, 2 H 31R, agricultural Land covered in Non-agricultural by Hon'ble Tahsildar Amravati in Rev. Case No. NAP-34/Changapur-28/2011-12 order dt. 07/03/2012 and layout convered Plot No. 6 total admeasuring 320.77 sq.mtr. (3452.50 sq.ft.) out of which Northern Portion of East-west Division side having its plot admeasuring 125 sq.mtr. (1345.50 sq.ft.) and along with 19.50 sq.mtr. (210.87 sq.fts) constructed house thereon which is bounded as :-

Four Boundaries :-
Towards East - Road   Towards West - Plot No.7
Towards North - Plot No.5-B , Towards South - Remaining Portion of this plot

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दि.०६.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३१.०८.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

**अमरावती**
**दिनांक ३१.०८.२०२६** शिक्का
आदेशानुसार
प्र.सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६९६/२०२६
**वत्सला अधिक दोन - विरुध्द निरंक**
पुढील ता.१९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vatsala Wd/o Arjun Khobragade, Age 76 Yrs. Occu.: Nil R/o Sawardi, Pimpalvihir, Amravati.
2. Shobha W/o Mahadev Dupare (Nee Shobha D/o Arjun Khobragade), Age 59 Yrs. Occu.: Labourer R/o Dhanora Jogta, Nandgaon Kh. Januna, Amravati.
3. Sangita D/o Arjun Khobragade, Aged about 50 Yrs. Occu.: Labourer R/o Sawardi, Pimpalvihir, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Arjun Gangaram Khobragade हे दिनांक 05.02.2016 रोजी **सावर्डी** येथे मयत झाले. अर्जदार Vatsala Arjun Khobragade+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vatsala Arjun Khobragade+2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२५३/२०२६** **ने.ता.०५.१०.२०२६**

**१. रामेश्वर नामदेव बनसोड**
रा.वाटपूर, पो.लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत नामदेव दौलत बनसोड** यांचा **मृत्यू दि.०३.०८.२०१४** मध्ये **वाटसूर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.)क्र.२५६/२०२६ ने.ता.०३.१०.२०२६

**अर्जदार :** १. गजानन चोखोबा चव्हाण
रा.शहापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **चोखोबा मारोती चव्हाण** यांचा मृत्यू दि.**२६.०१.२०२४** रोजी शहापूर, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. तसेच मयताची पत्नी नामे **बेबी चोखोबाजी चव्हाण** यांचा मृत्यू दि. **२७.०६.२०१२** रोजी शहापूर, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७७४/२०२६
**शकुंतला अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shakuntala Laxmanrao Gokhe, Age 73 Yrs. Occu.: Housewife R/o Plot No.27, Near Ganpati Mandir, Shivshakti Colony, New Swastik Nagar Water Tank, Amravati
2. Rajesh Laxmanrao Gokhe, Age 53 Yrs. Occu.: Service R/o Flat No.102, Prasad Apartment No.2, Near Jyoti School, Ratan Nagar, Ramna Maroti Road, Nagpur
3. Umesh Laxmanrao Gokhe, Age 49 Yrs. Occu.: Business R/o Plot No.142, Sahu Nagar, Near Harishanti Colony, Akoli Road, Sai Nagar, Amravati
4. Kirti Pradeep Bhopale, Age 46 Yrs. Occu.: Housewife R/o Flat No.503, Sai Sparsh Apartment, Dhamalwadi, Bekrai Nagar, Fursungi Hadapsar, Pune
5. Varsha Bhaskar Kolhe, Age 52 Yrs. Occu.: Housewife R/o Harekrishna Nagar, Narayanpur Road, Paratwada, Tq.Achalpur, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Laxmanrao Narayanrao Gokhe हे दिनांक 02.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shakuntala Laxmanrao Gokhe+ 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shakuntala Laxmanrao Gokhe+ 4 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय
आर.एम.जे.सी.क्र.१७४/२०२६ ने.ता.१५.०९.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :**
१. **जुबेर खान शफीउद्दीन खान,** वय ४६ वर्षे, धंदा - नोकरी रा.घर नं. ९५/८, जुही सफेद कॉलनी, किडवाई नगर, ठाना के पिछे, कानपुर नगर, जुही कॉलनी, कानपुर नगर, उत्तर प्रदेश- २०८०१४.
२. **शझली शफीउद्दीन मुहम्मद मोईद,** वय अं.४३ वर्षे, धंदा - घरकाम रा.२३४/२७,कानकोरी शाह बाबा श्रीने, दरोगाबाग, उन्नाव, जि.उन्नाव, उत्तर प्रदेश- २०९८०१

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **जुबेर खान शफीउद्दीन खान व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **शफीउद्दीन शमसुद्दीन खान** यांचा मृत्यू **दिनांक ०८.०६.२०२३** रोजी व **सफीया शफीउद्दीन खान** यांचा मृत्यू **दिनांक ०१.०५.२०२१** रोजी उन्नाव, उत्तर प्रदेश येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०४ माहे डिसेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**प्र. सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६८४/२०२६**
**Smt. Shila Mangilal Nawandar+2 Versus NIL**
**पुढील ता.०१.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Smt. Shila Mangilal Nawandar,** Age about 68 years. Occu.: Housework R/o. Ram Raksha, Nr. Hanuman Temple, Moti Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Vishal Mangilal Nawandar,** Aged about 45 years. Occu.: Service, R/o. M 1506, Aparna Sarovar Zenith, Nalagandla, Lingampalli, K.V. Rangareddy, Telangana - 500 019
3. **Sau. Pooja Pawan Chandak,** Aged about 47 years. Occu.: Household work R/o. F-504, Shri Shanti Nagar, Housing Society, Gangadham, Shantrunjay Road, Opp. Mandot, Tower, Kondhwa, Pune City, Kondhwa Bk. Pune City, Maharashtra 411 048

-- विरुध्द --

**Non- Applicant :- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **Late Mangilal Rambilasji Nawandar** हे दिनांक ०६.०३.२००९ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Smt. Shila Mangilal Nawandar + 2 Vs. NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Shila Mangilal Nawandar + 2 Vs. NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२५८/२०२६** **ने.ता.०८.१०.२०२६**

**१. शिला सुदर्शनराव मेश्राम**
**२. अविनाश सुदर्शन मेश्राम**
**३. ज्योती योगेश मेश्राम**
**४. आदित्य योगेश मेश्राम**
**५. उमंग योगेश मेश्राम**
**६. रेणु योगेश मेश्राम** सर्व रा.पहुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत सुदर्शन चंद्रभान मेश्राम** यांचा **मृत्यू दि.११.०६.२०२६** मध्ये **पहुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. मयताचा एक वारस मुलगा नामे **योगेश सुदर्शन मेश्राम** यांचा **मृत्यू दि.१४.०६.२०२१** मध्ये **पहुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ही सुन असून अर्जदार क्र. ४ ते ६ हे नातू आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०२ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७१४/२०२६**
**सिमरन व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.०६.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Simranbai @ Simran Rajeshkumar Methani** Age 45 years. Occu.: Housewife
2. **Prince Rajesh Methani** Age 17 years. Occu.: Education
3. **Yashika Rajeshkumar Methani** Aged 15 years. Occu.: Education (Applicant no.1 is Natural Guardian Mother behalf of her Minor Son & Daughter i.e. applicant no. 2 & 3 ) R/o. Zulelal Line No.2, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेश चिमनदास मेठानी** हे दिनांक **२०.०१.२०१६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सिमरनबाई व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सिमरनबाई व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस
**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अचलपुर यांचे न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्र.४३५/२०२६** **ने.ता.०७.१०.२०२६**

**अर्जदार -** १. **गंगा रघूनाथ पवार,** वय ४९ वर्षे
२. **नितेश रघूनाथ पवार,** वय २६ वर्षे
दोन्ही रा.वार्ड नं.३, पारडी, ता.अचलपूर, जि.अमरावती

...विरुध्द .....

**गैरअर्जदार - निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **रघुनाथ महादेव पवार यांचे निधन दि.२०/०८/२०२०** रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत व इतर कोणीही मय्यतास वारस नाही. अर्जदारांना सरकारी योजना करिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, सबब वारसा प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत **वि.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), अचलपूर** या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोद घ्यावी.

आज दि.०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक (प्रशासन )**
**दिवाणी न्यायालय,(व.स्तर) अचलपुर**

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.अजय दिपक डकरे,** पत्ता महिराबपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३० संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/26130** जुना मालमत्ता क्र. **30000143** नझुल शिट क्र.-----प्लॉट नं.----ही कर आकारणी नोंदवहीनुसार **नझुल जागा भोगवटदार सुनिल एकनाथ पेंढारकर,** या नावाने असून वरील अर्जदार यांनी नझुल जागा भोगवटदार **अजय दिपक डकरे** या नावाने फेरफार घेण्याकरिता **इमला विक्री नोटरी व प्रतिज्ञापत्रावर** या कार्यालयामध्ये दिनांक **२४.०८.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - रस्ता
**पश्चिमेस** - रघुनाथ सुरजुसे यांचे घर
**उत्तरेस** - एकपावली रस्ता
**उत्तरेस** - मिना ज्ञानेश्वर कुकडे यांचे घर

शिक्का
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### पोलीस उपनिरीक्षक छगन शिंगणे सेवानिवृत्त



**अचलपूर-** अचलपूर येथील जीवनपुरा परिसरातील रहिवासी तथा नागपूर येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक छगन नथ्थुसिंग शिंगणे हे नागपूर पोलीस दलातील तब्बल ३५ वर्षांच्या प्रदीर्घ, कर्तव्यनिष्ठ आणि गौरवास्पद सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. ३५ वर्षांच्या सेवेत त्यांनी आपल्या कार्यातून पोलीस दलाची उंचावण्यासोबतच अधिकारी, प्रतिष्ठा सहकारी कर्मचारी आणि नागरिकांचा विश्वास संपादन केला. सेवानिवृत्तीच्या प्रसंगी आपल्या कारकिर्दीतील यशाचे श्रेय शिंगणे यांनी आपल्या स्वर्गीय आई-वडिलांना,ज्येष्ठ बंधू त्र्यंबकसिंग शिंगणे, दिनुसिंग शिंगणे, पत्नी माया शिंगणे आणि संपूर्ण कुटुंबाला दिले. कर्तव्य बजावत असताना कुटुंबीयांनी दिलेले प्रेम,पाठबळ,त्याग आणि प्रोत्साहन हेच आपल्या यशामागचे खरे बळ असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.छगन नथ्थुसिंग शिंगणे यांच्या ३५ वर्षांच्या गौरवास्पद पोलीस सेवेला विविध मान्यवरांनी सलाम केला असून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छाही दिल्या आहे.



### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**अंजनगाव बारी-** जि.प. उर्दू उच्च प्राथमिक शाळा, अंजनगाव बारी येथे 'सेवा फाउंडेशन अकोला' यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. अंजनगाव बारी केंद्राचे केंद्रप्रमुख प्रविण धाडसे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहम्मद आरिफ शेख रुस्तम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मो. यूसुफ अजहर, सहशिक्षिका आसिया परवीन, नगमा फिरदौस तसेच नवेद इकबाल खान उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.



### आरोहन २.०'मध्ये जीवनदात्यांचा गौरव

**टाकरखेडा संभू-** महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या अमरावती जिल्हा शाखेतर्फे 'आरोहन २.०' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत डॉ. संदीप हाडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.माजी मंत्री तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या कार्यक्रमाला आमदार रवी राणा, आमदार प्रताप अडसड यांच्यासह आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीच्या दुर्घटनेत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नवजात बालकांचे प्राण वाचविणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना 'जीवनदाता अवॉर्ड' देऊन गौरव करण्यात आला.चिखलदरा येथे अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी रुग्णाचे प्राण वाचविणारे डॉ. प्रताप खंडारे तसेच मेळघाटातील रक्ताल्पता असलेल्या रुग्णासाठी ५२ वेळा रक्तदान करणारे डॉ. अंकुश मानकर यांनाही सन्मानित करण्यात आले. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे मनोबल, सुरक्षितता व सन्मान जपण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### आचार्य पदवी प्रवेश परीक्षेला मुदतवाढ

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आचार्य पदवी प्रवेश परीक्षा-२०२६ करिता ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारिख ३ सप्टेंबर निश्चित करण्यात आली होती. तथापि, विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेता व आचार्य पदवी प्रवेश परीक्षा-२०२६ समितीने घेतलेल्या निर्णयानुसार आता १० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे आचार्य कक्षाकडून कळविण्यात आले आहे. अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी ३ सप्टेंबर ते १० सप्टेंबर या कालावधीत आपले अर्ज करावेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे.

# न.प.च्या उदासीन धोरणामुळे आरोग्याचा प्रश्न चव्हाट्यावर

## विलायतपुऱ्यातील उद्यानाला आले जंगलाचे स्वरूप

**अचलपूर/वार्ताहर**

लाखो रुपयांचा निधी खर्चुन अचलपूर शहरातील विलायतपुरा येथे उभारण्यात आलेले उद्यानाला जंगलाचे स्वरूप आले आहे.याबाबत अनेक तक्रारी नागरिकांनी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना राबविण्यात आलेली नाही. यामुळे अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे ते उद्यान'विषारी सरपटणाऱ्या प्राण्यांचे माहेरघर' बनले आहे.अचलपूर येथील विलायतपुरा परिसरात असलेल्या पाण्याचे टाकीच्या (जलकुंभ) आवारातील उद्यानाची ही दुर्दशा झालेली आहे. यामुळे हे उद्यान आता पूर्णपणे जंगलात रूपांतरित झाल्याने नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

विलायतपुरा येथील त्या उद्यानाला लागून अनेक दाट लोकवस्तीची घरे आहेत. दररोज शाळेत व अंगणवाडीत जाणारे



लहान मुले तसेच परिसरातील चिमुकले खेळण्यासाठी या आवारात येतात.मात्र झाडे,झुडपे आणि कचरा वाढल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विषारी साप आणि सरपटणारे प्राणी निघत आहेत. यामुळे खेळताना किंवा ये-जा करताना लहान मुलांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.या धोकादायक परिस्थितीबाबत अचलपूर नगरपालिकेला यापूर्वी नागरिकांनी वेळोवेळी निवेदने देऊन लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.जर चिमुकल्याचा किंवा नागरिकाचा या साप चावून जीव गेला, तर त्याची जबाबदारी अचलपूर नगर परिषद प्रशासन घेणार का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.यामुळे अचलपूर नगरपरिषद प्रशासन या उद्यानाची तातडीने स्वच्छता करणार का ? की अपघाताची आणि एखाद्या चिमुकल्याच्या जीवावर बेतण्याची वाट पाहणार? याकडे संपूर्ण विलायतपुरा परिसराचे लक्ष लागले आहे.

### प्रफुल्ल बर्वे यांचा प्रशासनाला इशारा

या गंभीर प्रश्नाकडे भाजप पदाधिकारी प्रफुल्ल बर्वे व परिसरातील नागरिकांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. 'लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या उद्यानाची प्रशासकीय दुर्लक्षामुळे वाताहात झाली आहे. जर आता या परिसरात पुन्हा साप आढळला, तर सर्पमित्रांच्या माध्यमातून तो साप थेट अचलपूर नगरपालिकेच्या कार्यालयात आणून सोडला जाईल,' असा थेट व सनसनाटी इशारा प्रफुल्ल बर्वे यांनी पालिका प्रशासनाला दिला आहे.

# महाराष्ट्र प्रायव्हेट कोचिंग क्लासेस नियमन कायद्याचे स्वागत

## तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची मागणी, शिक्षण मंत्री यांना दिले निवेदन



**अमरावती-** येत्या हिवाळी अधिवेशनात प्रस्तावित असलेल्या 'महाराष्ट्र प्रायव्हेट कोचिंग सेंटर्स रजिस्ट्रेशन अँड रेग्युलेशन ॲक्ट-२०२६' चे स्टेट कॉन्सोर्शियम ऑफ कोचिंग टीचर्स अँड इन्स्टिट्यूट्स ऑफ महाराष्ट्रच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. मात्र, प्रस्तावित कायद्यातील काही तरतुदी सर्वसामान्य कोचिंग क्लास चालकांसाठी अन्यायकारक ठरू शकतात. त्यामुळे या तरतुदींमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात, अशी मागणी संघटनेने शासनाकडे केली आहे. या संदर्भात संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सभासदांच्या वतीने शिक्षण मंत्री यांना दिलेले निवेदन देण्यात आले आहे.

कोचिंग क्षेत्रात शिस्त, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी नियमनाची आवश्यकता असल्याचे संघटनेने मान्य केले आहे.मात्र, कायद्याची अंमलबजावणी करताना मोठ्या संस्थांसोबतच लहान व मध्यम स्वरूपाचे कोचिंग क्लासेस चालविणाऱ्या संचालकांचाही विचार होणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

# अंजनगाव बारी मार्गावर लुटमारीच्या घटनांनी खळबळ!

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

**बडनेरा-** अंजनगाव बारी मार्गावर गेल्या काही दिवसांपासून लुटमार, मारहाण व वाहनचालकांना अडविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सलग घडलेल्या घटनांमुळे या मार्गावरील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलिस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवून समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

२५ ऑगस्ट रोजी बगिया टी-पॉईंटजवळ एका २३ वर्षीय तरुणाला अडवून चाकूचा धाक दाखवत त्याच्याकडील दोन मोबाईल व दुचाकी जबरदस्तीने हिसकावून नेण्यात आली होती. ही घटना ताजी असतानाच काल सायंकाळी एका २७ वर्षीय युवकाची गाडी तीन अनोळखी युवकांनी अडवून वाहनाची चावी हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावेळी युवकासोबत हाणामारी करण्याचाही प्रयत्न झाला. मात्र, मागून काही वाहनचालक येत असल्याचे लक्षात येताच संशयित चावी घेऊन पसार झाल्याची माहिती आहे. दरम्यान, टिमटाला रोडलगत कळंबे विट भट्टीजवळ एका २८ वर्षीय युवकाला सहा जणांनी मारहाण केल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. संबंधित युवकाने कसाबसा तेथून पळ काढून आपला जीव वाचविल्याचे सांगण्यात येत आहे.

# मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयामध्ये 'सैनिकांसाठी राखी' उपक्रमामधून कृतज्ञतेचा संदेश

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयामध्ये 'सैनिकांसाठी राखी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. माजी विद्यार्थी यशोगाथा अंतर्गत आयोजित कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी आचल वानखडे जीची एअर फोर्स मध्ये निवड होऊन कार्यरत आहे. महाविद्यालयामध्ये सैनिकांसाठी राखी या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षिका यांनी एकत्रित राख्यांचे संकलन करून भारतीय सैन्य दलातील जवानांसाठी ते पाठवण्यात आले. सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना,त्यांच्या कर्तव्या प्रतीचा आदर हा संदेश या उपक्रमामधून विद्यार्थ्यांना देण्यात



आला.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख यांनी या माजी विद्यार्थिनीने मिळवलेले यश,ध्येयापर्यंत केलेली वाटचाल, त्यासाठी दाखवलेली जिद्द, मेहनत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. देशाच्या सीमेवर राहून, विपरीत परिस्थितीवर मात करून आपल्या रक्षणासाठी कायम कार्यरत असणारे सैनिक यांच्यामुळे आपण या ठिकाणी सुरक्षित आहोत आणि त्यांच्याप्रति व्यक्त केलेला कृतज्ञता भाव राखी संकलन उपक्रमातून अतिशय स्तुत्य असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी आचल वानखडे हिने एअर मॅन पदापर्यंतचा तिचा प्रवास आपल्या शब्दांमधून मांडताना वेळोवेळी होणाऱ्या परीक्षा, खडतर असे ट्रेनिंग, कुटुंबापासून दूर राहणे, दूरध्वनीचा उपयोग न करता येणे असे विविध भारावणारे प्रसंग सांगितले. महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. सद्भावना दिवसाच्या निमित्ताने तिच्याकडून विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली व राख्यांचे संकलनाचे पाकीट आर्मीची प्रतिनिधी म्हणून तिच्याकडे सोपवण्यात आले.

सांस्कृतिक समितीकडून घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे संचालन स्वाती वसु यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सांस्कृतिक समितीचे सर्व सदस्य,महाविद्यालयातील सर्व शिक्षक यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# हयापूर गावात लवकरच एस. टी. बससेवा सुरु होणार

## युवासेना जिल्हाप्रमुखांच्या पाठपूराव्याला यश

**खल्लार/वार्ताहर**

ग्रामिण भागातील हयापूर येथील विद्यार्थ्यांसाठी अखेर एस.टी.बससेवेचा मार्ग मोकळा झाला आहे. युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या मागणीची दखल घेत दर्यापूर आगार व्यवस्थापकांनी हयापूर गावात लवकरच एस.टी. बससेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले.हयापूर गावातील विद्यार्थी व ग्रामस्थांच्या वाहतुकीचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. हयापूर गावातून एस.टी. बसच्या नियमित फेऱ्या सुरू करण्यात याव्यात,या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी राज्य परिवहन महामंडळाकडे निवेदन देऊन पाठपुरावा केला.

दर्यापूर, रामगाव, हयापूर, कमालपूर, चिंचोली, कसबेगव्हाण या मार्गावर एस.टी.बससेवा सुरू असतानाही हयापूर गावातील विद्यार्थ्यांना या सेवेचा पुरेसा लाभ मिळत नव्हता.

त्यामुळे दररोज शाळा व महाविद्यालया साठी दर्यापूर येथे ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत होती.या गंभीर प्रश्नाची दखल घेत अंकुश पाटील कावडकर यांनी एस.टी.प्रशासनाकडे ठामपणे पाठपुरावा करुन बस सेवा सुरु करण्यासाठी प्रयत्न करुन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हयापूर गावातून एस.टी.बससेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

या मागणीची दखल घेत दर्यापूर आगार व्यवस्थापकांनी हयापूर गावामध्ये लवकरच एस.टी. बससेवा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी सकाळची कसबेगव्हाण दर्यापूर एस.टी. बस हयापूर गावातून वळवावी, तसेच सायंकाळी दर्यापूर वरून कसबेगव्हाण कडे जाणारी एस.टी. बस हयापूर गावातून वळवावी, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, छावा संघटना जिल्हाध्यक्ष विपिन पाटील गावंडे, भास्कर धोटे, दिपक बगाडे, शरद आठवले, मोहन खरबळकार, योगेश कावडकर, मंगेश कावडकर, जगदीश कांबे, निकेश आखरे, शैलेश वाकोडे, ऋषिकेश धुळे, भक्ती भारसाकळे,आचल साऊकर, ईश्वरी भारसाकळे, वैभवी धुळे, सोनाली पंडित, आकांक्षा धुळे, गायत्री आखरे, समृद्धी साऊकर, आकाश धुळे, श्रीजित ढोके, पियुष गवई, प्रसन्नजीत गवई, समर्थ भारसाकळे, पल्लवी धुळे, सर्वज्ञ पंडित, वैष्णवी तांबळे, शिवांश जामोदकर, पूनम धुळे,नेहा मालव, कीर्ती राजेंद्र गवई, शेखर भारसाकळे, रावसाहेब उगडे, यश भारसाकळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



### श्रीराम हायस्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात


**टाकरखेडा संभू-** येथील श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच सांघिक भावना, शिस्त, चिकाटी आणि खिलाडूवृत्ती विकसित होते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक उमेश सोलव, शिक्षक शैलेश डहाके, संतोष देशमुख, संगीता लोहेकर, रीता धनैया, अतुल घुरडे, प्रशांत मालवे, शिक्षकेतर कर्मचारी दीपक हंबर्डे, सुनंदा देशमुख तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात झाला.

# आज वरखेड येथे ग्रामगीता पाठांतर स्पर्धा



**तिवसा-** श्रीकृष्ण जन्माष्टमी महापर्वावर व आद्यग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त विश्वसंत श्री तुकडोजी महाराज लिखित युगग्रंथ ग्रामगीता अध्ययन तेरावा विश्वयोगी स्वामी सीतारामदासजी महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित 'ग्राम निर्माणकला' अध्यायातील एकदिवसीय अध्ययन ४ सप्टेंबर रोजी दुपारी १ते सायंकाळी ७ पर्यंत आयोजित करण्यात आली असून प्रथम पुरस्कार ३००१ रुपये आदर्श प्रचारक बाबाराव पुनसे स्मृती ग्रामगीता गौरव पुरस्कार,द्वितीय २००१ रूपये माजी सर्वाधिकारी कृष्णराव ठाकरे स्मृती ग्रामगीता गौरव पुरस्कार, तृतीय १००१ रूपये आद्यग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर स्मृती समर्पित ग्रामगीता गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच सहभागी श्रीगुरुदेव प्रचारक, कार्यकर्ते,ग्रामगीताचार्य व शालेय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व चिंतन अभिजित बेलूरकर व सायंकाळी ९ ते १२ राष्ट्रीय कीर्तन प्रबोधन मोहनदास चोरे वरखेडकर, नागपूर यांचे दुसरे दिवशी सकाळी ९ ते ११ काल्याचे कीर्तन ह.भ.प. निलेश महाराज गावंडे, ग्रामगीताचार्य गावंडगाव त्यानंतर मराठी भाषा विद्यापिठ, रिद्धपूर चे अधिष्ठाता डॉ प्रा. कोमल ठाकरे यांचे रामकृष्ण दादांचे जीवन कार्यावर व्याख्यान होणार असून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू, साहित्यीक प्रा.राजेंद्र मुंढे, कविवर्य बळवंत भोयर, माणिकदादा बेलूरकर यांच्या उपस्थितीत 'ग्रामगीता सन्मान सोहळा' होईल. ग्रामगीता पाठांतर स्पर्धा, वृक्षारोपण -वृक्षसंवर्धन, ग्रामस्वच्छता ग्राम, साहित्य प्रकाशन, ग्रामीण वाचन चळवळ ,कीर्तन प्रबोधन आदि कार्यक्रमांचा लाभ जास्तीत जास्त संख्येने घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण जन्माष्टमी व आद्यग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर जयंती महोत्सव समिती, श्रीक्षेत्र वरखेड यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

# भगवंतराव पाटील महाविद्यालय येथे 'ऑपरेशन कवच' अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान व जनजागृती



**परतवाडा-** पोलीस अधीक्षक निकेतन कदम, भा.पो.से. यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन कवच' अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान व जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रम भारतीय विद्या मंदिर, अमरावती संचलित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एस. खांडेकर होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक (PI),अमरावती ग्रामीण वाहतूक शाखा तसेच विजयजी गराड, सहाय्यक पोलीस निरीक्षक (API), अचलपूर वाहतूक शाखा उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन, अपघात प्रतिबंध,हेल्मेट व सीटबेल्टचे महत्त्व,वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, मद्यपान करून वाहन न चालविणे,बेगमर्यादेचे पालन,पादचारी नियम तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. दयाशी वि. कोकाटे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'सुरक्षित रस्ता – सुरक्षित जीवन' या संदेशासह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कस्तुरबा इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी बुद्धिबळ खेळात राष्ट्रीय स्तरावर प्रथम

**अमरावती-** स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थिनी बुद्धिबळ खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रथम आली. ही स्पर्धा पॉवर चेस अकॅडमी आणि चेस असोसिएशन वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत देशभरातून ३०० हून अधिक बुद्धिबळपटू सहभागी झाले होते. कस्तुरबा इंग्लिश स्कूल मधील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी आभा अंकुश देशमुख हिने सात वर्षाखालील वयोगटामधून या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. वाशीमच्या बुद्धिबळ क्षेत्रातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा असून या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित तसेच अनुभवी बुद्धिबळ पटूंना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसोबत खेळण्याची आणि आपले कौशल्य सिद्ध करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली. देशभरातील बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले कौशल्य सिद्ध केले. शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी या विद्यार्थिनीचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. व अशाच प्रकारे शाळेचे नावलौकिक करून या खेळामध्ये पारंगत व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.



# रविनगरात भरदिवसा तरूणीची निर्घृण हत्या

## उपचारादरम्यान शर्वरीची मृत्यूशी झुंज अपयशी

### आरोपीला अटक





शर्वरी गणेश हाइके

**अमरावती/प्रतिनिधीः-** कॉलेजला जाण्यासाठी घरातून निघालेल्या १७ वर्षीय तरुणीला रस्त्यात अडवून तिच्यावर चाकूने सपासप वार करीत निर्घृण हत्या केल्याची थरारक घटना गुरुवारी (दि.३) सकाळी राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रविनगर पुलाजवळ घडली. गंभीर जखमी अवस्थेतील तरुणीला रिक्षाचालक व एका तरुणाने तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली. दिवसाढवळ्या घडलेल्या या हत्याकांडाने संपूर्ण अमरावती शहर हादरले असून, जानेवारीपासून आतापर्यंत शहरातील हा ३३वा खून असल्याचे समोर आले आहे.



दरम्यान, हल्ल्यानंतर फरार झालेल्या ☞(पान २ वर)

### दोन वर्षांपासून होती ओळख

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, शर्वरी आणि आरोपी आनंद यांची मागील दोन वर्षांपासून ओळख होती. आरोपी यापूर्वी रविनगर परिसरात भाड्याने राहत होता. काही महिन्यांपासून शर्वरीने आरोपीशी बोलणे बंद केल्यामुळे तो नाराज असल्याची माहिती पुढे आली आहे. याच कारणातून आरोपीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक संशय आहे.

# पॉवर ऑफ अॅटर्नी नोंदणीसाठी ४,८०० रुपयांची लाच

### धारणीत प्रभारी दुय्यम निबंधक कार्यालयातील लिपिकासह तिघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** पॉवर ऑफ अटर्नीची नोंदणी करून देण्यासाठी सुरुवातीला ७ हजार रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर ४,८०० रुपयांची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धारणी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात गुरुवारी (दि.३) सापळा कारवाई केली. या कारवाईत प्रभारी सहदुय्यम निबंधक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक, कंत्राटी ऑपरेटर आणि एका खासगी ऑनलाइन सेंटर चालकाला ताब्यात घेण्यात आले असून, ४,८०० रुपयांची लाच रक्कम जप्त करण्यात आली आहे.

तक्रारदार हा ४५ वर्षीय शेतकरी असून त्याच्याकडे सहा



एकर शेती आहे. शेतजमिनीवरील कर्ज पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत माफ झाले होते. त्यानंतर पॉवर ऑफ अटर्नीची नोंदणी करून घेण्यासाठी तक्रारदार १९ ऑगस्ट रोजी धारणी येथील सहदुय्यम निबंधक कार्यालयात गेला होता. यावेळी कार्यालयातील कनिष्ठ लिपिक तथा प्रभारी सहदुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधित संतोष विष्णुपंत दुधंडे (वय ४७) यांनी काम करून देण्यासाठी ७ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे १ सप्टेंबर रोजी करण्यात आली. एसीबीने पंचांसमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता, संतोष दुधंडे यांनी खासगी इसम साबुलाल सानू भिलावेकर (वय २९) याच्या माध्यमातून पॉवर ऑफ अटर्नीची नोंदणी करून देण्यासाठी ४,८०० रुपयांची लाच मागितल्याचे ☞(पान २ वर)

### येवदा येथील अल्पभूधारक

# शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा येथील ३७ वर्षीय अल्पभूधारक तरुण शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज (दि.३) उघडकीस आली.

संतोष जगन्नाथ भालतडक (वय ३७ ) असे गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्याचे नाव आहे. घरी कुणीही नसताना ११ ते १२ वाजताच्या दरम्यान त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती येवदा पोलिसांना मिळताच पोलिस कर्मचारी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केला. सततची ☞(पान २ वर)

# समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम प्रेशर ग्रुप म्हणून काम करू

### सीजेपी कोअर कमिटी सदस्य डॉ.नितीन दिघे यांचे प्रतिपादन

### कॉकरोच जनता पार्टीची चांदूर रेल्वे शहरात एन्ट्री



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** 'कॉकरोच जनता पार्टी राजकारणात पडणार नाही. समाजातील ज्वलंत प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देत ते सोडविण्यासाठी एक सक्षम 'प्रेशर ग्रुप' म्हणून यापुढील काळात देशभर काम करणार आहे,' असे प्रतिपादन सीजेपीच्या दिल्ली येथील कोअर कमिटीचे सदस्य डॉ. नितीन दिघे यांनी केले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा दौरा केल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीच्या कोअर कमिटीने प्रथमच अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे शहरात भेट देत बैठक घेतली. चांदूर रेल्वे येथील ☞(पान २ वर)

### शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सोडचिठ्ठी

# नरेंद्र पडोळे यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश



**अचलपूर/प्रतिनिधीः-** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या जिल्हाप्रमुखपदाचा नुकताच राजीनामा दिलेले नरेंद्र पडोळे यांनी गुरुवारी ३ सप्टेंबर रोजी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला. मुंबईतील नंदनवन निवासस्थानी शिवसेना पक्षाचे नेते व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश झाला. नरेंद्र पडोळे ☞(पान २ वर)

# कावड यात्रेनिमित्य दर्यापूर,मुर्तिजापूर मार्गावरील वाहतूक वळविण्याचे आदेश

### एसटी बससेवेला अपवाद



**खल्लार/प्रतिनिधीः-** श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी होणाऱ्या कावड यात्रा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता दर्यापूर–मुर्तिजापूर मुख्य मार्गावरील वाहतूक तात्पुरती वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांनी जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधिल कलम ३३ (१) तसेच मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधिल कलम ११५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हे आदेश निर्गमित केले आहेत.

दर्यापूर परिसरातील भाविक ६ सप्टेंबर २६ रोजी रात्रीच्या सुमारास वाहनाने अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लाखपुरी येथे जातात. लाखपुरी येथील पूर्णा नदीच्या काठावरील शिवमंदिरात पूजा-अर्चा करून नदीचे पवित्र पाणी कावडीत भरल्यानंतर कावड मंडळे रात्रीच पायी दर्यापूरच्या दिशेने ☞(पान २ वर)

# जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचा मृत्यू



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या ३० वर्षीय कैद्याचा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.मोहम्मद मोसिन मोहम्मद अनवर कुरेशी ( वय ३०, रा. काजीपुरा, अकोला), कैदी क्रमांक सी-५८१२ असे मृत कैद्याचे नाव आहे. माहिती नुसार, मृत मोहम्मद मोसिन हा अकोला येथील रामदास पेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बलात्कार, पोक्सो आणि एससी/एसटी कायद्यांतर्गत गंभीर गुन्ह्यात दोषी आढळला होता.अकोला येथील विशेष न्यायालयाने १३ मार्च २०२० रोजी त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तेव्हापासून तो अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिक्षा ☞(पान २ वर)

# दहिगाव सेवा पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करा

### ठेवी परत मिळेना; १० दिवसांचा अल्टिमेटम, अन्यथा प्रहारचा एल्गार




**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** कष्टाने कमावलेला पैसा भविष्याच्या सुरक्षिततेसाठी म्हणून पतसंस्थेत ठेवला, मात्र तीच रक्कम परत मिळत नसल्याच्या गंभीर आरोपामुळे दहिगाव सेवा येथील वंदनीय नित्यानंद बिगर शेती सहकारी पतसंस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ठेवीदारांच्या पैशांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत सखोल चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली असून ☞(पान २ वर)

# वीरचक्र विजेते शरदचंद्र देशपांडे यांच्या गौरवशिलेची पुनर्स्थापना करा

### भाजपा नेते तुषार भारतीय यांची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाचे काम सध्या वेगात सुरू असून, या अंतर्गत जुने रेल्वे स्थानकाचे भवन नुकतेच पाडण्यात आले. या ऐतिहासिक



इमारतीवर भारतीय हवाई दलाचे शौर्य आणि अमरावतीच्या सुपुत्राचा गौरव सांगणारी एक अमूल्य गौरवशिला होती. वीरचक्र सन्मानित एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र नरेश देशपांडे यांच्या सन्मानार्थ रेल्वे मंत्रालयाने स्थापित केलेली ही गौरवशिला तात्काळ सुरक्षित स्थळी आणि दर्शनी भागात पुनर्स्थापित करावी, अशी मागणी भाजप नेते तुषार भारतीय यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी रेल्वे स्थानक प्रबंधकांना निवेदन सादर केले.निवेदनात म्हटले आहे की, १९६५ च्या भारत-पाक युद्धातील ☞(पान २ वर)

# अमरावतीत ब्लिंकिट डिलिव्हरी बॉयचा अल्पवयीन मुलीला मानसिक त्रास

### फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणी उकळण्याचा प्रयत्न

### गाडगेनगर पोलिसांत पोक्सोसह गंभीर गुन्ह्यांची नोंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑनलाईन सामान मागवताना चुकीचे लोकेशन गेल्याने एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला मोठ्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. डिलिव्हरीबाबत माहिती घेण्यासाठी तिने ज्या मोबाईल नंबरवर संपर्क साधला, त्याच व्यक्तीने तिचा नंबर मिळवून तिला वारंवार फोन करून त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी आदिल खान नावाच्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार, पीडित १३ वर्षीय मुलगी आपल्या आई सोबत गाडगे नगर परिसरात राहते आणि इयत्ता ८ वी मध्ये शिकते. तिने ब्लिंकिट एप्लिकेशनच्या माध्यमातून ऑनलाईन साहित्य मागवले होते. ऑर्डर करताना चुकून तिच्या कडून चुकीचे लोकेशन शेअर झाले. डिलिव्हरीबाबत माहिती घेण्यासाठी तिने एपवर असलेल्या डिलिव्हरी बॉयच्या नंबरवर फोन केला. आरोपीने तिला सध्याचे लोकेशन पाठवण्यास सांगितले आणि याच दरम्यान तिचा मोबाईल नंबर मिळवला. तक्रारीनुसार, दुसऱ्या दिवशी आरोपी आदिल खानने मुलीला व्हॉट्सअपवर मेसेज पाठवला. 'ओळखलं का? काल मी तुम्हाला पार्सल आणून दिलं होतं, मी आदिल बोलतोय,' अशी ओळख त्याने कथितरित्या दिली. यानंतर त्याने मुलीला वारंवार फोन करणे ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वेत मुद्रांक विक्रेत्यांकडून कथित लूट; परवाने रद्द करण्याची मागणी

### जादा दराने स्टॅम्प-तिकिटे विक्रीचा दावा, सह दुय्यम निबंधकाकडे तक्रार



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील मुद्रांक विक्रेत्यांच्या कथित मनमानीविरोधात आता संताप व्यक्त होऊ लागला आहे. कार्यालयीन वेळेत मुद्रांक विक्रेते उपलब्ध राहत नसल्याने तसेच कोर्ट फी तिकीट व मुद्रांक जादा दराने विक्री करून विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट केली जात असल्याचा गंभीर आरोप शहरातील हर्षल देशमुख यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी सह दुय्यम निबंधक, चांदूर रेल्वे यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित मुद्रांक विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

हर्षल देशमुख यांनी तक्रारीत नमूद केले आहे की, २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कार्यालयीन कामासाठी कोर्ट फी तिकीट व मुद्रांक घेण्यासाठी एका परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याकडे गेले असता, संबंधित विक्रेत्याने तिकीट व स्टॅम्प देण्यास टाळाटाळ केली. उलट वाद घालत, तिकीट जास्त दराने तसेच १०० ☞(पान २ वर)

# उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना मार्चचे दर्यापुरात स्वागत



**खल्लार/प्रतिनिधीः-** अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या विचारात असलेल्या राज्य सरकारच्या या अविवेकी निर्णयामुळे आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या ५९ जातींमध्ये प्रचंड असा असंतोष उफाळून आला आहे.अशावेळी ५९ जातींच्या भवितव्यांचा ☞(पान २ वर)

# अमरावतीच्या विकासासाठी हुडकोची भागीदारी

### विविध विकासकामांचे प्रस्ताव तयार करण्याची तयारी



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हुडकोच्या माध्यमातून विविध विकासकामे राबविण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. हुडको मुंबई क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकारी निरीक्षक मुरली कृष्ण जामि यांनी अमरावती महानगरपालिकेच्या बैठकीत हुडकोच्या कार्याची माहिती देताना शहराच्या विकासासाठी भागीदारी करण्याची तयारी दर्शविली.

अमरावती महानगरपालिकेने संधी दिल्यास हुडकोच्या माध्यमातून ☞(पान २ वर)